# प्रकरण ६ वे

## माहिती संकलन, विशदीकरण आणि विश्लेषण

६.१ प्रस्तावना.

६.२ शिक्षिकांच्या प्रश्नावलीचे सांख्यिकीय विश्लेषण.

६.३ समारोप.

# प्रकरण ६ वे

# माहिती संकलन, विशदीकरण आणि विश्लेषण

## ६.१ प्रस्तावना

संशोधनासाठी कोणती संशोधन पध्दती वापरली व माहिती कशी मिळवली याचे विवेचन या प्रकरणात केलेले आहे. या माहितीवरून निष्कर्ष काढण्यासाठी ज्याचा आधार घेतला आहे. अशा सर्व नोंदी माहिती या प्रकरणामध्ये संकलित केलेली आहे.

या अभ्यास विषयाची उद्दिष्टे नजरेसमोर ठेवून अंगणवाडी शिक्षणाच्या विविध बाबींविषयीची माहिती प्रश्नावली या संशोधन साधनाद्वारे आणि मुलाखत व निरीक्षण या साधनाद्वारे मिळविण्यात आलेली आहे. प्रश्नावली, मुलाखत आणि निरीक्षणाद्वारे प्राप्त झालेल्या माहितीचे या प्रकरणात संकलन आणि विश्लेषण केलेले आहे. ही माहिती मांडताना प्रथम प्रश्नावली व काही प्रमाणात मुलाखतीतून मिळालेल्या माहितीचा विचार केलेला आहे. त्यानंतर मुलाखत ही अन्य निरीक्षणातून प्राप्त झालेल्या माहितीचे संकलन व विश्लेषण केलेले आहे.

## ६.२ शिक्षिकांची शैक्षणिक पात्रता

अंगणवाडी शाळा किंवा बालमंदिर ही शिक्षणसंस्था असली तरी तिचे स्वरूप इतर शिक्षण संस्थेपेक्षा सर्वस्वी निराळे व वेगळे आहे. अंगणवाडी घर व शाळा यांना जोडणारा दुवा आहे. त्यामुळें त्याचे स्वरुप काहीसे घरासारखे तर काहीसे शाळेसारखे असते. म्हणून या शिक्षणात बालशिक्षिका ही अतिशय महत्वाची व्यक्ति असते. म्हणून अशी शिक्षिका प्रशिक्षित असणं आवश्यक आहे.

अंगणवाडी शाळेतील मुलाचा विश्वास संपादन करून घ्यावयाचा म्हणून शिक्षिकेची जबाबदारी कितीतरी वाढते. सर्वप्रथम शिक्षिकेला बालकांची मनापासून आवड असावयास हवी. लहान बालकांमध्ये रमणारीच चांगली शिक्षिका होवू शकते. बालकांमध्ये काम करणे ही फार अवघड गोष्ट आहे. कारण आपल्या घरातील दोन - तीन मुले सांभाळताना आपणास नाकी नाऊ येते. शाळेत तर ४० ते ५० मुले तीन ते सहा तास सांभाळावी लागतात. म्हणून ही ४० - ५० मुलांना चांगल्याप्रकारे शिकविणारी शिक्षिका ही अशा शाळेत आदर्श शिक्षिका होवू शकेल.

अंगणवाडी शाळेत ४० - ५० मुलांना एकत्र सांभाळायचे म्हणजे त्यांच्या मनाची जडण - घडण शिक्षिकेने समजावून घेणे हे ओघानेच आले. या वयोगटातील बालमनाचे सर्वसाधारण स्वरूप शिक्षिकेला माहित असले तरच त्यातल्या प्रत्येक मुलाच्या मनाचे बारकावे समजू शकतील. मुलांमधील हे बारकावे समजण्यासाठी बालमानशास्त्राशी शिक्षिकेची ओळख हवी. बालमानशास्त्राचा प्राथमिक विश्लेषणात्मक अभ्यास केलेला असावा. यासाठी शिक्षिकेने नोकरी पूर्व अंगणवाडी शिक्षण घेतलेले असले पाहिजे.

अंगणवाडी शाळेत शिक्षिका ही अतिशय महत्वाची व्यक्ती आहे. वरील माहितीवरून बालकांच्या सर्वांगिण विकासात शिक्षिकांचे महत्वपूर्ण भूमिका असते. संशोधकाने ग्रामीण भागातील १८१ शाळांमधील १८१ अंगणवाडी शिक्षिकांशी शैक्षणिक पात्रता संबधी माहिती गोळा केली आहे. ती खालीलप्रमाणे विश्लेषण केली आहे.

कोष्टक क्रमांक ३

<u>आपण खालीलपैकी कोणती शैक्षणिक पात्रता पूर्ण केली आहे?</u>

| अ.क्र. | शैक्षणिक पात्रता | शिक्षिकांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | मॉंटेसरी ट्रेन्ड | ३१ | १७.२ |
| २) | अंगणवाडी डी.एड्. | २२ | १२.२ |
| ३) | एस.एस.सी. / एच.एस.सी. डी.एड. | ०० | ०.० |
| ४) | बी.ए. / बी.कॉम. | १० | ५.६ |
| ५) | बारावी उत्तीर्ण | २० | ११.० |
| ६) | १० उत्तीर्ण | ५३ | २९.२ |
| ७) | १० वी च्या आत | ४५ | २४.८ |
| | एकूण | १८१ | १०० |

अंगणवाडी शिक्षिका मॉंटेसरी ट्रेन्ड व अंगणवाडी कोर्स केलेले शैक्षणिक पात्रतेची असावी. अशा शैक्षणिक पात्रतेला अतिशय महत्वाचे स्थान आहे. वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, मॉंटेसरी ट्रेन्ड शिक्षिकांचे प्रमाण १७.२ टक्के आहे. अंगणवाडी डी.एड्. शिक्षिकांचे प्रमाण १२.२ टक्के आहे. एस.एस.सी. डी.एड्. अथवा एच.एस.सी. डी.एड्. असणा-या शिक्षिकांचे प्रमाण ० आहे. डी.एड्. शिक्षिका एकही नाही. बी.ए. / बी.कॉम. असणा-या शिक्षिकांचे प्रमाण ५.६ टक्के आहे. १२ वी उत्तीर्ण असणा-या शिक्षिकांचे प्रमाण ११.० टक्के आहे.

१० वी पास असणा-या शिक्षिकांचे प्रमाण २९.२ टक्के आहे. १० वीच्या आत शिकलेल्या शिक्षिकांचे प्रमाण २४.८ टक्के आहे. अशा प्रकारे अंगणवाडी शिक्षिकांचे शैक्षणिक पात्रता आहे. या शाळांमध्ये अप्रशिक्षित व ज्यांना इतरत्र नोकरी मिळत नाही तोपर्यंत शिक्षिका म्हणून काम करीत असतील तर

बालसंस्काराचे कार्य चांगल्याप्रकारे करता येणार नाही. म्हणून बालअध्यापनाची माहिती व लहान मुलांची आवड असणे हा यास्तरावरील शिक्षिकांचा महत्वाचा गुण आहे. हे लक्षात घेवून अशा शाळामध्ये प्रशिक्षित शिक्षिकांची नेमणूक करण्यात यावी.

वरील विवेचनावरुन असे दिसून येते की, स्थानिक शिक्षिकेंची नेमणूक अपात्र असूनही केली जाते. हे प्रमाण बरेच आहे. त्यामुळे अंगणवाडी शाळांमधील बालकांची गुणवत्ता अपेक्षीतरित्या विकसित होत नाही असे म्हणता येईल. म्हणून अंगणवाडी शाळेत किमान पात्रता असलेल्या शिक्षिकांची नेमणूक होणे आवश्यक आहे. अशा त-हेची आवश्यक पात्रता असलेल्या शिक्षिका ग्रामीण भागात उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे शहरी विभागातील व इतरत्र भागातील किमान आवश्यक पात्रतेच्या शिक्षिका ग्रामीण भागात नेमणूकीस प्रोत्साहन देणे आवश्यक आहे.

## ६.३ *शिक्षिकांची नेमणूक*

शिक्षण क्षेत्रात अगर कोणत्याही क्षेत्रात नोकरी करणा-या व्यक्तिस आपली नेमणूक कशी केली आहे याचा परीणाम त्यांच्या कार्यक्षमतेवर होत असतो. नेमणूक जर हंगामी असेल तर त्यास नोकरीची शाश्वती नसल्याने आपोआप त्यांच्या कार्यक्षमतेवर परीणाम होत असतो. नोकरी कायम स्वरुपाची असेल तर त्याचा परीणाम त्या क्षेत्रातील कार्यक्षमतेवर चांगला होत असतो. म्हणून या शिक्षणाच्या या स्तरवरील शिक्षिकांची नेमणूक कशी आहे याला अतिशय महत्व आहे. संशोधकाने या शाळांमध्ये काम करणा-या शिक्षिकांची नेमणूक कशी केली आहे. यासंबधी माहिती गोळा केली आहे. ती माहिती खालील प्रमाणे.

## कोष्टक क्रमांक ४

## शिक्षिकांची नेमणूक

| अ.क्र. | नेमणूकीचे स्वरुप | शिक्षिकांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | कायम स्वरुपात | १८१ | १०० |
| २) | हंगामी स्वरुपात | ०० | ०० |
| | एकूण | १८१ | १०० |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की शासनामार्फत चालविल्या जाणा-या अंगणवाडी शाळेत कायमस्वरुपी शिक्षकांची नेमणूक केली आहे. कायम स्वरुपात शिक्षिकांच्या नेमणूकीचे प्रमाण १०० टक्के आहे. हंगामी शिक्षिकांच्या नेमणूकीचे प्रमाण १ टक्काही नाही. यावरुन असे लक्षात येते की, अंगणवाडी शाळेत शिक्षिकांची नेमणूक ही हंगामी स्वरुपाची नसून ती कायम स्वरुपाची आहे.

## ६.४ *आपण पदवीधर आहात काय?*

प्राचीन काळी स्त्रीयांचे स्थान मानाचे होते असे साहित्यातून दिसून येते. परंतु अपवादात्मक गोष्टी सोडल्या तर प्रत्यक्षात तिचे स्थान गौणच होते. अर्वाचिन काळात स्त्रीयांच्या उध्दारासाठी राजाराम मोहनराय व काही पाश्चात्य मिशन-यानी याबाबत प्रयत्न केल्याचीही उल्लेख आहेत. म.फुले, गो.ग.आगरकर, महर्षी कर्वे या या समाजसुधारकांनी स्त्रीयांवर होणारे अन्याय व तिची दुर्बलता पाहिली त्यामानाने आज स्त्री शिक्षणाचा प्रसार झालेला दिसून येतो.

आजच्या उच्चस्तरीय समाजात शिक्षणाने स्त्रीयांच्या पारंपारीक स्थितीत बदल घडून आले आहेत. तथापी स्त्रीयांचे शिक्षण तळागाळापर्यंत पोहचलेले

नाही. म्हणून स्त्रीयांना शिक्षण देवून त्यांची परंपरागत दुःस्थिती बदलावयास हवी. अंगणवाडी हे पुढील शिक्षणाचा मूळ पाया आहे. त्यासाठी प्रशिक्षित किंवा पदवीधर शिक्षिकांची नेमणूक करावी. संशोधकाने संशोधन करीत असलेल्या प्रकल्पांतर्गत पदवीधर शिक्षिकांचे प्रमाण फारच कमी आहे. अंगणवाडी शिक्षिकामध्ये एकूण १८१ शिक्षिकापैकी फक्त १० पदवीधर शिक्षिका आहेत. हे प्रमाण फारच कमी आहे. त्यासाठी स्त्रीयांना शिक्षण घेण्यास प्रोत्साहन दिले पाहिजे. अंगणवाडी शिक्षिकांचे पदवीधर प्रमाण किती आहे याविषयी माहिती गोळा केली आहे ती माहिती खालील कोष्टकात वर्णण केलेली आहे

कोष्टक क्रमांक ५

आपण पदवीधर आहात काय?

| अ.क्र. | आपण पदवीधर आहात काय? | शिक्षिकांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | होय म्हणणा-या शिक्षिका | १० | ५.६ |
| २) | नाही म्हणणा-या शिक्षिका | १७१ | ९४.४ |
| | एकूण | १८१ | १०० |

वरील कोष्टकावरुन असे म्हणता येईल की, अंगणवाडी शिक्षिका म्हणून काम करीत असलेल्या शिक्षिकापैकी फक्त १० शिक्षिका पदवीधर आहेत. अंगणवाडी शिक्षिकांचे पदवीधर प्रमाण ५.६ टक्के आहे. अंगणवाडी शिक्षिका क्वचितच पदवीधर आहेत. ब-याच शिक्षका पदवीधर नाहीत अशा शिक्षिकांचे प्रमाण फारच आहे. पधवीधर नाही म्हणणा-या अंगणवाडी शिक्षिकांचे प्रमाण ९४.४ टक्के आहे.

अंगणवाडी शिक्षण हे मुलांच्या शिक्षणाचा मूळ पाया आहे. जर का शिक्षणाचा पायाच मजबूत नसेल तर पुढील शिक्षण हे अवघड जाते. पाया मजबूत करण्यासाठी अंगणवाडी शिक्षिका ह्या किमान पदवीधर तरी असव्यात. वरील

कोष्टकावरुन पदवीधर नसण्याचे प्रमाण फारच आहे. अंगणवाडी शिक्षिकांना शासनामार्फत मुक्त शिक्षणाद्वारे पदवीधर होण्यास प्रोत्साहन द्यावे. ग्रामणि विभागातील शिक्षिकांना सुट्टीतील कोर्स करावयास काही सवलती द्याव्यात.

## ६.५ *आपण पदवीधर नसल्यामुळे अध्यापनात अडचणी येतात काय?*

अध्यापन शब्द जो इंग्रजीतील Teaching या शब्दाचा पर्याय म्हणून वापरला जातो. या शब्दाचा अर्थ इंग्रजी शब्दकोशामध्ये पुढीलप्रमाणे दिलेला आहे. The art of assisting another to learn याचा अर्थ एखदया व्यक्तीला अध्यापन करण्यासाठी मदत करणारी कला म्हणजे अध्यापन असा सांगता येइल. अध्यापन म्हणजे अशी प्रक्रिया की ज्या द्वारे एक व्यक्ति दुस-या व्यक्तिला ज्ञान, कौशल्य व कला संपादन करण्यास मदत करते म्हणून यासाठी उच्च शिक्षण असायलाच पाहिजे असे नाही अध्यापन करण्यास पदवीधरच पाहीजे असे नाही परंतु अध्यापन करताना पदवीधर नसल्यामुळे थोडयाफार अडचणी येतील परंतु अध्यापनास पदवीधरच असले पाहीजे असे नाही.

अध्यापन करताना शिक्षिकेला पूर्ण ज्ञान असले पाहिजे शिक्षिका पदवीधर असले तर नविन संकल्पनांचे स्पष्टीकरण व्यवस्थीत मांडता येते. पाठयांशाचे स्पष्टीकरण करता येते. अध्यापन साहित्याचा वापर योग्य रितीने करता येते. अध्यापन करताना पदवीधर नसल्यामुळे शिक्षिकेला कोणत्या अडचणी येतात किंवा नाही याविषयी माहिती गोळा केली आहे.

### कोष्टक क्रमांक ६

### आपण पदवीधर नसल्यामुळे अध्यापनात अडचणी येतात काय?

| अ.क्र. | पदवीधर नसल्यामुळे अध्यापनात अडचणी येतात काय? | शिक्षिकांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | होय म्हणणा-या शिक्षिका | ५० | २७.६ |
| २) | नाही म्हणणा-या शिक्षिका | १३१ | ७२.४ |
| | एकूण | १८१ | १०० |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, अंगणवाडी शिक्षिकेला अध्यापन कार्यासाठी किमान अंगणवाडी कोर्सेस करणे आवश्यक आहे. परंतु अंगणवाडी शिक्षिकेला पदवी पाहिजे असे काही नियम अगर अटी नाहीत. शिक्षिका जर पदवीधर असेल तर मुलांमध्ये नवीन संकल्पना मांडता येते. अधिकाधिक ज्ञान मुलांपर्यंत पोहचवता येते. पदवीधर नसल्यामुळे अध्यापनात अडचणी येतात असे म्हणना-या शिक्षिकांचे प्रमाण २७.६ टक्के इतके आहे. पदवीधर नसल्यामुळे अध्यापनात अडचणी येत नाहीत असे म्हणणा-या शिक्षिकांचे प्रमाण ७२.४ टक्के इतके आहे. अंगणवाडी शिक्षिकांना शासनामार्फत मुक्त विद्यापीठाद्वारे पदवी पूर्ण करण्यास प्रोत्साहन दिले पाहीजे. योग्य त्या सवलती देवून शिक्षण घेण्यास मदत केली पाहिजे.

### ६.६ *अध्यापनात अडचणी येत असल्यास खालीलपैकी कोणत्या अडचणी येतात ?*

पूर्वी यशस्वीपणे शिकविण्यासाठी विषयाचे संपूर्ण ज्ञान व विषयाची आवड असणे जरुरी होते. त्यावेळी शिक्षणशास्त्र व मानसशास्त्र विकसित झाले नव्हते. त्यामुळे शिक्षकाला इतर बाबींची जरुरी भासत नसे. पण आता प्रयोग व संशोधन यामुळे अध्यापनाच्या विविध पध्दती झाल्या आहेत. निरनिराळी अध्यापन

साधने निर्माण केली जात आहेत. त्यामध्ये शैक्षणिक तंत्रज्ञानाचा मोठा भाग येत आहे. ज्याना शिकवायचे त्यांचे बालमानसशास्त्र विकसित झाले आहे. विद्यार्थ्यांचा कसा व का मिळवावा याचे विशिष्ट नियम तयार केले आहेत.

शिक्षकाने शिकविण्यापूर्वी पाठाची पूर्व तयारी कशी करायची, पाठाची रुपरेषा नूतन अध्यापन पध्दतीप्रमाणे कशी तयार करायची याचे मार्गदर्शन पाठनिरीक्षकाकडून घ्यावयास पाहिजे. प्रत्यक्ष वर्गात शिकवित असताना वर्गात शिस्त कशी राखावयाची, प्रश्न कोणते व कसे विचारायचे, विद्यार्थ्यांच्या प्रश्नोत्तराची योग्य रितीने संभावना कशी करायची इत्यादी बाबी होतकरु शिक्षिकेना शिकव्यात. परंतु कांही काही शिक्षिकांना अध्यापन करताना नविन संकल्पनाचे स्पष्टिकरण योग्य रितीने करता येत नाही. काही शिक्षिकांना पाठयांशाचे सपष्टीकरण करताना अडचणी येतात. काही शिक्षिकाना अध्यापन साहित्याचा वापर व्यवस्थित करता येत नाही तर काही शिक्षिकाना व्याकरणाचे अध्यापन व्यवस्थित करता येत नाही. याविषयी माहिती गोळा केली आहे ती खालील प्रमाणे.

## कोष्टक क्रमांक ७

### अध्यापनात अडचणी येत असल्यास खालील पैकी कोणत्या अडचणी येतात?

| अ.क्र. | अध्यापनात अडचणी येत असल्यास खालील पैकी कोणत्या अडचणी येतात? | शिक्षिकांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | नविन संकल्पनाचे स्पष्टीकरण व्यवस्थित करता येत नाही. | ६५ | ३५.९ |
| २) | पाठयांशाचे स्पष्टीकरण व्यवस्थित करता येत नाही. | ५३ | २९.२ |
| ३) | अध्यापन साहित्याचा वापर व्यवस्थित करता येत नाही. | २१ | ११.६ |
| ४) | व्याकरणाचे अध्यापन व्यवस्थित करता येत नाही. | ४२ | २३.३ |
| | एकूण | १८१ | १०० |

विद्यार्थ्यांना केवळ ज्ञानदान करुन भागत नाही. नवीन शिक्षणशास्त्राप्रमाणे शिक्षणाचे अंतिम उद्दिष्टे विद्यार्थ्यांचा शारिरीक, मानसिक, बौध्दिक व सामाजिक विकास म्हणजे सर्वागिण विकास होय. विद्यार्थी हा समाजाचा एक जबाबदार नागरीक बनला पाहिजे. आपल्या लोकतांत्रिक देशात त्याला लोकशाहीनिष्ठ जीवन जगता आले पाहिजे त्यासाठी शिक्षिकांना अध्ययन अध्यापनात येणा-या अडचणीना दूर करावे लागेल. वरील कोष्टकावरुन असे म्हणता येईल की, नवीन संकल्पनाचे स्पष्टीकरण व्यवस्थित करता येत नाही असे म्हणणा-या शिक्षिकांचे प्रमाण ३५.९ टक्के आहे. पाठयांशाचे स्पष्टीकरण व्यवस्थित करता येत नाही असे म्हणणा-या शिक्षिकांचे प्रमाण २९.२ टक्के आहे. अध्यापन साहित्याचा वापर व्यवस्थित करता येत नाही असे म्हणणा-या शिक्षिकांचे प्रमाण

११.६ टक्के आहे. व्याकरणाचे अध्यापन व्यवसिथत करता येत नाही असे म्हणणा-या शिक्षिकांचे प्रमाण २३.३ टक्के आहे. त्या अडचणी दूर केल्या पाहिजेत.

## ६.७ *अंगणवाडी प्रशिक्षणात खालीलपैकी कोणत्या बाबीचे प्रशिक्षण दिले आहे.*

आजचा विद्यार्थी संपर्क साधण्याच्या साह्याने बहुश्रुत होत आहे. अशा विद्यार्थ्यांना शिकविणारा शिक्षक पुर्वीसारखा एकमार्गी असून चालणार नाही तर त्याला बहुमार्गी बनावे लागेल. या विवेचनावरुन हे स्पष्ट होईल की आजच्या शिक्षणशास्त्राचा व अध्यापन पध्दतीचा आवाका फार मोठा आहे. शिक्षिकांच्या अंगी शिकविण्याची कला जन्मसिध्द असो किंवा नसो शिक्षणक्षेत्रात जो प्रवेश करु इच्छितो त्याला (प्रशिक्षित) प्रशिक्षण घेतलेच पाहिजे उत्कृष्ट व पध्दतशीर आणि अद्यवत शिक्षिकांचे व उगवत्या पिढीचे हित सांभाळू शकेल सर्व राष्ट्रे शिक्षिकांच्या प्रशिक्षणावर श्रम, शक्ती व द्रव्य ब-याच प्रमाणात खर्च करीत आहे. शिक्षिकांना तयार करण्याचे काम म्हणजेच प्रशिक्षित करण्याचे कार्य प्रशिक्षण विद्यालयावर येवून पडते.

अंगणवाडी प्रशिक्षण विद्यालयामध्ये अनेक प्रशिक्षण पध्दती आहेत. त्यापैकी लेखन पध्दती, वाचन पध्दती, श्रवण पध्दती, संवाद पध्दती इ. पध्दती आहेत. त्यापैकी कोणत्या पध्दतीमध्ये अंगणवाडी शिक्षिकांनी प्रशिक्षण घेतलेले आहे. याविषयी माहिती गोळा करण्यात आलेली आहे. ते खालील प्रमाणे आहे.

## कोष्टक क्रमांक ८

**अंगणवाडी प्रशिक्षणात खालीलपैकी कोणत्या बाबीचे प्रशिक्षण दिले आहे?**

| अ.क्र. | अंगणवाडी प्रशिक्षणात खालीलपैकी कोणत्या बाबीचे प्रशिक्षण दिले आहे? | शिक्षिकांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | लेखन | ५० | २७.४ |
| २ | वाचन | ३२ | १७.५ |
| ३ | श्रवण | ४३ | २४.६ |
| ४ | संवाद | २१ | ११.४ |
| ५ | इतर | ३५ | १९.१ |
| | एकूण | १८१ | १०० |

वरील कोष्टकावरून असे दिसून येते की अंगणवाडी प्रशिक्षणात लेखन प्रशिक्षण घेतलेले होते असे म्हणणा-या शिक्षिकांचे प्रमाण २७.४ टक्के इतके आहे. वाचन पध्दती प्रशिक्षण घेतलेले आहे असे म्हणणा-या शिक्षिकांचे प्रमाण १७.५ टक्के इतके आहे. श्रवणपध्दती प्रशिक्षण घेतलेले होते असे म्हणणा-या शिक्षिकांचे प्रमाण २४.६ टक्के इतके आहे. संवाद पध्दती प्रशिक्षण घेतलेले होते असे म्हणणा-या शिक्षिकांचे प्रमाण ११.४ टक्के इतके आहे. इतर पध्दती अनेक आहेत त्या पध्दतीत प्रशिक्षण घेतलेल्या शिक्षिकांचे प्रमाण १९.१ टक्के इतके आहे. अशा त-हेने विविध पध्दती आहेत त्या पध्दतीचा उपयोग करून मुलांचा सर्वांगिण विकास करावा.

## ६.८ *अंगणवाडी प्रशिक्षणाचा अध्यापनात खालीलपैकी कसा उपयोग होतो?*

संपूर्ण आनंद समितीने नमूद केले आहे की शिक्षिकांचा राष्ट्रीय दृष्टीकोन तयार करणे, नागरीकत्वाची व एकतेची जाणीव तसेच सांस्कृतिक व बौध्दीक एकात्मिकता निर्माण करणे ही जबाबदारी शिक्षिकांच्या प्रशिक्षणावर आहे.

शिक्षक आयोगाने १९६४ - १९६६ शिक्षकांच्या गुणवत्तेला महत्व दिले आहे. भारताचे भवितव्य शाळेच्या वर्गात घडविले जाते. विज्ञान व तंत्रज्ञान यावर आधारीत होत असलेल्या जगात लोकांचे कल्याण, संरक्षण, वैभव साध्य करण्यासाठी शिक्षणच उपयुक्त ठरणार आहे. राष्ट्रीय विकासासाठी वर शिक्षणाची गुंणवत्ता वाढविण्यासाठी जे काही घटक प्रभावी ठरतात. त्यामध्ये सर्वात महत्वाचा घटक म्हणजे सुरक्षित गुंणवंत व चारित्र्यसंपन्न शिक्षकच होय. त्यासाठी शिक्षिका प्रशिक्षण असले पाहिजे. अध्यापन करताना प्रशिक्षणाचा पुरेशा प्रमाणात उपयोग होतो. आधुनिक तंत्राचे अध्ययन - अध्यापन पध्दतीचा वापर केला पाहिजे. त्यातून योग्य त्या विकासाची व दर्जेदार शिक्षण आवश्यक आहे.

अंगणवाडी प्रशिक्षणाचा अध्यापनात पुरेशा प्रमाणात उपयोग होतो अथवा मध्यम प्रमाणात उपयोग होतो किंवा उपयोग होत नाही याविषयी माहिती खालीलप्रमाणे गोळा करण्यात आली आहे. ती माहिती खालीलप्रमाणे.

## कोष्टक क्रमांक ९

### अंगणवाडी शिक्षणाचा प्रशिक्षणाचा अध्यापनात खालीलपैकी कसा उपयोग होतो?

| अ.क्र. | अंगणवाडी शिक्षणाचा प्रशिक्षणाचा अध्यापनात खालीलपैकी कसा उपयोग होतो? | शिक्षिकांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | पुरेशा प्रमाणात | ६० | ३३.१ |
| २) | मध्यम प्रमाणात | ४७ | २५.९ |
| ३) | अल्प प्रमाणात | ५३ | २९.४ |
| ४) | उपयोग होत नाही | २१ | ११.६ |
| | एकूण | १८१ | १०० |

वरील कोष्टकावरून असे दिसून येते की अंगणवाडी प्रशिक्षणाचा अध्यापनात पुरेशा प्रमाणात उपयोग होतो असे म्हणणा-या शिक्षिकांचे प्रमाण ३३.१ टक्के आहे. अंगणवाडी प्रशिक्षणाचा अध्यापनात मध्यम प्रमाणात उपयोग होतो असे म्हणणा-या शिक्षिकांचे प्रमाण २५.९ टक्के इतके आहे.

अंगणवाडी प्रशिक्षणाचा अध्यापनात अल्प प्रमाणात उपयोग होतो असे म्हणणा-या शिक्षिकांचे प्रमाण २९.४ टक्के इतके आहे. परंतु अंगणवाडी प्रशिक्षणाचा अध्यापनात उपयोग होत नाही असे म्हणणा-या शिक्षिकांचे प्रमाण ११.६ टक्के इतके आहे. अशा प्रकारे अंगणवाडी शिक्षिका ह्या प्रशिक्षित असाव्यात अध्ययन अध्यापन करताना प्रशिक्षणाचा फार उपयोग होतो. मुलांच्या सर्वांगिण विकास होण्यास पुरेपुर मदत होते.

## ६.९ प्रशिक्षणात खालीलपैकी कोणती अध्यापन पध्दती घेतली होती

शिक्षकाला अध्यापन पध्दतींचे ज्ञान व शिकवयाच्या विषयाचे पुरेसे ज्ञान असणे आवश्यक व महत्वाचे आहे. पण तेवढेच शिक्षकाचे व्यक्तिमत्व, शिक्षकाचे तत्वज्ञान आणि समाज यांचेही फार महत्व आहे.

आधुनिक काळात शिक्षणात महत्वाची सुधारणा घडून येताना दिसत आहे. प्रशिक्षणात विविध अध्यापन पध्दती आहेत. परिसंवात पध्दती, व्याख्यान पध्दती प्रश्नोत्तर पध्दती, स्वयं अध्यापन पध्दती, सेमीनार पध्दती, चर्चा पध्दती, सामुहिक पध्दती अशा अनेक पध्दती आहेत. त्यापैकी कोणत्या पध्दतीचा वापर केला जातो याविषयी प्रश्नावली द्वारे माहिती मिळविण्यात आली आहे. ती माहिती खालील प्रमाणे गोळा करण्यात आलेली आहे.

**कोष्टक क्रमांक १०**

**प्रशिक्षणात खालीलपैकी कोणती अध्यापन पध्दती घेतली होती?**

| अ.क्र. | प्रशिक्षणात खालीलपैकी कोणती अध्यापन पध्दती घेतली होती? | शिक्षिकांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | परिसंवाद पध्दती | १८ | ९.९ |
| २) | व्याख्यान पध्दती | ३२ | १७.६ |
| ३) | प्रश्नोतरे पध्दती | २२ | १२.१ |
| ४) | स्वयं अध्यापन पध्दती | ३२ | १७.६ |
| ५) | सेमीनार पध्दती | २४ | १३.२ |
| ६) | चर्चा पध्दती | ३३ | १८.२ |
| ७) | सामुहिक पध्दती | २० | ११.४ |
| | एकूण | १८१ | १०० |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येत की अंगणवाडी शिक्षणात प्रशिक्षण घेताना अनेक अध्यापन पध्दती आहेत. त्यापैकी परिसंवाद पध्दतीचा प्रशिक्षण पध्दती घेतली होते असे म्हणणा-या शिक्षिकांचे प्रमाण ९९ टक्के इतके आहे. व्याख्यान पध्दतीचे प्रशिक्षण घेतले आहे आहे असे म्हणणा-या शिक्षिकांचे प्रमाण १७.६ टक्के आहे. प्रशिक्षणात प्रश्नोत्तर पध्दती घेतली होती असे म्हणणा-या शिक्षकाचे प्रमाण १२.१ टक्के आहे. स्वयं अध्यापन पध्दती व सेमीनार पध्दती घेतली होती असे म्हणणा-या शिक्षिकांचे प्रमाण अनुक्रमे १७.६ व १३.२ टक्के आहे. चर्चा पध्दती व सामुहिक पध्दती घेतली होती असे म्हणणा-या शिक्षिकांचे प्रमाण अनुक्रमे १८.२ व ११.४ टक्के इतके आहे.

## ६.१० *अध्यापनात अध्यापन पध्दतीचा वापर करताना खालीलपैकी कोणत्या अडचणी येतात?*

शिक्षण प्रक्रियेत शिक्षक आणि विद्यार्थी यांचे परस्पर संबध सलोख्याचेच असले पाहिजेत. शिवाय शिक्षिकेला आपल्या शिक्षिकी व्यवसायाबद्दल जिव्हाळा व अभिमान असला पाहिजे. क्षणोक्षणी शारिरीक व मानसिक विकासक्षम असा उमलणा-या छोटया जीवांच्या सहवासात शिक्षकाला आनंद वाटला पाहिजे.

अध्यापनात अध्यापन पध्दतीचा वापर करताना अनेक अडचणी येतात अध्यापनात अध्ययन पध्दती घटक व अध्यापन पध्दती यांची सांगड घालताना अडचणी येतात. पाठयांशानुसार शैक्षणिक साहित्याचा वापर करताना अडचणी येतात अध्यापन प्रभावी होत नाही त्यामुळे मूळ संकल्पना स्पष्ट करता येत नाही. याविषयी कोणत्या अडचणी येतात यासंबधी माहिती खालीलप्रमाणे गोळा करण्यात आली.

## कोष्टक क्रमांक ११

## अध्यापनात अध्यापन पध्दतीचा वापर करताना खालील पैकी कोणत्या अडचणी येतात?

| अ.क्र. | अध्यापनात अध्यापन पध्दतीचा वापर करताना खालील पैकी कोणत्या अडचणी येतात? | शिक्षिकांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | घटक व अध्यापन पध्दती यांची सांगड घालता येत नाही? | ५६ | ३०.९ |
| २) | पाठयांशानुसार शैक्षणिक साहित्याचा वापर करता येत नाही | ३८ | २१.७ |
| ३) | अध्यापन प्रभावी होत नाही. | ५९ | ३२.५ |
| ४) | मूळ संकल्पना स्पष्ट करता येत नाही | २७ | १४.९ |
| | एकूण | १८१ | १०० |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, अध्यापनात अध्यापन पध्दतीचा वापर करताना अनेक अडचणी येतात अध्यापनात अध्यापन पध्दतीचा वापर करताना घटक व अध्यापन पध्दती यांची सांगड घालता येत नाही असे म्हणणा-या शिक्षिकांचे प्रमाण ३०९ टक्के इतके आहे. पाठयांशानुसार शैक्षणिक साहित्याचा वापर करता येत नाही असे म्हणणा-या शिक्षिकांचे प्रमाण २१.७ टक्के इतके आहे.

अध्यापन प्रभावी होत नाही असे म्हणणा-या शिक्षिकांचे प्रमाण ३२५ टक्के इतके आहे. मूळ संकल्पना स्पष्ट करता येत नाही असे म्हणणा-या शिक्षिकांचे प्रमाण १४.९ टक्के इतके आहे अशा प्रकारे अनेक अडचणी येतात त्या दूर करुन

मुलांच्या सर्वांगिण विकासास मदत करावी. अध्ययन - अध्यापन प्रक्रियेमधील अडचणी दूर करुन अध्यापन प्रक्रियेत सुधारणा करावी.

## ६.११ *आपण पाठयांश व अध्यापन पध्दती यांची सांगड घालता काय?*

कोणताही विषय शिकविताना त्यांची उद्दिष्टे कोणती व त्या उद्दिष्टामुळे विद्यार्थ्यांच्या वर्तनात कोणता बदल घडून येईल यांचा विचार शिक्षकाने केला पाहिजे. यादृष्टीने या प्रकरणात विविध विषयांचा विचार करावयाचा आहे. ज्ञान, आकलन, उपयोजन, कौशल्य, अभिवृत्ती, अभिरुची, रसग्रहण, समायोजन अंगणवाडी शाळेत या स्तरांचा विचार करुन शिकविला पाहिजे. अंगणवाडी स्तरावर मुलांना शिकवितांना मुलांच्या बुध्दीनुसार शिकवले जाते. पाठयांश व अध्यापन पध्दती यांची सांगड घालावी लागते. अंगणवाडी शाळेत मातृभाषा शिकविताना लेखन, वाचन, श्रवण या कौशल्यावर भर दिला जातो. अंगणवाडी शिक्षिका पाठयांश व अध्यापन पध्दती यांची सांगड घालतात किंवा नाही याविषयी विविध माहिती गोळा करण्यात आली ती खालीलप्रमाणे आहे.

### कोष्टक क्रमांक १२

### आपण पाठयांश व अध्यापन पध्दती यांची सांगड घालता काय?

| अ.क्र. | आपण पाठयांश व अध्यापन पध्दती यांची सांगड घालता काय? | शिक्षिकांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | होय म्हणणा-या शिक्षिका | १२३ | ६७.९ |
| २) | नाही म्हणणा-या शिक्षिका | ५८ | ३२.१ |
| | एकूण | १८१ | १०० |

वरील कोष्टकावरून असे दिसून येते की, अंगणवाडी शिक्षिका पाठयांश व अध्यापन पध्दती यांची सांगड घालतात असे म्हणणा-या शिक्षिकांचे प्रमाण ६७.९ टक्के इतके आहे. हे प्रमाण म्हणावे तितके योग्य नाही. अंगणवाडी शिक्षिका पाठयांश व अध्यापन पध्दती यांची सांगड घालता येत नाही असे म्हणणा-या शिक्षिकांचे प्रमाण ३२.१ टक्के आहे. अशा प्रकारे अंगणावाडी शिक्षिकांनी ज्यांनी पाठयांश व अध्यापन पध्दती यांची सांगड घालता येत नाही त्यांनी पाठयांश व अध्यापनाची सांगड घालून मुलांना शिकविले पाहिजे. तरच मुलांचा सर्वांगिण विकास होण्यास मदत होते.

## ६.१२ *अध्यापन करतांना शैक्षणिक साहित्याचा वापर करता काय?*

व्यक्तिगत अध्ययन हे कितीही महत्वाचे असले तरी अध्यापनाच्या दृष्टीने एकेका व्यक्तिला अध्यापन करणे व्यवहार्य ठरत नाही. सर्वांसाठी शिक्षण ही संकल्पना मान्य केल्यानंतर शिक्षण घेणा-यांची संख्या प्रचंड असणे हे ओघानेच येते या मोठया संख्येने शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना व्यक्तिगत अध्यापन करणे देखील कठीण होवून बसते अध्यापन करताना शैक्षणिक साहित्याचा वापर केला तर मुलांचे अवधान टिकून राहते. शैक्षणिक साहित्याचा वापर केला तर मुलांना जातीत जास्त प्रमाणात समजते व समजण्यास कठिण जात नाही. तसेच शिकविलेला भाग मुलांच्या चटकन लक्षात येतो. अध्यापन करताना शैक्षणिक साहित्याचा उपयोग केला जातो किंवा नाही याबाबात माहिती गोळा करण्यात आली ती माहिती खालीलप्रमाणे आहे

कोष्टक क्रमांक १३

<u>अध्यापन करताना शैक्षणिक साहित्याचा वापर करता काय?</u>

| अ.क्र. | शैक्षणिक साहित्याचा वापर करता काय ? | शिक्षिकांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय म्हणणा-या शिक्षिका | १५९ | ८७.८ |
| २ | नाही म्हणणा-या शिक्षिका | २२ | १२.२ |
| | एकूण | १८१ | १०० |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते अध्ययन - अध्यापन करताना शैक्षणिक साहित्याचा वापर करतात असे म्हणना-या शिक्षिकांचे प्रमाण ८७.८ टक्के आहे. अध्ययन अध्यापन करताना शैक्षणिकि साहित्याचा वापर करत नाही असे म्हणणा-या शिक्षिकांचे प्रमाण १२.२ टक्के आहे. शैक्षणिक साहित्याचा वापर करत नाही. असे म्हणना-या शिक्षिकांचे प्रमाण १२.२ टक्के आहे. शैक्षणिक साहित्याचा वापर करत नाही असे म्हणणा-या शिक्षिकांची प्रमाण अत्यंत अल्प आहे तरी या शिक्षिकांनी शिक्षणासाठी लागणा-या शैक्षणिक साहित्याचा वापर करावा. शैक्षणिक साहित्याचा वापर केल्यामुळे मुलांच्या अध्यनात सुधारणा घडून येताव व त्यांना शिक्षणाची गोडी लागते. मुलांच्या अध्यनात सर्वांगिण विकास केला पाहीजे. शैक्षणिक साहित्याचा वापर न करणा-या शिक्षिकांनी शैक्षणिक साहित्याचा वापर केला पाहिजे.

## ६.१३ *अध्यापन करताना खालील पैकी कोणकोणत्या शैक्षणिक साहित्याचा वापर करता?*

अध्ययन, अध्यापन करताना नव्या नव्या शैक्षणिक साधनाचा उपयोग केला जात आहे. अध्यापन करताना मुलांना निट समजण्यासाठी विविध शैक्षणिक साधनाचा वापर होवू लागला. त्यामध्ये नकाशे, चित्र, फ्लेश, कार्ड, तक्ते, टी.व्ही., रेडीओ, टेप, पट्टया, इत्यादी शैक्षणिक साहित्याचा वापर करता येतो. अध्यापन करताना शैक्षणिक साहित्याच्या वापरामुळे मुलांना लवकर समजण्यास मदत होतो. त्यासाठी अंगणवाडी शिक्षकांनी अध्यपन करताना शैक्षणिक साहित्याचा उपयोग करता किंवा नाही याविषयी माहिती खालील प्रश्नावली मार्फत गोळा करण्यात आली. ती माहिती खालील प्रमाणे.

### कोष्टक क्रमांक - १४

### अध्यापन करताना खालील पैकी कोणकोणत्या शैक्षणिक साहित्याचा वापर करता?

| अ.क्र. | शैक्षणिक साहित्याचा वापर करता काय ? | शिक्षिकांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | नकाशे, चित्र, फ्लॅश कार्ड, तक्ते, | ३६ | १९.९ |
| २) | नकाशे, चित्र, टेप, टिव्ही | ६३ | ३४.८ |
| ३) | चित्र, रेडिओ, टेप, तक्ते | ४८ | २६.६ |
| ४) | रेडिओ, टेप, तक्ते, पट्टया | ४३ | १८.७ |
| | एकूण | १८१ | १०० |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, अध्यापन करताना शैक्षणिक साहित्य वापर करतात पण कोणकोणत्या प्रकारची सहित्यांचा उपयोग अध्यापनात करतात. नकाशे, चित्र, फ्लॅशकार्ड, तक्ते यांचा वापर अध्यापन करताना



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

करतात असे म्हणणा-या शिक्षिकांचे प्रमाण १९.९ टक्के आहे. नकाशे, चित्र, टेप, टिव्ही, या शैक्षणिक साहित्याचा वापर करतात म्हणणा-या शिक्षिकांचे प्रमाण ३४.८ टक्के इतके आहे. फक्त चित्र, रेडिओ, टेप, तक्ते या शैक्षणिक साहित्याचा वापर करतात असे म्हणणा-या शिक्षिकांचे प्रमाण २६.६ टक्के इतके आहे आणि रेडिओ, टेप, तक्ते व पट्टया या शैक्षणिक साहित्याचा वापर करतात म्हणणा-या शिक्षिकांचे प्रमाण १८.७ टक्के इतके आहे. अशा प्रकारे शिक्षिकांनी जास्तीत जास्त शैक्षणिक साहित्याचा वापर करुन मुलांचा सर्वांगिण विकास घडवून आणण्यात मदत केली पाहिजे. तरच मुलांची प्रगती योग्य त्या दिशेने होईल.

## ६.१४ *आपल्या शाळेत शैक्षणिक साहित्य आहे काय?*

शिक्षणामध्ये अध्यापन हा घटक तर अत्यंत महत्वाचा होय. त्याद्वारे अध्ययनास चालना मिळते. उद्दिष्टे साध्य करण्यासाठी योग्य अध्ययन प्रसंग निर्माण करुन मुलांना अनुभव देण्याची आवश्यकता आहे. याची जाणीव शिक्षिकांना मूल्यमापन तंत्रामुळे झाल्याने त्याचे अध्यापन उद्दिष्टानुसार आदर्श असे होईल. ज्ञानाबरोबर विद्यार्थ्यांना कौशल्ये, उपयोगन क्षमता, विविध दृष्टीकोन इतयादी प्रवृत्ती वाढीस लागते. केवळ पुस्तकातील आशय मुलांना सांगणे ही प्रवृत्ती बदलून विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी आपले अध्यापन आहे याची जाणीव ठेवून शिक्षक आपले अध्यापन केले पाहिजे. काही काही शाळेत अध्यापन साहित्य नसते त्यावेळी अध्यापन कार्यात अडचणी येतात. अध्यापन करताना मुलांना शैक्षणिक साहित्याद्वारे अध्यापन केले पाहिजे. अंगणवाडी शाळेत अध्यापनासाठी शैक्षणिक साहित्य आहे किंवा नाही यासंबधी माहिती गोळा करण्यात आली ती माहिती खालील प्रमाणे.

## कोष्टक क्रमांक १५

## आपल्या शाळेत शैक्षणिक साहित्य आहेत काय?

| अ.क्र. | शैक्षणिक साहित्य | शिक्षिकांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय म्हणणा-या शिक्षिका | ३५ | १९.३ |
| २ | नाही म्हणणा-या शिक्षिका | १४६ | ८०.७ |
| | एकूण | १८१ | १०० |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की अंगणवाडी शाळेत शैक्षणिक साहित्य आहे असे म्हणणा-या शिक्षिकांचे प्रमाण १९.३ टक्के इतके आहे. तसेच अंगणवाडी शाळेत शैक्षणिक साहित्य नाही असे म्हणणा-या शिक्षिकांचे प्रमाण ८०.७ टक्के इतके आहे. अशा शाळांनी अंगणवाडी साहित्य उपलब्ध करावे. अंगणवाडी शाळेंमध्ये शैक्षणिक साहित्य असावे. कराण मुलांना समजण्यात मदत होते. तसेच मुलांचे अवधान टिकून राहण्यास मदत होते. अशा साहित्याचा वापर करुन मुलांचा सर्वांगिण विकास व्हावा हाच महत्वाचा हेतू शिक्षिकांनी अध्यापन करताना ठेवावा.

### ६.१५ *आपल्या शाळेत शैक्षणिक साहित्य उपलब्ध नसल्यास खालीलपैकी कोणते उपाय कराल?*

अध्यापन करताना शैक्षणिक साहित्याचा उपयोग हा महत्वाचा घटक आहे. अध्यापन करताना मुलांना शैक्षणिक साहित्यापासून योग्य ती माहिती मिळते व साहित्याच्या वापराने मुलांना समजण्यास सोपी जाते. अंगणवाडी शाळेत शैक्षणिक साहित्य उपलब्ध नसते. त्यावेळी शिक्षिकांनी स्वतः असे साहित्य तयार करावे किंवा विद्यार्थ्यांना तयार करण्यास सांगावे. त्याद्वारे मलांमधील सुप्त

गुणांना कलानांही वाव मिळण्यास मदत होते. आपल्या शाळेत जर शैक्षणिक साहित्याची कमतरता असेल तर असे साहित्य दुस-या शाळेतून असे साहित्य उपलब्ध करुन अध्यापन करावे. अध्यापन करताना शैक्षणिक साहित्य नसेल तर कसे उपलब्ध कराल याविषयी माहिती गोळा करण्यात आली. ती माहिती खालीलप्रमाणे.

कोष्टक क्रमांक १६

आपल्या शाळेत शैक्षणिक साहित्य उपलब्ध नसल्यास खालीलपैकी कोणते उपाय कराल?

| अ.क्र. | शैक्षणिक साहित्य उपलब्ध नसल्यास काय कराल? | शिक्षिकांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | स्वता तयार करतो | ७४ | ४०.८ |
| २) | विद्यार्थ्यांना तयार करायला सांगतो. | २० | ११.२ |
| ३) | शाळेकडे मागणी करतो. | ३५ | १९.३ |
| ४) | दुस-या शाळेतून उपलब्ध करतो. | ५२ | २८.७ |
| | एकूण | १८१ | १०० |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, अंगणवाडी शाळेत शैक्षणिक साहित्य उपलब्ध नसल्यास शिक्षिकांनी स्वतः तयार करतात असे म्हणणा-या शिक्षिकांच्या संख्येचे प्रमाण ४०.८ टक्के आहे. शाळेत साहित्य नसल्यास शिक्षिका विद्यार्थांकडून तयार करुन घेतो असे म्हणणा-या शिक्षिकांचे प्रमाण ११.२ टक्के इतके आहे. तसेच शैक्षणिक साहित्य उपलब्ध नसल्यास शाळेकडे मागणी करतो असे म्हणणा-या शिक्षिकांचे प्रमाण १९.३ टक्के इतके आहे. तर शैक्षणिक साहित्य उपलब्ध नसल्यास असे साहित्य दुस-या शाळेकडून उपलब्ध करुन घेतो असे म्हणणा-या शिक्षिकांचे प्रमाण २८.७ इतके आहे. अंगणवाडी शिक्षणात

शैक्षणिक साहित्याचे अन्यन्यसाधारण महत्व आहे म्हणून असे साहित्य उपलब्ध नसल्यास शिक्षिकांनी असे साहित्य उपलब्ध करण्याचा प्रयत्न करावा.

## ६.१६ *शैक्षणिक साहित्याचा वापर केल्याने खालीलपैकी कोणते हेतू साध्य होतात?*

अंगणवाडी शाळेतील मुले लहान असतात त्यामुळे त्यांना शैक्षणिक साहितयाशिवाय शिकविणे कठिण आहे. शैक्षणिक साहित्याचा वापर करुन शिकविल्याने विद्यार्थ्यांचे अवधान टिकून राहते. अध्यापन व अध्ययन करताना अशा सहित्याच्या वापराने अपेक्षित परीमाण साधता येतो. अध्ययनात मुलांची अभिरुची वाढते. अशा प्रकारे अंगणवाडी शाळेत शैक्षणिक साहित्य वापरल्याने अनेक हेतू साध्य करता येतात. शैक्षणिक साहित्याचा वापर केल्याने साध्य होणार हेतू कोणते याविषयी माहिती गोळा करण्यात आली ती खालीलप्रमाणे.

**कोष्टक क्रमांक १७**

शैक्षणिक साहित्याचा वापर केल्याने खालीलपैकी कोणते हेतू साध्य होतात?

| अ.क्र. | शैक्षणिक साहित्याचा वापर केल्याने कोणते हेतू साध्य होनात ? | शिक्षिकांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | विद्यार्थ्यांचे अवधान टिकून राहते | ६० | ३३.२ |
| २) | अध्यापन - अध्ययन परिणामकारक होते. | २६ | १४.४ |
| ३) | अध्ययनात अभिरुची निर्माण होते. | ४१ | २२.६ |
| ४) | विषयीची स्पष्ट कल्पना येते. | ५४ | २९.८ |
| | एकूण | १८१ | १०० |

वरील कोष्कावरुन असे दिसून येते की अध्यापन - अध्ययन करताना शैक्षणिक साधनाचा वापर केल्यामुळे अनेक हेतू साध्य होतात. त्यापैकी

विद्यार्थ्यांचे अवधान टिकून राहते असे म्हणणा-या शिक्षिकांचे प्रमाण ३३.१ टक्के इतके आहे. अध्यापन अध्ययन परिणामकारक होते असे म्हणणा-या शिक्षिकांचे प्रमाण १४.४ टक्के इतके आहे. तसेच शैक्षणिक साहित्याच्या वापराने अध्ययनात विद्यार्थ्यांची अभिरुची निर्माण होते असे म्हणणा-या शिक्षिकांचे प्रमाण २२.६ टक्के इतके आहे. तर शैक्षणिक साहित्याच्या वापराने विषयाची स्पष्ट कल्पना येते असे म्हणणा-या शिक्षिकांचे प्रमाण २९.८ टक्के इतके आहे. अशा प्रकारे शैक्षणिक साधनांच्या वापराने अनेक प्रकारचे हेतु साध्य होताना दिसतात.

## ६.१७ *आपल्या शाळेत ग्रंथालय आहे काय?*

अंगणवाडी शाळेत मुले येण्याचे प्रमाण फारच कमी असते. लहान मुलांना शाळेविषयी आवड अथवा रुची कमी प्रमाणात आढळते. मुलांना शिक्षण देताना शिक्षकांची अत्यंत महत्वाची भूमिका असते. त्यासाठी अंगणवाडी शिक्षिका प्रशिक्षित असणे अत्यंत महत्वाचे आहे. अंगणवाडी शिक्षिकेमध्ये मुलांचा सर्वांगिण विकास व त्यांना योग्य प्रकारचे ज्ञान देण्याची क्षमता असली पाहिजे. त्यासाठी अंगणवाडी शाळेत ग्रंथालय असायला हवे व त्यामध्ये योग्य असे संदर्भ ग्रंथ असालयला हवेत. अंगणवाडी शाळेच्या ग्रंथालयात संदर्भ ग्रंथ, शब्द संग्रह, चित्र संग्रह, कथा संग्रह, पुरवणी वाचन व इतर आवश्यक साहित्य असावे. याबाबत माहिती गोळा केली ती खालीलप्रमाणे.

कोष्टक क्रमांक : १८

आपल्या शाळेत ग्रंथालय आहे काय?

| अ.क्र. | शाळेत ग्रंथालय आहे काय? | शिक्षिकांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | होय म्हणणा-या शिक्षिका | ३५ | ९४.४ |
| २) | नाही म्हणणा-या शिक्षिका | १४६ | ८०.६ |
| | एकूण | १८१ | १०० |

वरील कोष्टकावरून असे दिसून येते की, अध्ययन - अध्यापन करताना शिक्षिकांना ग्रंथालयाचा उपयोग होतो. त्यासाठी अध्यापनात ग्रंथालयाची महत्वाची भूमिका असते. अंगणवाडी शाळेत ग्रंथालय उपलब्ध आहे असे म्हणणा-या शिक्षिकांचे प्रमाण ९४.४ टक्के इतके आहे. तर अंगणवाडी शाळेमध्ये ग्रंथालय उपलब्ध नाही असे म्हणणा-या शिक्षिकांचे प्रमाण ८०.६ टक्के इतके आहे. अशा शिक्षिकांनी शाळेत ग्रंथालयासाठी शासनाकडून अनुदान मिळवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. अंगणवाडी शाळेत ग्रंथालय नाही हे प्रमाण फारच जास्त आहे. त्यासाठी शिक्षिकांनी प्रयत्न केला पाहिजे. अध्यापनात आवश्यक साहित्य उपलब्ध करुन मुलांचा बौध्दिक, शारिरीक, मानसिक विकास घडविणयाचा प्रयत्न केला पाहिजे.

## ६.१८ *अंगणवाडी संदर्भ साहित्य मिळत नसल्यास आपण कोठून मिळवता?*

अध्ययन - अध्यापनासाठी शैक्षणिक साहित्य अत्यंत आवश्यक साधन आहे. अध्यापन करताना शिक्षिकांनी अध्यापन साहित्याचा वापर करुन शिकविला पाहिजे. त्यासाठी साहित्याचा भांडार अंगणवाडी शाळेत असणे अत्यंत आवश्यक

आहे. बहुतेक शाळेत या उलट चित्रच दिसते. अनेक शाळांमधून ग्रंथालय उपलब्धच नाही. त्यामुळे अनेक शिक्षिकांना संदर्भ साहित्य प्राथमिक शाळेतून किंवा माध्यमिक शाळेच्या ग्रंथालयातून किंवा खाजगी ग्रंथालयातून उपलब्ध करुन अध्यापनाचे कार्य करावे लागते. या विषयी गोळा केलेली माहिती खालीलप्रमाणे.

## कोष्टक क्रमांक १९

अंगणवाडी संदर्भ साहित्य मिळत नसल्यास आपण कोठून मिळविता?

| अ.क्र. | संदर्भ साहित्य मिळत नसल्यास कोठून मिळविता ? | शिक्षिकांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | प्राथमिक शालेय ग्रंथालय | २७ | १४.९ |
| २) | माध्यमिक शालेय ग्रंथालय | ५१ | २८.१ |
| ३) | महाविद्यालयीन ग्रंथालय | ६३ | ३४.८ |
| ४) | सार्वजनिक ग्रंथालय | ४० | २२२ |
| | एकूण | १८१ | १०० |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, अंगणवाडी शाळेत शैक्षणिक साहित्य उपलब्ध नसल्यास शाळेतील शिक्षिकांनी प्राथमिक ग्रंथालयातून शैक्षणिक साहित्य मिळवतात असे म्हणणा-या शिक्षिकांचे प्रमाण १४.९ टक्के इतके आहे. तर माध्यमिक शालेय ग्रंथालयातून शैक्षणिक साहित्य मिळवतात असे म्हणणा-या शिक्षिकांचे प्रमाण २८.१ टक्के इतके आहे. तर महाविद्यालयातील ग्रंथालयातून साहित्य मिळवते असे म्हणणा-या शिकक्षिकांचे प्रमाण ३४.८ टक्के इतके आहे. तसेच सार्वजनिक ग्रंथालयातून लागणारे संदर्भ साहित्य मिळवण्या-या शिक्षिकांचे प्रमाण २२.२ टक्के इतके आहे. अशा प्रकारे शिक्षिका विविध ग्रंथांलयातून संदर्भ

साहित्य मिळवताना दिसतात. तरी अंगणवाडी शाळांनी आपल्या शाळेतच संदर्भ साहित्य शिक्षिकांना मिळवून देण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

### ६.१९ *शिक्षिका शिकवित असलेला वर्गगट*

अंगणवाडी शिक्षण हे या वयोगटाच्या बालविकासानुरूपच असले पाहिजे. म्हणून तीने ते पाच वयोगटातील मुलांचे मानसशास्त्र लक्षात घेवून त्यांची वयोगटानुसार वर्गगटात विभागणी केली पाहिजे. वय गटानुसार विभागणी केल्यामुळे या वयातील मुलांची एक मानसिक गरज पुरविली जाते. कारण या वयोगटातील मुलांना ऐकलकोंडेपणाचे जीवन आवडत नाही. समवयस्क सवंगडयात राहावे, खेळावे, बागडावे त्यांच्याबरोबर अभ्यास करावा असे वाटत असते.

मुलांवर प्रसंगी त्यांच्यावर प्रेम करावे, राग धरावा, भांडावेही आणि पुन्हा सर्व विसरुन एक व्हावे ही या वयातील मुलांची वागण्याची पध्दत असते. हा त्यांचा एक प्रकारचा त्या काळातील स्थायीभावच याला पोषक असे वातावरण एकाच वयोगटातील वर्गात मिळते. म्हणून या स्तरावरील शाळांमध्ये मुलांना वयोगटानुसार कसे शिक्षण दिले जाते या विषयी माहिती गोळा करणयात आली. ती खालील प्रमाणे.

## कोष्टक क्रमांक २०

### शिक्षिकां शिकवित असलेला वर्गगट कोणता आहे?

| अ.क्र. | शिक्षिका शिकवित असलेला वर्गगट | शिक्षिकांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | लहान शिशु | २५ | १३.८ |
| २) | मोठा शिशु | २५ | १३.८ |
| ३) | दोन्ही गट एकत्र | १३१ | ७२.४ |
| | एकूण | १८१ | १०० |

या वयोगटातील मुलांचे बालमानसशास्त्र लक्षात घेवून त्यांची वयोगटानुसार लहान शिशु व मोठा शिशु या मध्ये विभागणी करणे शैक्षणिक दृष्टीने योग्य असते. परंतु वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, लहान शिशु व मोठा शिशु या गटांना अस्थापन करणा-या शिक्षिकांचे प्रमाण प्रत्येकी १३.८ टक्के आहे. हे प्रमाण अतिशय कमी आहे.

दोन्ही गट एकत्र करुन अध्यापन करणा-या शिक्षिकांचे प्रमाण ७२.४ टक्के इतके आहे. या वरुन असे म्हणता येईल की ग्रामीण विभागातील शाळांमध्ये मुलांच्या वयोगटानुसार विभागणी न करता तीन ते पाच वयोगटातील मुलांना एकत्र करुन अध्ययन करण्याचे प्रमाण जास्त आहे. ग्रामीण विभागात दोन स्वतंत्र गटाना शिक्षिका उपलब्ध होत नाहीत. हे प्रामुख्याने आढळून आले आहे. तसेच आर्थिक दृष्टयाही ते परवडयण्यासारखे नाही. असे मुलाखती व निरीक्षणावरुन दिसून आले आहे.

## ६.२०  अंगणवाडी शाळामधील मुलांची संख्या

अंगणवाडी शाळेतील मुलांच्या संख्येवरुन शाळा लहान आहे की मोठा याची माहिती मिळत असते. ज्या शाळेत मुलांची संख्या जास्त असते. त्या शाळेतील मुलांना शिक्षिकांना वैयक्तिक लक्ष देता येत नाही. मुलांच्या संख्या कमी असेल तर मुलांची वैयक्तिक लक्ष देता येत नाही. मुलाच्या संख्या कमी असेल तर मुलांची वैयक्तिक लक्ष देता येतात. मुलांची सर्वांगिण विकासाकडे लक्ष देता येते. शासनाच्या धोरणानुसार मुलांना मोफत शिक्षण दिले जात आहे. मुलाना कसल्याही प्रकारच्या फी घेतल्या जात नाहीत. दक्षिण सोलापूर तालुक्यातील अंगणवाडी शाळंमध्ये मुलांची संख्या किती आहे. यासंबधी प्रश्नावली या साधनाद्वारे माहिती गोळा केली आहे ती खालील प्रमाणे आहे.

### कोष्टक क्रमांक २१

### मुलांच्या संख्येनुसार शाळा आहेत काय?

| अ.क्र. | मुलांची संख्या | शाळांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | १०० पर्यंत मुलांची संख्या | १८१ | १०० |
| २) | १०१ ते २०० पर्यंत | --- | --- |
| ३) | २०१ ते ३०० पर्यंत | --- | --- |
| ४) | ४०० पेक्षा जास्त | --- | --- |
| | एकूण | १८१ | १०० |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की १०० पर्यंत मुलांची संख्या असलेल्या शाळांची संख्या जास्त आहे. ग्रामीण विभागातील सर्वच शाळांमध्ये

मुलांची संख्या १०० पर्यंत आहे. म्हणजेच १०० पर्यंत मुांची संख्या असलेल्या शाळांचे प्रमाण १०० टक्के इतके आहे. १०१ ते २०० पर्यंत मुलांची संख्या व २०१ ते ३०० पर्यंत असलेली शाळा व ४०० पेक्षा जास्त मुलांची संख्या ह्या सर्व शाळांची संख्या एक पण नाही. काही ठिकाणी १०० पेक्षा कमी संख्या मुलांची शाळाही आहेत. सरासरी सर्व शाळा १०० पर्यंत मुलांची संख्या असलेली अंगणवाडी आहेत.

## ६.२१ वर्ग तुकडीत मुलांची संख्या

अंगणवाडी शाळेत एका वर्गतुकडीत किंवा वर्ग गटातील मुलांच्या संख्येला अतिशय महत्व आहे. वर्गतुकडीत मुलांची संख्या जादा असेल तर मुलांकडे वैयक्तिक लक्ष देता येत नाही. तसेच शाळेतील उपलब्ध साहित्य प्रत्येकाला देता येत नाही. याउलट मुलांची संख्या मर्यादित असेल तर वैयक्ति लक्ष देता येते. या वयोगटातील मुलांच्या प्रत्येक कृतीवर शिक्षिकेचे वैयक्तिक लक्ष असेणे आवश्यक आहे. यासाठी संशोधकाने प्रत्येक वर्गतुकडीत मुलांची संख्या किती आहे. यासंबधी माहिती गोळा केली आहे. ती खालीलप्रमाणे.

कोष्टक क्रमांक २२

वर्ग तुकडीत मुलांच्या संख्येनुसार शाळा आहे काय?

| अ.क्र. | मुलांची संख्या | शाळांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | ४० पर्यंत | १२० | ६६.७ |
| २) | ४१ ते ६० पर्यंत | ४१ | २२.३ |
| ३) | ६० पेक्षा जास्त | २० | ११.० |
| | एकूण | १८१ | १०० |

एक वर्गतुकडीत मुलांची संख्या कमी असेल तर वैयक्तिक लक्ष देण्याच्या दृष्टीने चांले असते. ४० पर्यंत मुलांची संख्या वर्गतुकडीत असलेल्या शाळांचे प्रमाण ६६.७ टक्के इतके आहे. हे प्रमाण शैक्षणिक व बालमानशास्त्रीय दृष्टया एका वर्गात ४० पर्यंत मुले असल्यास त्यांचा मुलांवर चांगला परिणाम होतो. तसेच शिक्षिकेस मुलांवर वैयक्तिक लक्ष देता येते. ग्रामीण विभागात १००० लोकसंख्येच्या आतील गावात ज्या अंगणवाडी शाळा आहेत तेथील शाळांमध्ये ४० च्या आतच मुलांची संख्या आहे हे प्रामुख्याने मुलाखती व निरीक्षणाद्वारे दिसून आले.

एका वर्गात ४१ ते ६० पर्यंत मुलांची संख्या असलेल्या शाळंचे प्रमाण २२.३ टक्के इतके आहे. ४० पेक्षा जास्त मुलांची संख्या वर्ग तुकडीत असेल तर शिक्षिकेला मुलांकडे वैयक्तिक लक्ष देता येत नसेल.

वर्ग तुकडीत ६० पेक्षा जास्त मुलांची संख्या असलेल्या शाळांचे प्रमाण ११ टक्के आहे. हे प्रमाण अत्यल्प आहे. परंतु ६० पेक्षा जास्त मुलांची संख्या नाही. मुलाखती व निरीक्षणावरुन असे दिसून येते की, ग्रामीण विभागात मुलांच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष केले जाते त्यामुळे अधिका - अधिक मुले शाळेत येवू शकत नाहीत.

## ६.२२ *मुलांची सरासरी उपस्थिती*

अंगणवाडी शाळेत मुलांची उपस्थिती चांगली असेल तर मुलांना शाळेत नियमित येण्याची सवय लागते. उपस्थिती चांगली नसेल तर उपस्थिती वाढविण्याचा शाळाप्रमुखाने प्रयत्न केला पाहिजे. मुलांच्या गैरहजेरीबाबत पालकांना जाणीव करुन द्यावी. तसेच मुलांना वेळवर पोहचविण्यास सांगावे मुलांची उपस्थिती वाढविण्यासाठी शाळा प्रमुख, शिक्षक - पालक संघ व शिक्षिका यांनी आपल्या शाळेतील मुलांची उपस्थिती वाढविण्यासाठी सतत

प्रयत्नशील राहिले पाहिजे. कारण या वयोगटातलि मुलांना शाळेत नियमित येण्याची सवय लागली तर त्यांचा परिणाम पुढील स्तराच्या शिक्षणावर होतो. म्हणून अंगणवाडी शाळांमध्ये मुलांची सरासरी उपस्थिती किती आहे याविषयी माहिती गोळा केली आहे ती खालीलप्रमाणे.

## कोष्टक क्रमांक २३

## आपल्या वर्गातील विद्यार्थ्यांची तासाला सरासरी उपस्थिती खालीलपैकी कशी असते

| अ.क्र. | मुलांची सरासरी उपस्थिती | शाळांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | १०० टक्के पर्यंत | --- | ०० |
| २) | ९० ते १०० पर्यंत | १० | ५.६ |
| ३) | ८० ते ९० | २६ | १४.४ |
| ४) | ७० ते ८० | ३७ | २०.४ |
| ५) | ६० ते ७० | २२ | १२.१ |
| ६) | ५० ते ६० | २१ | ११.६ |
| ७) | ५० टक्के पेक्षा कमी | ६५ | ३५.९ |
| | एकूण | १८१ | १०० |

अंगणवाडी शाळांमध्ये सरासरी उपस्थिती १०० टक्के असावयास पाहिजे होती. परंतु एकही शाळा अशी नाही. कोष्टकावरुन असे दिसते की, ग्रामीण विभागातील शाळांमध्ये ९० ते १०० टक्के उपस्थितीचे प्रमाण ५.६ टक्के इतके आहे व पूर्णपणे १०० टक्के उपस्थिती असलेली एकही शाळा नाही. ८० ते ९० टक्के उपस्थितीचे प्रमाण १४.४ टक्के आहे. ७० ते ८० टक्के उपस्थितीचे प्रमाण २०.४ टक्के इतके आहे. ६० ते ७० टक्के उपस्थितीचे प्रमाण १२.१ टक्के इतके

आहे. ५० ते ६० टक्के उपस्थितीचे प्रमाण ११.६ टक्के इतके आहे. ५० टक्के पेक्षा कमी मुलांची उपस्थिती प्रमाण ३५.९ टक्के इतके आहे. हे प्रमाण ग्रामीण विभागात तर फारच कमी आहे. त्यात योग्य सुधारणा करुन चुकांची दुरुस्ती करुन मुलांची उपस्थितीत मोठा बदल घडवून आणण्यात शिक्षकांचे व पालकांचे सहकार्य महत्वाचे आहे.

ग्रामीण विभागातील शाळांमधील मुलांची उपस्थिती सरासरीपेक्षा फारच कमी आहे. यावरुन या स्तरावरील शिक्षणाचे महत्व पालकांना फारसे पटलेले दिसत नाही. ग्रामीण विभागातील शाळांमधील मुलांची उपस्थिती वाढविण्यासाठी शाळाप्रमुखांनी अधिक प्रयत्न करणे आवश्यक आहे.

## ६.२३ *शाळेत मुलांची बसण्याची व्यवस्था*

अंगणवाडी शाळेत येणारी मुले वयाने लहान असतात. लहान मुलांना बसण्याची व्यवस्था चांगली असेल तर लहान वयापासून चांगली सवय असते. तसेच बसण्याच्या जागेवर लाकडी बाक किंवा सतरंजी असेल तर फारच चांगले असते. त्यामुळे मुलांना ओळीत बसण्याची सवय लागते. कपडे खराब होत नाहीत. म्हणून बसण्याची व्यवस्था चांगली ठेवणे आवश्यक आहे. शाळांमध्ये बसण्याची व्यवस्था आहे किंवा शाळांमध्ये जावून व निरीक्षण करुन बसण्याची व्यवस्था कमी आहे. यासंबधी माहिती गोळा केली आहे. ती माहिती खालीलप्रमाणे.

## कोष्टक क्रमांक २४

## मुलांची बसण्याची व्यवस्था आहे का?

| अ.क्र. | वर्गात बसण्याची व्यवस्था | शाळांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | लाकडी लांब बाक | ---- | ---- |
| २) | सतरंजी | ५७ | ३१.४९ |
| ३) | जमिनीवर | १२४ | ६८.५१ |
| | एकूण | १८१ | १०० |

मुलांना शाळेत बसण्यासाठी सतरंजी व लाकडी बाक वापरणे आवश्यक आहे. त्यामुळे मुलांचे कपडे घाण होत नाहीत. तसेच फरशी असेल तर घाण वाटत नाही. परंतु वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की लाकडी बाक वापरणा-या शाळांचे प्रमाण काहीच नाही. हे प्रमाण एकूण शाळांमध्ये शून्य टक्के इतके आहे.

सतरंजी वापर करणा-या शाळांचे प्रमाण ३१.४९ टक्के इतके आहे. थोडया प्रमाणात मुलांना बसण्यासाठी सतरंजीचा वापर करतात. जमिनीवर मुलांना बसवणा-या शाळांचे प्रमाण ६८.५१ टक्के इतके आहे. यावरुन अधिक मुलांना जमिनीवर बसवतात. ग्रामीण विभागातील अधिक प्रमाणातील शाळा मुलांना बसवण्यासाठी कशाचाही वापर करत नाहीत. हे प्रमाण विचारात घेण्यासारखे आहे. म्हणून अशा शाळांनी सतरंजी किंवा किमान गोणपाट वापरण्यास मुलांच्या आरोग्याच्या दृष्टीने हितकारक आहे.

### ६.२४ *पालकांकडून सहकार्य मिळते काय?*

अंगणवाडी शाळेत येणारी मुले वयाने लहान असतात. या मुलांच्या अनेक समस्या असतात. त्या सोडवण्यासाठी शिक्षिकाला पालकांचे सहकार्य मिळणे

आवश्यक असते. शिक्षिकांना पालकाकडून सहकार्य मिळते काय? या विषयी माहिती गोळा केली आहे. तसेच मुख्याध्यापिका, संघाचे अध्यक्ष, बालविकास योजना अधिकारी यांच्या मुलाखती घेवून याविषयी माहिती गोळा केलेली आहे ती खालीलप्रमाणे.

## कोष्टक क्रमांक २५

## पालकांकडून सहकार्य मिळते काय?

| अ.क्र. | सहकार्य मिळते काय? | शाळांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | होय | ६८ | ३७.५६ |
| २) | नाही | ११३ | ६२.४४ |
| | एकूण | १८१ | १०० |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, सहकार्य मिळणा-या शाळांचे प्रमाण ३७.५६ टक्के इतके आहे. पालकांचे सहकार्य न मिळणा-या शाळांचे प्रमाण ६२.४४ टक्के इतके आहे. हे प्रमाण विचारात घेण्यासारखे आहे. अशा शाळांनी पालकांकडून सहकार्य मिळविण्याचा प्रयत्न केला पाहिजे व सहाकार्य का मिळत नाही हे शोधून काढावे.

मुख्याध्यापिका व अधिकारी यांच्या मुलाखतीवरुन असे दिसून येते की, सुशिक्षित पालकांकडून अधिक सहकार्य मिळते. परंतु अशिक्षित पालकांकडून फारच कमी प्रमाणात सहकार्य मिळते. पालकांकडून सहाकर्य न मिळाल्याने त्याचा परीणाम मुलांच्या उपस्थितीवर होत असतो. म्हणून या शिक्षणाचा प्रसार व प्रचार अधिक प्रमाणात करुन पालकांना या शिक्षणाचे महत्व पटवून देणे गरजेचे आहे.

## ६.२५ वैद्यकीय तपासणीची व्यवस्था

अंगणवाडी शाळेतील मुलांची वैद्यकीय तपासणी महत्वाची असल्यामुळे शाळा ज्या परिसरात असेल तेथील तज्ञ डॉक्टरांकडून मुलांची तपासणी करून घेणे आवश्यक आहे. तपासणी व्यवस्थेच्या बाबतीत डॉक्टरांना शाळेत बोलावून तपासणी करावी. त्यांना नेणे व आणणे अडचणीचे असते. वैद्यकीय तपासणी करताना जर पालकांच्या समोर केली तर चांगले असते. म्हणून शक्य होत असेल तर वैद्यकीय तपासणी मुलांच्या पालकांसमोर करण्यात यावी. या शाळांमध्ये तपासणी व्यवस्था कशी आहे यासंबधी माहिती गोळा केली आहे. ती खालीलप्रमाणे.

### कोष्टक क्रमांक २६

### वैद्यकीय तपासणी व्यवस्था आहे काय?

| अ.क्र. | वैद्यकीय तपासणी व्यवस्था | शाळांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | शाळेत डॉक्टर येतात | ४८ | २६.५ |
| २) | मुलांना दवाखान्यात नेतात | १० | ५.६ |
| ३) | तपासणी न करून घेणा-या शाळा | १२३ | ६७.९ |
| | एकूण | १८१ | १०० |

ज्या शाळांनी मुलांची वैद्यकीय तपासणी केली आहे. त्यापैकी जास्तीत जास्त शाळांमध्ये डॉक्टर येवूनच तपासणी करतात त्यामानाने हे प्रमाण कमीच आहे. म्हणून शासनाने शासकीय डॉक्टरांना सक्तीचे तपासणी करायचा आदेश काढला पाहिजे. शाळेत जावून डॉक्टर तपासणी करणयाचे प्रमाण २६.५ टक्के

इतकेच आहे. शाळेत जावून वैद्यकीय तपासणी करणे चांगले असते. या व्यवस्थेचा उपयोग अधिकाधिक शाळांनी करून घेतला पाहिजे.

मुलांना दवाखन्यात नेवून तपासणी करणा-या शाळांचे प्रमाण ५.६ टक्के इतके आहे. तसेच तपासणी न करून घेणा-या शाळांचे प्रमाण ६७.९ इतके आहे. म्हणून अधिकाधिक शाळंनीसुध्दा वैद्यकीय तपासणी करून घेण्यासाठी डॉक्टरांना आपल्या शाळेत बोलाविण्याचा प्रयत्न केला पाहिजे तरच मुलांचे आरोग्य निरोगी बनविता येइल.

## ६.२६ *वैद्यकीय तपासणीत आढळून येणारे आजार*

बाल्यावस्थेत बालकांना सर्दी, पडसे, ताप, त्वचारोग, डांग्या खोकला व हिवताप यासारखे आजार होत असतात. अशावेळी घरातील सर्व माणसे घाबरतात. परंतु अशा वेळी घाबरून न जाता बालकांची वैद्यकीय तपासणी करून प्राथमिक उपचार करणे महत्वाचे असते. अंगणवाडी शाळेतील मुलांच्या वैद्यकीय तपासणीत कोणकोणते आजार आढळून येतात याविषयी माहिती गोळा केली आहे. ती माहिती खालीलप्रमाणे शाळांनी प्रश्नावलीत जे आजार दाखविले आहेत त्यानुसार आजाराचे गटानुसार वर्गीकरण केलेले आहे.

## कोष्टक क्रमांक २७

## वैद्यकीय तपासणीत आढळून येणारे आजार?

| अ.क्र. | आजाराचे नांव | शाळांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | डोळे, कान, त्वचा | २२ | १२.१ |
| २) | दात, खोकला, डोळे | ३३ | १८.२ |
| ३) | डोळे, दात, त्वचा | २४ | १३.२ |
| ४) | त्वचा, खोकला, | ३० | १६.५ |
| ५) | त्वचा, दात | २३ | १२.८ |
| ६) | खरुज, हिवताप | २२ | १२.३ |
| ७) | तोतरेपणा | २७ | १४.९ |
| | एकूण | १८१ | १०० |

ग्रामीण विभागातील ज्या १८१ शाळांनी वैद्यकीय तपासणी केलेली आहे. त्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांना डोळे, कान, त्वचा इ. चे आजार असणा-या शाळांचे प्रमाण १२.१ टक्के इतके आहे. दात, खोकला व डोळे यासंबधी आजार असणा-या शाळांचे प्रमाण १८.२ टक्के इतके आहे. डोळे, दात, त्वचे संबधी आजार असण्याचे प्रमाण १३.२ टक्के इतके आहे.

त्वचा, खोकला यासारखे आजार असणा-या शाळांचे प्रमाण १६.५ टक्के इतके आहे. त्वचा, दात यासारखे आजार असणा-या शाळांचे प्रमाण १२.८ टक्के इतके आहे. खरुज व हिवताप यासारखे आजार असणा-या शाळांचे प्रमाण १२.३ टक्के इतके आहे. तोतरेपणा संबधीचे आजार असणा-या शाळांचे प्रमाण १४.९ टक्के इतके आहे. यावरुन असे म्हणता येइल की, शाळांमध्ये खरुज, हिवताप व तोतरेपणा यासारखे आजार कमी प्रमाणात दिसून येतात. यावरुन विद्यार्थ्यांना

डोळे, दात, त्वचा व खोकला यासारखे आजार असणा-या शाळांचे प्रमाण जास्त दिसून येते. मुलांचे वय विचारात घेता याबाबत वेळेवर उपचार होणे आवश्यक आहे.

## ६.२७ *वैघकीय तपासणी अहवाल पालकांकडे पाठविला का?*

शाळेमध्ये बालकांची वैघकीय तपासणी केल्यानंतर तपासणी अहवाल पालकांकडे पाठविणे आवश्यक असते. अशा अहवालांची वेळच्यावेळी नोंद ठेवून पालकांना तो अहवाल दाखविला पाहिजे. डॉक्टरांच्या ज्या सुचना असतील त्यांचा पालकांच्या साह्याने पाठपुरावा केला पाहिजे. तरच त्यांचा उपयोग मुलांना होईल. वैघकीय तपासणी करीत असलेल्या किती शाळा तपासणी अहवाल पालकांकडे पाठवितात याची माहिती गोळा केली आहे ती खालीलप्रमाणे.

## कोष्टक क्रमांक २८

## वैद्यकीय तपासणी अहवाल पालकांना कळविता काय?

| अ.क्र. | तपासणी अहवाल पालकांना पाठविता काय? | शाळांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | होय | २० | ११.६० |
| २) | नाही | ३८ | २०.९ |
| ३) | तपासणी न करुन घेणा-या शाळा | १२३ | ६७४ |
| | एकूण | १८१ | १०० |

वैद्यकीय तपासणी केलेल्या ज्या शाळा आहेत. त्यापैकी वैद्यकीय तपासणी अहवाल पालकांकडे पाठविणा-या शाळांचे प्रमाण ११.७ टक्के इतके आहे. तपासणी अहवाल पालकांकडे पाठविणा-या शाळांचे प्रमाण अत्यल्प आहे. वैद्यकीय तपासणी करुनही पालकांकडे अहवाल न पाठविणा-या शाळांचे प्रमाण २०.९ टक्के इतके आहे.

वैद्यकीय तपासणी अहवाल मुलांच्या आरोग्याच्या दृष्टया अतिशय महत्वाचे असतानासुध्दा तपासणी न करुन घेणा-या शाळांचे प्रमाण ६७.४ टक्के इतके आहे. म्हणून शाळांनी वैद्यकीय तपासणी करुन पालकांकडे पाठविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. कारण त्या अहवालावरुनच पालकांना आपल्या पाल्याची आरोग्य दृष्टया माहिती मिळत असते. वैद्यकीय तपासणी अहवाल पालकांकडे पाठविला तरच त्या तपासणीला महत्व राहील म्हणून अशा शाळांनी वैद्यकीय तपासणी अहवाल पालकांकडे वेळीच पाठविण्याचा प्रयत्न करावा.

## ६.२८ वैद्यकीय तपासणी अहवाल शासनाला सादर करता काय?

अंगणवाडी शाळांमध्ये बालकांचा वैद्यकीय अहवाल तपासणी केल्यानंतर शासनाला पाठविणे आवश्यक आहे. अशा अहवालाची वेळच्या वेळी नोंद ठेवून शासनाला तो सादर केला पाहिजे. डॉक्टरांच्या सुचना असतील त्या शासनाला पाठविल्या पाहिजेत. तरच त्याचा उपयोग मुलांना होईल. वैद्यकीय तपासणी करीत असलेल्या किती शाळा तपासणी अहवाल शासनाकडे पाठवितात याविषयी माहिती गोळा केली आहे. ती खालीलप्रमाणे आहे.

### कोष्टक क्रमांक २९

### वैद्यकीय तपासणी अहवाल शासनाला सादर करता काय?

| अ.क्र. | तपासणी अहवाल शासनाला पाठविता का? | शाळांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | होय | २८ | १५.६ |
| २) | नाही | ४३ | २३.७ |
| ३) | तपासणी न केलेल्या शाळा | ११० | ६१.७ |
| | एकूण | १८१ | १०० |

वैद्यकीय तपासणी केलेल्या ज्या शाळा आहेत त्यापैकी वैद्यकीय तपासणी अहवाल शासनाकडे पाठविणा-या शाळांचे प्रमाण १५.६ टक्के इतके आहे. तपासणी अहवाल शाळांकडे न पाठविणा-या शाळांचे प्रमाण २३.७ टक्के इतके आहे आणि वैद्यकीय तपासणी न करुन घेणा-या शाळांचे प्रमाण ६१.७ टक्के इतके आहे. हे प्रमाण फारच आहे. वैद्यकीय तपासणी करुन घेणे फार महत्वाचे आहे. अशा शाळांनी वैद्यकीय तपासणी करुन घेतली पाहिजे. याची दक्षता शिक्षिकांनी घेतली पाहिजे.

## ६.२९ मुलांच्या वैयक्तिक आरोग्याची सुशिक्षित पालक काळजी घेतात का?

मुलांच्या दैनंदिन जीवनाच्या गरजा भागविण्याच्या दृष्टीने व्यक्तिगत आरोग्याचे विशेष महत्व आहे. उदा. जेवणानंतर हात व तोंड स्वच्छ करण्याची सवय लावणे, बाहेरुन घरी आल्यावर हातपाय धुणे, दात घासणे वगैरे बाबतीत पालकांनी आपल्या मुलांच्या वैयक्तिक आरोग्याची काळजी घेतली पाहिजे. सुशिक्षित पालक मुलांच्या वैयक्तिक आरोग्याची काळजी घेतात का? याविषयी माहिती गोळा केली आहे ती खालीलप्रमाणे.

**कोष्टक क्रमांक ३०**

**मुलांच्या वैयक्तिक आरोग्याची सुशिक्षित पालक काळजी घेतात काय?**

| अ.क्र. | सुशिक्षित पालक काळजी घेतात का? | शाळांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | होय म्हणणा-या शाळा | ११० | ६०.९ |
| २) | नाही म्हणणा-या शाळा | ३० | १६.६ |
| ३) | माहिती न भरणा-या शाळा | ४१ | २२.५ |
| | एकूण | १८१ | १०० |

सुशिक्षित पालक आपल्या मुलांच्या वैयक्तिक आरोग्याची काळजी घेतात अशा शाळांचे प्रमाण ६०.९ टक्के इतके आहे. मुलांची काळजी पालक घेत नाहीत अशा शाळांचे प्रमाण १६.६ टक्के इतके आहे. प्रश्नावलीत या प्रश्नांची माहिती न भरुन पाठविणा-या शाळांचे प्रमाण २२.५ टक्के इतके आहे. यावरुन असे म्हणता येइल की, सुशिक्षित पालक अधिक प्रमाणात आपल्या मुलाच्या वैयक्तिक आरोग्याची काळजी घेत असतात. पालक आपल्या पाल्याच्या

आरोग्याबाबत माहिती पुरवू न शकल्यामुळे ते या संदर्भात विशेष जागृक नसावे असे वाटते. हे प्रमाण विचारात घेण्यासारखे आहे. याकरिता शाळांनी वेळोवेळी पालकांकडून माहिती मिळविणे आवश्यक आहे.

## ६.३० *अशिक्षित पालक मुलांच्या वैयक्तिक आरोग्याची काळजी घेतात का?*

अंगणवाडी शाळेत येणा-या मुलांचे पालक अशिक्षित असतील तर ते आपल्या मुलाच्या वैयक्तिक आरोग्याची काळजी घेतात किंवा नाही यासंबधी माहिती गोळा केली आहे. ती खालीलप्रमाणे.

**कोष्टक क्रमांक ३१**

**वैयक्तिक आरोग्याची काळजी अशिक्षित पालक घेतात काय?**

| अ.क्र. | अशिक्षित पालक मुलांच्या आरोग्याची काळजी घेतात काय? | शाळांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | होय म्हणणा-या शाळा | ९७ | ५३.६ |
| २) | नाही म्हणणा-या शाळा | ५२ | २८.९ |
| ३) | माहिती न भरणा-या शाळा | ३२ | १७.५ |
| | एकूण | १८१ | १०० |

अशिक्षित पालक मुलांच्या वैयक्तिक आरोग्याची काळजी घेतात अशा शाळांचे प्रमाण ५३.६ टक्के इतके आहे. अशिक्षित पालक मुलांच्या आरोग्याची काळजी घेत नाहीत अशा शाळांचे प्रमाण २८.६ टक्के इतके आहे. निम्यापेक्षा अधिक अशिक्षित पालक मुलांच्या वैयक्तिक आरोग्याची काळजी घेतात यावरुन त्यांना वैयक्तिक आरोग्याचे महत्व समजले आहे. पालक आपल्या मुलांच्या वैयक्तिक आरोग्याची काळजी अधिक प्रमाणात घेतात असे दिसून येते.

माहिती न भरुन पाठविणा-या शाळांचे प्रमाण १७.५ टक्के इतके आहे. कोष्टक क्रमांक ३० च्या माहितीवरुन हे स्पष्ट होते. सुशिक्षित पालक आपल्या पाल्यांच्या वैयक्तिक आरोग्याबाबत विशेष दक्ष नाहीत. कदाचित हा त्यांच्यावरील वातावरणाचा परीणाम असेल. त्याकरीता शाळांनी अशा पालकांना वारंवार भेटून त्यांना आरोग्याबाबतचे महत्व पटवून दिले पाहिजे व आपल्या पाल्याच्या आरोग्याबाबत काय समस्या आहेत. त्यासंबधी माहिती शाळांनाही पुरविण्याविषयी उत्तेजित केले पाहिजे. निकोप शिक्षण निकोप आरोग्यावर अवलंबून असते हे त्यांना पटवून दिले पाहिजे.

## ६.३१ *वैघकीय तपासणीचे महत्व*

अंगणवाडी शाळेतील मुलांची वैघकीय तपासणी शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीस करणे आवश्यक आहे. वैघकीय तपासणी ही तज्ञ डॉक्टरांकडून करुन घ्यावी. तपासणेत विद्यार्थ्यांमध्ये काही आजार आढळून आल्यास मुख्याध्यापिकेने त्याबाबतचा अहवाल संबंधीत पालकांना पाठवून द्यावा व त्यासंबधी उपाययोजना सुचवून मार्गदर्शन करावे.

"वैघकीय तपासणीत खालील बाबींकडे लक्ष द्यावयास पाहिजे"

१) वयोमानाप्रमाणे उंची व वजन यांची वाढ योग्य रितीने होत आहे किंवा नाही.

२) नेत्र रोग व दृष्टी दोष याबाबत तपासणी.

३) कर्णदोष.

४) घसारोग याबाबत तपासणी.

५) नाकाचे, नाकाचे श्वाशोच्छश्वास घेण्याची प्रक्रिया.

६) पाठीचा कणा सुव्यवस्थितपणे कार्य करीत आहे किंवा नाही.

७) शरीर स्वच्छता, खरूज, गजकर्ण, इत्यादी सारखे त्वचेचे विकार याबाबत तपासणी करावी.[1]

या स्तरावरील बालकांच्या दृष्टीने वैद्यकीय तपासणीचे महत्व फारच आहे. म्हणूण अंगणवाडी शाळेतील मुलांची वैद्यकीय तपासणी होते किंवा नाही विषयी माहिती गोळा केली आहे.

## ६.३२ बाल क्रिडांगण

शालेय परिसरातील क्रिडांगण हा अतिशय महत्वाचा भाग आहे. शाळेशेजारीच क्रिडांगण असेल तर त्याचा मुलांना खूप उपयोग होवू शकतो. क्रिडांगण हे अंगणवाडी शाळेचा एक भाग असावे. ज्या इमारतीत शाळा भरत असेल त्या इमारतीला लागूनच मोकळी जागा असावी.

अंगणवाडी शाळेचे क्रिडांगण झाडून स्वच्छ केलेले असावे. क्रिडांगणावरील खाच खळगे सपाट केलेले असावे. शालेय क्रिडांगण आरोग्यदृष्या स्वच्छ राहिल इकडे लक्ष द्यावे. क्रिडांगणावर कुठल्याही त-हेची घाण होणार नाही याबाबत लक्ष असावे. शाळा सुरु होण्यापूर्वी क्रिडांगणावर पाणी मारुन ठेवावे. कारण त्यामुळे धूळ व माती उडणार नाही पावसाळयात क्रिडांगणावर गवत उगवते त्याची निट निगा राखली तर त्या क्रिडांगणाचा खूप उपयोग करता येईल. उन्हाळयात ते गवत वाळले तर ते जमिनीला चिकटून असते. या बारीक गवताचा महत्वाचा उपयोग असा की, धुळीच्या वादळातही क्रिडांगणावरील माती उडू शकत नाही व शालेय वर्गात धूळ जात नाही. असे बारीक गवत क्रिडांगणावर मुद्दाम लावण्यासही हरकत नाही. त्यामुळे क्रिडांगण व शालेय परिसराची सौंदर्य वाढ होवू शकते.

---

१) शिवाजी सगर / नामदेव बडगावे "शालेय संघटन शैक्षणिक संकल्पना आणि समस्या" उदगीर : शिल्पा प्रकाशन पा.क्र. १६० - १६१.

बाल्यावस्थेत होणारा बराच विकास क्रिडांगणाद्वारा होत असतो. अशी फ्रोबेलची धारणा आहे. पालकांची बौध्दीक स्नायू व इंद्रिय विकासात क्रिडांगणाला फार मोठे स्थान आहे. म्हणून अंगणवाडी शाळेत क्रिडांगणाचा पुरेपूर उपयोग केला पाहिजे. क्रिडांगणावरील विविध साधनामुळे क्रिडांगणावरील कौशल्ये अवयवांचा उपयोग करण्यास मुले शिकतात. आणि त्यातूनच आरोग्याची प्राप्ती होते.

"क्रिडा ही बालकांची नैसर्गिक प्रवृत्ती होय शैशवअवस्थेत क्रिडेचे महत्व विशेष असते कारण या क्रिडांच्याद्वारे मुलांच्या इंद्रियावर शारिरीक शक्तीचा विकास होत असतो. मानसिक व बौध्दीक विकासाचेही माध्यम क्रिडा हेच असते. क्रिडेच्याद्वारे मुले आत्मविष्कार करीत असतात. म्हणूनच फ्रोबलेने बालशिक्षणात क्रिडा किंवा खेळ यांचा पुरस्कार केला आहे. "[२]

क्रिडा म्हणजे बालविकासाची सर्वोच्च अवस्था या वयातील विशुध्द आध्यात्मिक कृती आनंद, स्वातंत्र्य, अंतःबाह्य विश्रांती व शांतीचे साधन परंतु मुलांना कसेही कधीही खेळ देता उपयोगी नाही कारण मुलांचे खेळ ही अर्थशुन्य क्रिया नाही. त्यांच्या जीवनविकासाची खेळांना सखोल अर्थ आहे. कारण त्यावर त्यांचे सगळे शिक्षण अवलंबून असते. म्हणून त्यांच्या खेळांचे सुयोग्य संयोजन करणे आवश्यक आहे.

## ६.३३ *बालक्रिडांगणावरील साधने व त्यांचे महत्व*

क्रिडांगणावरील साधने स्नायू विकासाच्या दृष्टीने अतिशय महत्वाचे आहेत. उदा. चालणे, चढणे, उडया मारणे लोंबकाळणे, पळणे, झोके घेणे, शरीराला वर खाली हालवणे त्यांचा समतोल साधने वगैरे कित्येक क्रिया मुले या वयात करीत असतात. याक्रिया करण्यासाठी व त्यात कौशल्य मिळवण्यासाठी क्रिडांगणावरील साधनांचा प्रामुख्याने उपयोग होतो. मुलांना या साधनाची अत्यंत

आकर्षण वाटत असते. म्हणून शाळेला थोडाफार खर्च करावा लागला तरी तो करुन प्रत्येक शाळने ही साधने बसविण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

## बालक्रिडांगणावरील साधने

१) घसरगुंडी

मुलांना घसरणे फार आवडते म्हणून हे साधन मुलांच्या आकर्षक साधनापैकी एक आहे. घसरगुंडी अंगणवाडी शाळेतील मुलांच्या सोईची आसावी. शाळेत दोन प्रकारच्या घसरगुंडया ठेवाव्यात एक लहान व दुसरी मोठी. म्हणजे लहान मोठया मुलांची सोय होते. अगदी लहान मुलांसाठी फार उंचीची नसावी. चार फूट उंचीची घसरगुंडी असावी. चढण्यासाठी केलेल्या जिन्याच्या पाय-याची रुंदी चार ते सहा इंच असावी. घसरण्याची फळी सहा ते सात फूट लांबीची एक ते सव्वा फूट रुंदीची व किना-याला तीन ते चार इंच उंचीची गोलाकार कड लावेली असावी. घसरुन पडण्याच्या जागी काडाची गाडी किंवा बारीक वाळूच गुंड असाव.

सर्वसामान्य मुलांना सहा - साह फूट उंचीची घसरगुंडी ठेवावी यात घसरण्याच्या फळीची लांबी दहा - बारा फूट असावी. घसरगुंडीवर घसरताना पायाला पूर्ण विसावा मिळतो व पाठीच्या आणि पोटाच्या स्नायुना काम मिळते. हाताचाआधार न घेता मुलांनी घसरावे अशी सुचना दयावी. म्हणजे सुरुवातील ा जरी हाताचा आधार घेण्याची गरज वाटत असेल तरी हळूहळू सुटे घसरण्याची सवय लागते व त्यातच मुलाला मज्जा वाटू लागते. घसरगुंडीचा उपयोग मुले पुष्कळ प्रकारे करतात. घसरणे वेगात आले म्हणजे मध्येच एकदम थांबतात व पुन्हा शरिराला ढिले सोडून देतात. कोणी डोके खाली करुन घसरतात तर कोणी उतारावरुन तो सांभाळून चालतात. हे सर्व प्रकारचे खेळ खेळावयाचे

२) कुंडले म.वा. "शैक्षणिक तत्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र"
पुणे : श्रीविद्या प्रकाशन पुणे ३० ६ वी आवृत्ती - १९८६ पा.क्र. ५३२

मुलाना स्वातंत्र्य असावे. परंतु त्याच्यांवर नियत्रंण ठेवणेही आवश्यक असते.

२) <u>सी - सॉ</u>

खालीवर होणा-या फळीच्या या साधनाला इंग्रजीत सी - सॉ म्हणतात. फूट सव्वा फूट आधाराव वर खाली होणा-या फळीच्या दोन टोकांना दोन मुले बसून मुले ती फळी वर खाली हलवितात. जोरात वर खाली होण्यात मुलांना मज्जा वाटते. त्यामुळे सर्व शरीराला हिसके बसतात व मज्जातंतूनाही धक्के मिळतात आणि शरीराला चांगला व्यायाम मिळतो.

लहान मुलांसाठी चार फूट लांबीची फळी असावी, तिची रुंदी नऊ इंच व जाडी दोन इंच असावी. मुले घसरु नयेत म्हणून टोकाला दीड इंच रुंदीची पट्टी मारावी. बसलेल्या मुला समोरही अशीच कमान किंवा दांडा असावा. प्रत्येक टोकाला दोन - तीन मुले बसण्याची व्यवस्था करावयाची असेल तर त्यासाठी पाच - सहा फूट लांबीची फळी असावी. मधला आधार जमिनीपासून उंच असला तर फळी उंच जाते. अशा सी - सॉ चा उपयोग मुलांना धीट होणेकामी मदत करतो.

३) <u>झोके</u>

मुलांना झोके घेणे फार आवडत असते. म्हणून लहानपणी त्याला पाळण्यात ठेवतात व झोके देतात. मोठया माणसांनादेखील झोपाळयावर झोके घेणे आवडते. म्हणून शाळेच्या बागेत किंवा क्रिडांगणावर दोन लाकडे किंवा लोंखडी पाईप उभे करुन त्यावर आडवे लाकूड किंवा पाईप ठेवून चौकट तयार करता येते आडव्या लाकडाला कडया घालाव्यात व त्यात झोक्याची दोरी अथवा साखळी बांधावी. मुलांना बसायला सहा इंच रुंद व एक फूट लांब व दीड इंच जाडीची फळी असावी.

"लहान मुलांना झोके घेतांना पायाला विशेष श्रम घेवू नयेत म्हणून पाय सरळ आधारावर ठेवता येतील अशी बसण्याची जागा असावी असे डॉ.

माँटेसरीचे मत आहे. कारण पाय लोंबकळत रहात नाहीत व पायाला विश्रांती मिळते. झाडाच्या फांदीला दोर बांधूनही झोक्याची व्यवस्था करता येते. मज्जातंतूची प्रतिकार शक्ती झोका या खेळामुळे वाढण्यास मदत होते."[३]

४) झोपाळा

लहान मुलांसाठी लाकडी स्टँन्चा झोपाळा करता येतो. हा झोपाळा पाच फूट लांब व चार फूट रुंद असावा. त्यावर दोन झोपाळे टांगता येतात. झोपाःयात बसण्यासाठी एक ते सव्वा फूट रुंदीची खुर्चीसारखी व्यवस्था असते. दोन्ही झोपाळयांना सांधणारी नउ इंच रुंदीची फळी पाठ टेकण्याच्या ठिकाणी लावलेली असते. त्यावर पायाने जोर देवून मुले झोके घेतात. झोपाळयांत फारशी मोठी हालचाल होत नाही. म्हणून पडण्याची भिती नसते. अशा झोपाळयाना खर्च अधिक येतो. त्यामुळे हा झोपाळा सर्वसामान्य लोकांना परवडण्यासारखा नाही.

५) डबलबार

लहान मुले योग्य अशा डबलबारवरही लांबकाळतात हातावर शरीराचा तोल सांभाळून शरीर उंच करुन वारंवार चढतात. केंव्हा केंव्हा झटक्यात बसतात व उडी मारतात. लहान मुलांना योग्य असे डबलबार सारखे साधन अडीच फूट उंच, दोन फूट लांब व एक फूट रुंद असावे.

६) सिंगलबार व रोमन रिंग्ज

यांचा उपयोग मुले आपआपल्या शक्ती प्रमाणे लोंबकाळणे, शरीराला वर उचलणे, गिरकी घेणे वगैरे क्रिया करतात. वास्तविक ही साधन मोठया मुलांना विशेष सोयीची असतात. लोंबकाळण्याची क्रिया ह्या वयात मुलांना चांगली असते. त्यामुळे पायावर विशेष जोर न पडता इतर स्नायुंची हालचाल होते व

---

3) केळकर स.आ. " पूर्व प्राथमिक शिक्षण भाग १" मुंबई : केळकर प्रकाशन प्रथम आवृत्ती १९६१ प.क्र. ११३

हाताचे स्नायु मजबूत होतात.

सिंगलबार मुलांना लोंबकाळणे व त्याच स्थितीत हात सरकावून पुढे मागे जाणे ह्या क्रिया करावयास आवडतात. हाताच्या जोरावर सर्व शरीर वर उचलून घेण्याची क्रियाही काही मुले करत असतात. रोम रिंग्जवर हाताच्या आधारावर शरीराला वर तोलून घेवून काही मुले गिरक्याही घेतात. शरीरात चपळता येण्यासाठी ह्या सर्व क्रिया उपयोगी होतात.

## ६.३४ *शालेय क्रिडांगणाची उपलब्धता*

खेळण्याची वृत्ती मुलांमध्ये नैसर्गिक असते. क्रिडांगणावरील खेळ खेळताना मुलांना योग्य सवयी लागतात व त्यांची विचार करण्याची शक्ती वाढते व त्यातूनच मुलांना शिक्षण मिळत असते. अंगणवाडी शिक्षणाचे स्वरूप खेळात्मक आहे. म्हणून शालेय क्रिडांगणाला या स्तरावरील शिक्षणात अत्यंत महत्वाचे स्थान आहे. त्यामुळे किती शाळांना क्रिडांगण आहे या विषयी माहिती गोळा केली आहे ती खालील प्रमाणे.

**कोष्टक क्रमांक ३२**

**शालेय क्रिडांगणाची उपलब्धता आहे काय?**

| अ.क्र. | शाळेत क्रिडांगण आहे का? | शाळांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | होय म्हणणा-या शाळा | १२५ | ६९.१ |
| २) | नाही म्हणणा-या शाळा | ५६ | ३० |
| | एकूण | १८१ | १०० |

अंगणवाडी शिक्षणात क्रिडांगणाला अतिशय महत्वाचे स्थान आहे हे वरील विवेचनावरून आपल्याला समजले असेलच. असे असताना सुध्दा ग्रामीण

विभागातील शालेय क्रीडांगणे असणा-या शाळांचे प्रमाण ६९.१ टक्के इतके आहे. ग्रामीण भागातील शाळामध्ये क्रिडांगण असण्याचे प्रमाण ब-यापैकी आहे. क्रिडांगण हा शाळेचा अत्यावश्यक घटक आहे.

शालेय क्रिडांगण नसणा-या शाळांचे प्रमाण ३०.९ टक्के इतके आहे. या शाळांना क्रिडांगण नसल्यामुळे मुलांच्या क्रिडांगणाद्वारा होणारा शारीरीक बौध्दीक, स्नायुंचा तसेच इंद्रियांचा होणा-या विकासास बाधा निर्माण होते. क्रिडांगण नसलेल्या शाळांमध्ये मुलांना घर व शाळेमध्ये काहीच फरक वाटत नाही.

## ६.३५ क्रिडांगणाचे क्षेत्रफळ

क्रिडांगणाचे क्षेत्रफळ जास्त असेल तर त्याचा उपयोग मुलाना निरनिराळे खेळ खेळण्यासाठी व व क्रिडांगणावरील खेळ साहित्य मांडण्यासाठी होत असतो. दक्षिण सोलापूर तालुक्यातील ज्या शाळांना क्रिडांगण आहे व त्यांचे क्षेत्रफळ किती आहे या विषयी माहिती गोळा केली आहे. ती खालील प्रमाणे.

कोष्टक क्रमांक ३३

शालेय क्रिडांगणाचे क्षेत्रफळ किती आहे.

| अ.क्र. | शालेय क्रिडांगणाचे क्षेत्रफळ किती आहे. | शाळांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | ३००० चौ. फुटापर्यंत | ५५ | २८.७ |
| २) | ३००१ ते ५००० चौ. फुटापर्यंत | ४३ | २३.७ |
| ३) | ५००१ ते १०,००० चौ. फुट | ३४ | १८.७ |
| ४) | १०,००० चौ. फुटा पेक्षा जास्त | ३१ | १७.३ |
| ५) | क्रिडांगण उपलब्ध नाही | २१ | ११.६ |
| | एकूण | १८१ | १०० |

ज्या शाळांना ३००० चौ.फूट क्षेत्रफळापर्यंतचे क्रिडांगण आहे अशा शाळांचे प्रमाण २८.७ टक्के आहे. क्रिडांगणाचे क्षेत्रफळ कमी असेल तर एकाच वेळी सर्व मुलांना खेळताना व खेळ साहित्याची मांडणी करतांना अडचणी येत असतात. ३००१ ते ५००० चौ. फूट क्रिडांगणाचे क्षेत्रफळ असलेल्या शाळांचे प्रमाण २३.७ टक्के इतके आहे.

क्रिडांगणाचे क्षेत्रफळ ५००१ ते १०,००० चौ. फुट क्षेत्रफळापर्यंतचे क्रिडांगण असलेल्या शाळांचे प्रमाण १८.७ टक्के इतके आहे. क्रिडांगणाचे क्षेत्रफळ १०,००० चौ.फुटापेक्षा जास्त असलेल्या शाळांचे प्रमाण १७.३ टक्के आहे. क्रिडांगण उपलबध्द नसलेली शाळांचे प्रमाण ११.६ टक्के इतके आहे.

या वरुन असे दिसून येते की, ३००० चौ.फुट क्षेत्रफळापेक्षा जास्त क्षेत्रफळ असलेल्या शाळांचे प्रमाण जास्त आहे. जागेची टंचाईमुळे शळांना क्रिडांगणासाठी मोठी जागा ठेवणे शक्य होत नसावे. म्हणून अंगणवाडी शळा व प्राथमिक शाळांना जोडल्या तर त्या शाळांच्या क्रिडांगणाचा वापर या शाळांना करता येइल.

## ६.३६ *मुक्त व्यवसायाचे शैक्षणिक महत्व*

अंगणवाडी शाळेत स्वेच्छेने, स्वतंत्रपणे व स्वच्छंदाने काही क्रिया व काम करणे यालाच मुक्त व्यवसाय असे म्हणतात. बालपणो आयुष्य खेळण्याचे असते. त्यात सुरुवातीस खेळाचे स्वरुप मुक्त व्यवसायाचे असते. या वयातील मुले स्वेच्छेने क्रिया करण्यास प्रवृत्त होत असतात. या क्रिया करताना स्वतःच्या स्नायुंवर ताबा मिळवून आपल्या हालचालीचे क्षेत्र व्यापक करण्याची विशेष गोष मूल साध्य करते. मग आपल्या स्नायुंचा उपयोग त्याला विशेष कारवाई करण्यासाठी करता येतो. तेथूनच मुक्त व्यवसायात्मक क्रियांना बालशिक्षणात स्थान मिळते.

"मुक्त व्यवसाय ही बालजीवनात आनंद वाढविणारी एक स्वाभाविक गोष्ट आहे. या आनंदात अनेक गोष्टीचा समावेश होतो. एक म्हणजे स्नायुंवर ताबा मिळवून त्याच्या सहकार साधून क्रिया करण्याचा आनंद मुलांना विशेष वाटत असतो. दुसरे म्हणजे बालजीवन हे अत्यंत कल्पनाशील असते व काल्पनिक आनंद प्राप्त करण्यासाठी मूल मुक्त व्यवसायत्मक क्रिया करते. [४]

> अंगणवाडी शाळेत मुक्त व्यवसायाचे प्रयोजन

अंगणवाडी शाळेत मुक्तव्यवसायाच्या कामाना एक वेगळे महत्व अहे. कारण या व्यवसायामुळे मुले बालमंदिरात रुळतात. शाळेत जाणे ही मुलांच्या जीवनात एक विशेष गोष्ट असते. शाळेत जाणे म्हणजे मुलांना एका व्यापक वातावरणात प्रवेश करावयाचा असतो. त्यामुळे त्यांच्या मनात गोंधळ होतो. त्यांच्या वयाची अन्य बरीच मुले शाळेत असतात. तेंव्हा या मुलांची व्यवहार करण्याची गोष्टी नवीनच असते. शाळेत काही मुले धकका - बुक्की करणारी असतात या सर्व गोष्टी ध्यानात घेऊन शाळेतील शिक्षिकेला नव्या मुलांशी गोडी गुलाबीने, प्रेमाने व अपुलकीने वागावे लागते यांच्याच जोडीला मुक्तव्यवसायाच्या कामाच्या विशेष उपयोग होऊ शकतो.

या वयातील मुले स्वतःच्या आवडीच्या व्यवसायात गुंतले तर तेवढा वेळ ते शांत व स्थिर होतात व त्यामुळे घरी मुले ज्या स्वाभाविक मनस्थितीत असते त्याचप्रमाणे ते शाळेत राहू लागते. हळूहळू त्याला तेथे गोडी वाटू लागते आणि त्याचे रुपांतर पुढे शाळेच्या आकर्षणात होते. मुक्त व्यवसायाची कामे करताना फारशा नियमाचे पालन करायचे नसते या व्यवसायाची साधने आकर्षक असतात व त्यांच्याशी खेळणे मुलांना आवडते. त्यामुळे त्यांच्या मनातील भिती निघून जाते व शाळेत स्थिर होतात.

---

४) 'किता' - पा.क्र. ४५

## ➢ अंगणवाडी शिक्षणात या साधनाचा उपयोग

फ्रोबेलच्या किंडरगार्डन मध्ये किंवा डॉ. मॉंटेसरीच्या पध्दतीमध्ये मुक्त व्यवसायाच्या साधनाना काही स्थान दिलेले आढळत नाही. परंतु फ्रोबेच्या मृत्युनंतर त्याच्या पधदतीचा विशेष विचार करुन त्यात काही सुधारणा करण्यात आल्या. त्यावेळी अशा प्रकारच्या साधनाची उपयुक्तता समजून त्याचा वापर केला जातो.

अंगणवाडी शाळेत मुक्तव्यवसायात उपयोगी पडतील अशी आज बरीच साधने बाजारात उपलब्ध आहेत व दिवसेंदिवस त्यात वाढ होताना दिसत आहे. सामान्यपणे मुलांची खेळणी या सदरात बाजारात विकत मिळणा-या वस्तूतून मुक्त व्यवसायत उपयुक्त अशी साधने निवडता येतात. हल्ली बाजारात उपलब्ध असणा-या साधनात मॉंटेसरी साधनावरुन कल्पना सुचवून त्यात काही फेरफार करुन बरीच साधने आढळतात.

मुक्त व्यवसायाच्या कामाच्या स्वाभाविक आकर्षणामुळे मुले त्यात गढून जातात व एकाग्रतेने काम करु लागतात. त्यामुळे मुलांमध्ये इतरवेळी दिसणारा चंचलपणा कमी होतो. या कामामुळे एकाग्र होवून बराच वेळ काम करीत राहणयाची सवय मुलांना लागते. अशी सवय मुलांना लावण हे एक शिक्षणाचे काम आहे. एकाग्रतेने काम केल्यामुळे स्नायुक्रियेचे कौशल्य वाढणयास मदत होते. या साधनामुळे मुलांमध्ये बालमंदिराविषयी आकर्षण निर्माण होते व त्याचे रुपांतर हळूहळू आपलेपणात होते. शाळेत अशा कामामुळे मुलांमध्ये चांगली अभिरुची निर्माण करणे सामाजिक नियमांचे मुलांकडून पालन करुन घेणे इत्यादी गोष्टी शिक्षणात सहज शक्य होतील.

## ६.३७ मुक्त व्यवसायाच्या कामाचे काही गट

अंगणवाडी शाळेत पुढीलप्रमाणे मुक्त व्यवसायाची कामे म्हणून ठेवता येणयासारखी आहे.

१) दट्टयापेटी, मनोरा, गोल मनोरा वगैरे इंद्रिय शिक्षणाव्यतिरिक्त अशी खेळाची साधने.

२) बंगला पेटी, चित्र जुळवणे, कुटप्रश्नात्मक क्रियाचे खेळ वगैरे रचनात्मक कामे.

३) रुमालाची रंगीत रेघेवर घडी घालणे, डब्यात डबे जाणार असे काढणे, घालणे वगैरे व्यवहारीक जीवनाच्या कामासारखी कामे.

४) चित्रे पाहण्यासाठी तयार चित्रांची पुस्तके ठेवणे.

५) फळा व खडूचा उपयोग.

६) तारेत मणी ओवणे व चौकटीत मणी ठेवणे.

७) शंखाने आकृत्या काढणे.

८) लाकडी तुकडयाने बंगला बनविणे.

९) आकृतीचे वर्गीकरण.

## ६.३८ मुक्त व्यवसायाची साधने

मुक्त व्यवसायाची कामे आकर्षक व सोपी असतात ती कामे मुलांना आवडतात. या व्यवसायाच्या साधनामुळे मुलांमध्ये एकाग्रता, अभिमुखता व कौशल्य निर्माण होते. अंगणवाडी शिक्षणात या साधनाचे महत्व लक्षात घेता या शाळांमध्ये कोणती साधने उपलब्ध आहेत याविषयी माहिती गोळा केली आहे. साधनाचे गट करुन त्यांचे पृथःकरण करण्यात आले आहे.

## कोष्टक क्रमांक ३४

### मुक्त व्यवसायाची साधने आहेत काय?

| अ.क्र. | मुक्त व्यवसायाची साधने आहेत काय? | शाळांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | होय म्हणणा-या शाळा | ११८ | ६५.२ |
| २) | नाही म्हणणा-या शाळा | ६३ | ३४.८ |
| | एकूण | १८१ | १०० |

इंद्रिय शिक्षण व रचनात्मक शिक्षण या दोन्ही गटाच्या साधनामुळे मुलांच्या स्नायुंवर ताबा मिळवण्यास व काल्पनिक आनंद प्राप्त होण्यास निश्चित फायदा होत असतो. कोणतीही क्रिया करताना ती करण्याचा एक आनंद असतो. तो आनंद मुलांना या मुक्त व्यवसायातूनच मिळत असतो. परंतु वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, अशा प्रकारचा आनंद फारच थोडया शाळेमधील मुलांना मिळत असेल. अशा शाळेंचे प्रमाण ६५.२ टक्के इतके आहे.

रचनात्मक कौशल्याच्या साधनामुळे मुलांचा ठराविक प्रकारचा विकास होत असतो. अशा प्रकारची साधने कमी प्रमाणात आढळतात अशा शाळांचे प्रमाण ३४.८ टक्के इतके आहे. या प्रकारची साधने नसलतील तर मुलांचा या साधनातून होणारा विकास करुन घेता येणार नाही. ग्रामीण विभागात स्थानिक वातावरणातून या कामासाठी साधने कमी प्रमाणात आढळतात. स्थानिक कारगिराकडून अशी साधने तयार करुन घेण्याचा प्रयत्न करावा. उदा. लाकडी ठोकळे, फळांच्या बिया, शंख, शिंपले इत्यादी.

### ६.३९ *वर्गातील खेळण्याची साधने वापरण्याची पध्दती*

अंगणवाडीतील मुलांना वर्गातील खेळण्याची साधने वापरण्याच्या बाबतीत मुलांना स्वातंत्र्य असणे आवश्यक आहे. त्यामुळे मुलांना ज्या साधनात गोडी

असेल ती साधने निवडून तो खेळू शकतो. मुलांनी स्वताच्या विकास कक्षेचा उपयोग करून आनंद प्राप्त करण्यासाठी काहीतरी विशेष क्रिया करणे व रमून जाणे हा या साधनाचा उद्देश आहे. मुलांना स्वेच्छेने काम करण्याचे व निवड करण्याचे संपूर्ण स्वातंत्र्य मिळाल्याशिवाय हा उद्देश साध्य होणार नाही. म्हणून या शाळेमध्ये साधने वापरण्याची पध्दती कशी आहे कशी आहे याविषयी माहिती गोळा केली आहे ती खालील प्रमाणे.

## कोष्टक क्रमांक ३५

खेळण्याची साधने वापरण्याची पध्दती कशी आहे?

| अ.क्र. | साधने वापरण्याची पध्दती | शाळांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | मुले स्वतः साधने निवडून खेळतात. | २८ | १५.४ |
| २) | पूर्वनियोजित कार्यक्रमानुसार | ३२ | १७.६ |
| ३) | ठराविक साधने ठराविक मुलांना देतात | २२ | १२.२ |
| ४) | साधने नसलेल्या शाळा | ७० | ३८.६ |
| ५) | माहिती न भरणा-या शाळा | २९ | १६.२ |
| | एकूण | १८१ | १०० |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, मुले स्वतः साधने निवडून खेळतात अशा शाळांचे प्रमाण १५.४ टक्के आहे. अशा शाळांचे प्रमाण फारच कमी असल्यामुळे मुलांना स्वतः साधने निवडून खळता येत नाही. त्यामुळे त्यांच्या स्वतःच्या विकास कक्षाचा उपयोग करुन आनंद प्राप्त करता येत नाही.

पूर्वनियोजित कार्यक्रमानुसार मुलांना साधने खेळण्यास दिली तर त्यांना शिक्षिकांच्या मतानुसार खेळ खेळावे लागतील. तेथे त्यांना स्वातंत्र्य राहणार

नाही. त्यामुळे मुलांवर बंधने येवून पडतात पूर्व नियोजित कार्यक्रमानुसार खेळ खेळणा-या शाळांचे प्रमाण १७.६ टक्के आहे व ठराविक साधने ठराविक मुलांना देवून खेळ खेळणा-या मुलांची शाळांचे प्रमाण १२.२ टक्के इतकेच आहे. हे प्रमाण सर्वात अत्यल्प आहे. अशा पध्दतीमुळे सर्वांना समान संधी मिळत नाही. ठराविक मुलांना जर संधी दिली तर इतर मुलांवर त्याचा अनिष्ठ परिणाम होतो. म्हणून अशा पध्दतीचा वापर करणे शैक्षणिक व मानसशास्त्रीय दृष्या अयोग्य आहे. साधने नसलेल्या शाळांचे प्रमाण ३८.६ टक्के इतके आहे व माहिती न भरणा-या शाळांचे प्रमाण १६.२ टक्के इतके आहे.

## ६.४० *अंगणवाडी शिक्षणात वाद्य साहित्याचे महत्व*

लहान मुलांना संगीत आवडत असते. म्हणून आई मुलाला निजवताना गाणी म्हणते. "लहानपणी मुलांना गाण्यातील शब्दाचा काहीच अर्थ कळत नाही परंतु स्वराची गोडी ही अनुभवतात व हसून खेळून आपला आनंद प्रकट करतात. गाणी गावून मुलांना रमविण्यासाठी गाण्यांची चाल सर्व देशांत व सर्व जागात आढळते. कांही मुलांना संगीताचे इतके आकर्षण असते की कोणत्याही कारणाने ती रडत असली तरी संगीत सुरु होताच त्यांचे रडणे थांबते. वारंवारचे स्वर ऐकून मुले ती ओळखण्यास तयार होतात व नेहमीच्या चाली मुलांना अवगत होवू लागतात पण ही प्रक्रिया अत्यंत सूक्ष्म असते. "[५]

लहान मुलांना संगीतापासून आनंद मिळतो. संगीतावर एकच चाल ब-याच वेळा ऐकली की, तिचे स्वर मुलांच्या लक्षात येतात मग मुले त्या चालीवर गाणी म्हणू लागतात. त्यामुळे पेटीवर अशा परिचित चालीचे स्वर काढले की, मुले ती गाणी ओळखून म्हणण्याचा खेळ घेता येतो. त्यामुळे मुलांना मज्जा वाटते.

५) केळकर स.आ. "बालमंदिराचे शिक्षण (सिध्दांत व व्यवहार) मुंबई : केळकर प्रकाशन प्रथम आवृत्ती १९६१ पा.क्र. २३४.

गाण्याच्या चाली मुलांच्या लक्षात आल्यानंतर ती गाणी चटकन त्यांच्या तोंडी बसतात. अशा प्रकारे मुलांना गाणी म्हणण्यास येवू लागतात.

अंगणवाडी शिक्षणात संगीताला अतिशय महत्वाचे स्थान. मानवाच्या सांस्कृतिक विकासात संगीताचे विशेष असे स्थान आहे म्हणून बालमंदिरात संगीत (वाद्यसाहित्याचा) उपयोग करणे आवश्यक आहे. या शाळांमध्ये कोणकोत्या प्रकारची वाद्यसाहित्य वापरण्यात येतात. याविषयी माहिती गोळा केली ती खालीलप्रमाणे आहे.

## कोष्टक क्रमांक ३६

## वाद्य साहित्य आहेत काय?

| अ.क्र. | वाद्य साहित्य आहे काय? | शाळांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | बाजाची पेटी, तबला, झांज, बासरी, मृदंग | — | — |
| २) | पेटी, मृदंग, खंजीर, झांज | ४४ | २४.३ |
| ३) | तबला, झांज | २८ | १५.४ |
| ४) | खंजीर, झांज | ३५ | १९.४ |
| ५) | साहित्य नसलेल्या शाळा | ४१ | २२.६ |
| ६) | माहिती न दिलेल्या शाळा | ३३ | ११.३ |
| | एकूण | १८१ | १०० |

प्रश्नावलीतील विचारलेल्या सर्व वाद्यसाहित्य असलेल्या शाळा एकही नाही. परंतु पेटी तबला व झांज आहेत अशा शाळांचे प्रमाण २४.३ टक्के इतके आहे. परंतु हे प्रमाण त्या मानाने फारच कमी आहे. तबला हे झांज हे वाद्यसाहित्य असणा-या शाळेचे प्रमाण १५.४ टक्के इतके आहे. तसेच खंजीर व झांज हे वाद्यसाहित्य असणा-या शाळांचे प्रमाण १९.४ टक्के इतके आहे. साहित्य

नसणा-या शाळांचे प्रमाण २२.६ टक्के इतके आहे. तर माहिती न भरुन दिलेल्या शाळांचे प्रमाण १८.३ टक्के इतके आहे. यावरुन या शाळांमध्ये कोणत्याही प्रकारचे वाद्यसाहित्या नाही असेच म्हणावे लागेल. म्हणून ज्या शाळांमध्ये वाद्यसाहित्य नाही अशा शाळांनी वाद्यसाहित्य मिळवण्याचा प्रयत्न केला पाहीजे. शाळांनी शिक्षणात संगीताचे महत्व लक्षात घेवून गावातील भजनी मंडळातील तज्ञ व्यक्तिंकडून मार्गदर्शन घेवून तसेच त्याच्याकडील वाद्यसाहित्याचा वापर करुन मुलांना संगीताचे ज्ञान दिले पाहिजे.

## ६.४१ अंगणवाडी शिक्षणात बालगीतांचे महत्व

मुलांना गाणी ऐकायला व गायला आवडतात म्हणून बालमंदिरात बालगीते गाण्याचा कार्यक्रम आवश्यक असतो. या कार्यक्रमाला पुष्कळ जण संगीताचा कार्यक्रम असे म्हणतात. परंतु संगीत व बालगीतात भिन्नता आहे. "संगीतात कार्यक्रम भावनिकता दाखाविण्यासाठी स्वरांचे विशेष महत्व असते. त्याच प्रमाणे गायकाचे कौशल्य हे ही संगीतातील एक विशेषता आहे. बालगीतात गायकीपेक्षा अर्थाला विशेष प्राधान्य आहे. बालगीताची भाषा व विषय मुलांना समजतील व आवडतील अशाच असाव्यात. "[६]

बालगीताची भाषा मुलांना समजेल उमजेल अशी सोपी असावी त्याचप्रमाणे त्यात साहित्यचा गोडवाही असावा. भाषा ही काव्याचे बहिरंग आहे. प्रास - अनुप्रास वगैरे शब्दालंकाराने भाषा समजविली जाते. परंतु भाषेचे मुख्य कार्य अर्थ स्पष्ट करणे हे आहे. म्हणून तो भाव काव्यात व्यक्त करावयास साजेशी भाषा असावी लागते. बालगीतांचे विषय मुलांना आकलन होतील असे व त्यांच्या मनावर योग्य छाप व योग्य परिणाम करणारे असावेत. बालयोग्यता हा गुण मुख्य मानला पाहिजे. श्रृंगारीक गोष्टींना बालगीतात स्थान देवू नये परंतु प्रेमाची

६) 'किता' पा.क्र. २९४.

व्यापक कल्पना मुलांसमोर मांडली गेली पाहिजे. यासाठी भावा बहिणीतील प्रेम, कुंटुंब प्रेम, मित्रप्रेम, राष्ट्रप्रेम हे विषय बालकाव्यात आणण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

> बालगीताचे प्रकार

१) बडबडगीते

या प्रकारच्या गीतांमुळे मुलांच्या स्वरयंत्रास काम मिळून त्यांना गाण्याचा आनंद मिळत असतो. मुलांच्या कानासही ही गीते आकर्षक वाटतात. ती सुरांवर म्हणता येतात. बडबडगीतात अर्थाला प्राधान्य नसले तरी यामध्ये शब्दाचा उपयोग करतात. शब्द अर्थ प्रकट करतात.

२) खेळगीते

खेळगीते ही बडबडगीताप्रमाणेच पुर्वापार चालत आलेली आहेत. बडबडगीताप्रमाणे ती निरर्थक नसतात. या गीतांमध्ये फार मोठा अर्थ भरलेला असतो असेही नाही. उदा. खेळात पहिला डाव कोणी जायचे हे ठरविण्यासाठी "अरिंग मिरिंग" हे गीत मुले पुष्कळ वेळा म्हणतात. हि गीते विशिष्ट खेळाबरोबर म्हटली जातात. पुष्कळ वेळा अशा गीतांचे स्वरूप बडबडगीता सारखेच असते. अशी गीते लहान प्रसंगाला साजेशी अशी असतात.

3) नृत्य गीते

नृत्य गीते हा खेळगीताचा एक प्रकार आहे. ज्या खेळात तालाला प्रध्यान्य असते व त्याच बरोबर काही खेळगीते म्हटली जातात. त्या गीतांना नृत्यगीते असे म्हणतात. उदा. झिम्मा, फुगडी इ. मुलांच्या फार खेळात नृत्यगीतांचा उपयोग केला जातो

## ४) कूट गीते

या गीताचा उपयोग कवायत करताना विशेषता तालावर पाय टाकून केला जातो. अशी गीते एक प्रकारामध्ये ठेक्यात म्हणता येतात व ठेक्यात पाय आपटून चालण्यास जोर येतो. "कदम - कदम बढायें जां" हे कूट गीत अलीकडे बरेचशे प्रचलीत झाले आहे. अशा प्रकारच्या गीताचा उपयोग बालमंदिरात कवायतीच्या वेळी केला जातो.

## ५) अभिनय गीते

ज्या गीतात क्रिया व भाव यांचे वर्णन केलेले असते व त्याचप्रमाणे मुले अभियन करतात अशा गीतांना अभिनय गीते म्हणतात. या गीतांमध्ये असलेला अर्थ अभिनय करुन प्रकट करण्याच्या दृष्टीने अभिनय गीताची रचना केलेली असते. उदा. भाजीवाल्याचे गाणे, सैनिकासारखे चालण्याचे गाणे, धोंडयाचे गाणे हि गाणी मुलांना विशेष आवडतात याचे कारण त्यातील अभिनय होय.

## ६) लोकगीते

भुपाळया, जात्यावरील गाणी, मुलांबाइची गाणी अशी बरीच लोकगीते प्रचलीत आहेत. यातील भाषा साधी व प्रसंग नित्याच्या जीवनातले असतात. यातील छंदही सोपे असतात त्यामुळे लोकगीते पटकन तोंडी बसतात. या गीतांचा उपयोग करावा मात्र त्यात निवड करायला हवी. द्वेष भाव निर्माण होतील अशी गीते नसावी.

## ७) प्रार्थना गीते

बाल मंदिरात प्रार्थनेपासून कामाला सुरुवात करण्याचा क्रम काही ठिकाणी असतो. अशा वेळी ज्या गीताचा उपयोग केले जातो. त्याला प्रार्थना गीते असे म्हणतात. प्रार्थना गीताची भाषा सरळ व सोपी असायला हवी. त्यातील विचार मुलांना समजतील असे असणे योग्य आहे. परंतु प्रार्थना गीतातील शब्द व अर्थ मुलांना कळायलाच हवेत अशी अपेक्षा ठेवण्याचे कारण

नाही. या गीताचा मुख्य उद्देश मनावर संस्कार उत्पन्न करण्याचा आहे. तो उत्पन्न होईल अशा स्वरात व सुरात ही गीते म्हटली गेली पाहिजे.

## ८) सामान्य गीते

वरील प्रकाराशिवाय जी गीते म्हणण्यात येतात त्यांना सामान्य बालगीते म्हणता येईल. अशा गीतांचा उद्देश सामान्य काव्याचा असतो. विषय व ताल या दृष्टीने ही गीते आकर्षक असायला हवीत. अशा गीतांचा उपयोग संगीतातही करता येतो. मुलांच्या तोंडी बालगीते बसावीत म्हणून कांही गीते आलटून पालटून नेहमी म्हणावीत.

अंगणवाडी शाळेत बालगीताचा उपयोग भाषा शिकविण्याच्या दृष्टीने केला जातो. तशीच ही गीते ऐकण्यात व म्हणणयातही मुलांना आनंद मिळत असतो म्हणून या शाळेमध्ये बालगीतांचा कार्यक्रम योग्य व्हायला हवा. अधून - मधून सर्व प्रकारच्या बालगीतांचा उपयोग करण्याकडे शिक्षिकांचे लक्ष असले पाहिजे. म्हणून या शाळांमध्ये कोणकोणत्या बालगीतांचा उपयोग केला जातो. याविषयी माहिती गोळा केली आहे. ती खालीलप्रमाणे.

### कोष्टक क्रमांक ३७

### बालगीत शिकविता काय?

| अ.क्र. | बालगीताचे प्रकार | शाळांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | प्रश्नावलीत विचारलेली सर्व गीते | ६५ | ३५.९ |
| २) | बडबड गीते, अभिनय गीते, सामान्यगीते | २३ | १२.७ |
| ३) | बडबड गीते, नृत्यगीते, खेळगीते | ५६ | ३०.९ |
| ४) | प्रार्थना गीते, बडबडगीते, कुटगीते | ३७ | २०.५ |
| | एकूण | १८१ | १०० |

वरील कोष्टकावरून असे दिसून येते की, प्रश्नावलीत विचारलेल्या सर्व बालगीतांचा वापर करणा-या शाळांचे प्रमाण ३५.९ टक्के इतके आहे. बडबडगीते अभिनय गीते व सामन्य गीते यांचा वापर करणा-या शाळेंचे प्रमाण १२.६० टक्के इतके आहे. बडबडगीते, नृत्यगीते व खेळगीते यांचा वापर करणा-या शाळेंचे प्रमाण ३०.९ टक्के इतके आहे.

प्रार्थना गीते, बडबडगीते व कुटगीते घेणा-या शाळेंचे प्रमाण २०.५ टक्के इतके आहे. यावरुन असे म्हणता येईल की, विचारलेल्या सर्व प्रश्नांच्या गीतांचा वापर जास्त प्रमाणात केला जात नाही. मुलांना गीतातून आनंद मिळत असतो. त्यांना गीतातूनच खेळ खेळायला प्रोत्साहन दिले पाहिजे.

## ६.४२ *अंगणवाडी शिक्षणात बालगोष्टींचे महत्व*

लहान मुलांना गोष्टी ऐकण्याचा फार नाद असतो. हा नेहमीचा अनुभव आहे. लहान मुलांना गोष्टीची अभूतपूर्व आवड असते. लहान मुलांना गोष्टी सांगून त्यांचे मनोरंजन करण्याची प्रथा सर्व देशांमध्ये आहे. लोकगीताप्रमाणे कांही बालगोष्टीही प्रत्येक देशांत प्रचलित आहेत. आपण त्यांना आजीबाईच्या गोष्टी म्हणतो. "गोष्टी ऐकणे व सांगणे श्वाच्छोश्वास करण्याइतकेच मुलांच्या अंगवळणी पडलेले असते. लहान - लहान कविता आणि गोष्टी यांचा मुलांवर फार मोठा परिणाम होतो. मुलांची मने आकर्षून घेण्यात गोष्टी सांगणे अत्यावश्यक आहे. गोष्टी सांगणे हा शिक्षणाचा एक महत्वाचा प्रकार आहे. मुलांचे वर्तन व शील घडवण्यासाठी साधूसंत प्रवक्ते इत्यादींनी गोष्टीचाच उपयोग केलेला आढळतो."[७]

---

७) नायड एस.डी. "बालोधान वर्ग व बालवर्ग" यांच्या आभ्यासक्रमात भर. प्रकाशक नायड एस.डी. (दि मेरी बी हार्डिंग किंडर गार्डन ट्रेनिंग कालेज सोलापूर. ) तिसरी आवृत्ती १९६९ पा.क्र. ५.

बालगोष्टी मुलांचे मनोरंजन करतात व अप्रत्यक्षपणे शिक्षणाचे बरेचसे काम करतात म्हणून अंगणवाडी शिक्षणात त्यांना महत्वाचे स्थान आहे. गोष्टीच्या द्वारे मुलांचे भाषाशिक्षण होत असते. म्हणून गोष्टीची भाषा मुलांना योग्य व गोष्टीतील प्रसंगाला अनुकुल हवी. गोष्टीतील प्रसंग व कथानक यामुळे मुलांसमोर एक कल्पनासृष्टी उभी राहते. या कल्पना सृष्टीशी मुले समरस होतात. गोष्टींची भाषा व गोष्टी सांगण्याची पध्दती यामुळे मुलांना कल्पनासृष्टी उभी करावयास मदत होते.

> **बालगोष्टी सांगण्याविषयी कांही सुचना**

१) गोष्ट मनोरंजक असावी व मुलांना अनुभव देवून जाणारी असावी.

२) गोष्ट सांगणा-यालाही त्या गोष्टीचे संपूर्ण ज्ञान हवे. ती तोंडाने सांगावी वाचून दाखवू नये.

३) गोष्ट गांभिर्याने सांगावी. गोष्ट सांगणे ही एक कला असून ती सांगताना मनोभावनेने सांगावी.

४) साध्या सोप्या व सरळ भाषेत गोष्ट सांगावी.

५) गोष्ट घाई न करता सांगावी.

६) गोष्टीतील मुख्य मुद्द्यावर पुन्हा - पुन्हा जोर देणे चांगले असते.

> **बालगोष्टीचे प्रकार**

१) **अद्‌भूत गोष्टी**

सत्यसृष्टीतील व्यवहाराशी संबध नसणा-या गोष्टीना आपण अद्‌भूत गोष्टी मानतो. परीकथा व जादूच्या गोष्टी या सदरात येतात. अद्‌भूत गोष्टी मुलांच्या कल्पनाशक्ती वाढवितात. मुलांचा बुध्दीविकास व्हावा म्हणून कल्पनाशक्ती वाढविली पाहिजे व त्यासाठी काल्पनिक क्रिया व अद्‌भूत गोष्टी उपयोगी पडतात. म्हणूनच अंगणवाडी शिक्षणात या गोष्टीना महत्वाचे स्थान दिलेले आहे.

२) भीतीदायक गोष्टी

गोष्ट भीतीदायक आहे की नाही हे तिच्या सामान्य स्वरुपावरुन ठरवले पाहिजे. ज्या गोष्टी कांही मुलांना भीतीदायक वाटतात त्या इतराना तशा वाटत नाहीत म्हणून भीतीदायक गोष्टीची कक्षा ठरवणे अवघड आहे. ज्या गोष्टी काही मुलांना मनात भीती उत्पन्न करतात किंवा ऐकताना भीती वाटते त्या गोष्टींचा यात समावेश होतो. म्हणून या गोष्टी निरनिराळया स्वरुपात सांगितल्या तर मुलांना कसलीच भीती वाटणार नाही. उदा. राक्षसाच्या व भूताखेताच्या गोष्टी या प्रकारात येतात.

३) ग्रामीण गोष्टी

या गोष्टीतील विनोद ग्रामीण असतो. तसेच या गोष्टीची सुरुवात व शेवटही ग्रामीणच असतो त्यामुळे मुलांना या गोष्टीत वेगळाच आनंद वाटत असतो. आजच्या समाजात या गोष्टी मागे पडत आहेत. परंतु या गोष्टींचा विचार मुलांच्या दृष्टीने करायला हवा. ग्रामीण विभागातील मुलांना अशा गोष्टीत अधिक आनंद वाटत असतो. ग्रामीण गोष्टीत अश्लिलतेबाबतचा विचार करणयात यावा व अशा अश्लिलतेच्या गोष्टीना स्थान देवू नये.

४) नितीशिक्षण शिक्षणविषयक गोष्टी

लहान मुलांना नितीचे शिक्षण ज्या गोष्टीतून मिळते त्या गोष्टींना निती शिक्षणाच्या गोष्टी म्हणतात. मनुष्याच्या जीवनात जीवनमुल्यांना विशेष स्थान आहे. सहकार, परस्पर मदत, प्रेम, सत्, स्वार्थ व त्याग या गोष्टीने मनुष्य जीवनात उदात्तता आली आहे. तेंव्हा या गोष्टींचा वारसा मुलांनाही मिळाला पाहिजे. यासाठी शिक्षणात अशा गोष्टीना महत्वाचे स्थान आहे.

गोष्टीचा मुख्य उद्देश जरी मनोरंजन हा असला तरी त्यातून अप्रत्यक्षपणे बरेच शिक्षणाचे व संस्काराचे काम होत असते. हे काम चांगल्या प्रकारे व्हावे

म्हणून या शाळांमध्ये सांगणयात येणा-या गोष्टी कोण - कोणत्या प्रकारच्या आहेत. याविषयी माहिती गोळा केली आहे. ती खालीलप्रमाणे.

## कोष्टक क्रमांक ३८

## गोष्टी, कथा सांगता काय?

| अ.क्र. | गोष्टी, कथा सांगता काय? | शाळांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | अद्‌भूत, नितीशिक्षण, ग्रामीण, भीतीदायक | ८५ | ४६.९ |
| २) | भीतीदायक, नितीविषयक व अद्‌भूत | ६४ | ३५.४ |
| ३) | नितीविषयक, अद्‌भूत, ग्रामीण | ३२ | १७.७ |
| | एकूण | १८१ | १०० |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की अद्‌भूत, नितीशिक्षण, ग्रामीण, भीतीदायक या सर्व प्रकारच्या गोष्टी सांगणा-या शाळांचे प्रमाण ४६.९ टक्के इतके आहे. शाळेमध्ये या गोष्टी सांगण्यामागील उद्देश ब-याच प्रमाणात साध्य होत असतो.

भितीदायक, नितीविषय व अद्‌भूत गोष्टी सांगणा-या शाळेचे प्रमाण ३५.४ टक्के इतके आहे. नितीशिक्षणविषयक अद्‌भूत व ग्रामीण गोष्टी सांगणा-या शाळेचे प्रमाण १७.७ टक्के इतके आहे. शाळांमध्ये ग्रामीण गोष्टी सांगण्याचे प्रमाण जास्त असावे. मुलांना ग्रामीण गोष्टीपासून वेगळाच आनंद मिळत असतो.

### ६.४३ *जेवणाची व्यवस्था आहे काय?*

अंगणवाडी शाळेतील मुलांचा वयोगट लक्षात घेता त्यांना लवकर भूक लागत असते. या वयात त्यांना भूकेप्रमाणे खाण्यास मिळाले पाहिजे. त्यावर त्यांचा सर्वागिंण विकास अवलंबून असतो. तसेच मुलांना खाण्यापिण्यच्या

चांगल्या सवई लागाव्यात आणि रितीरिवाजाचे ज्ञान व्हावे व ते त्यांना पालन करता यावे तसेच जेवण करताना उजव्या हाताने खावे. खाताना मचमच करू नये, एकमेकाचे उष्टे खाऊ नये, खाताना आपल्या पानातील वस्तू दुस-याच्या पानात टाकू नये, जेवताना सांडासांड करू नये, पाणी पिताना घाई करू नये वगैरे बाबींचे शिक्षण या जेवणातून मिळत असते.

## कोष्टक क्रमांक ३९

## जेवणाची व्यवस्था आहे काय?

| अ.क्र. | जेवणाची व्यवस्था आहे काय? | शाळांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | होय म्हणणा-या शाळा | ८९ | ४९.२ |
| २) | नाही म्हणणा-या शाळा | ६५ | ३५.९ |
| ३) | माहिती न भरणा-या शाळा | २७ | १४.९ |
| | एकूण | १८१ | १०० |

मधल्या सुट्टीतील जेवणाचे महत्व लक्षात घेवून ज्या शाळांनी जेवणाची व्यवस्था केली आहे अशा शाळांचे प्रमाण ४९.२ टक्के इतके आहे. जेवणाची व्यवस्था केली जात नाही अशा शाळांचे प्रमाण ३५.९ टक्के इतके आहे. हे प्रमाण विचारात घेण्यासारखे आहे. जेवण्याची व्यवस्था अधिक शाळेमध्ये असायला हवी होती. परंतु जेवणाची व्यवस्था नाही अशा शाळांचे प्रमाण त्यामानाने फारच जास्त आहे.

माहिती न भरणा-या शाळांचे प्रमाण १४९ टक्के इतके आहे. हे मुख्याध्यापिकांच्या मुलाखतीतून आढळून आले. ग्रामीण विभागात पालकांची आर्थिक परिस्थिती व कामाच्या घाईमुळे जेवणाचे डबे तयार करता येत नाहीत. त्यामुळे मुले डबे आणित नाहीत. म्हणून मधल्या सुट्टीत जेवणाची व्यवस्था

केली जाते. मधल्या सुट्टीतील जेवणाचे महत्व लक्षात घेवून शासनाने ज्या शाळेत ही व्यवस्था नाही त्या शाळेत मधल्या सुट्टीतील जेवणाची व्यवस्था केली पाहिजे. मुलांना सकस आहार म्हणून दूध, पालेभाज्या, फळे, अंडे इत्यादी सकस पदार्थ पुरविले पाहिजेत. अशा प्रकारची व्यवस्था करणे अत्यावश्यक आहे.

## ६.४४ *जेवणाची व्यवस्था कोणामार्फत केली जाते?*

मधल्या सुट्टीतील जेवणाचे महत्व लक्षात घेता. मधल्या सुट्टीतील जेवणाची व्यवस्था कोणामार्फत तरी करणे आवश्यक आहे. या वयातील मुलांना भूक लागण्याचे प्रमाण जास्त असते. त्या भूकेच्या वेळी त्यांना खाण्यास मिळणे आवश्यक असते. यासाठी शाळा मधल्या सुट्टीत जेवणाची व्यवस्था करते. ज्या शाळांमध्ये मधल्या सुट्टीत जेवणाची व्यवस्था असते ही व्यवस्था कोणामार्फत केली जाते याविषयी माहिती शाळा केली आहे ती खालीलप्रमाणे.

### कोष्टक क्रमांक ४०

### जेवणाची व्यवस्था कोणामार्फत केली जाते?

| अ.क्र. | जेवणाची व्यवस्था कोणामार्फत केली जाते. | शाळांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | शासनामार्फत | ९८ | ५४.२ |
| २) | वैयक्तिक डबे आणतात | ३७ | २०.४ |
| ३) | माहिती न भरणा-या शाळा | ४६ | २५.४ |
| | एकूण | १८१ | १०० |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, मधल्या सुट्टीत जेवणाची व्यवस्था शासनामार्फत करणा-या शाळांचे प्रमाण ५४.२ टक्के इतके आहे. जेवणाची व्यवस्था शासनामार्फत करणा-या शाळांची संख्या ९८ आहे. मुले

वैयक्तिक डबे आणतात अशा शाळांचे प्रमाण २०.४ टक्के इतके आहे. माहिती न भरणा-या शाळांचे प्रमाण २५.४ टक्के इतके आहे. वास्तविकता दक्षिण सोलापूरात चालविल्या जाणा-या शाळांचा विकास अत्यल्प आहे. त्यामुळे मुलांना आपल्या शाळेमार्फत जेवण मिळाले पाहिजे अशी व्यवस्था करणे आवश्यक आहे. शाळांनी आपल्या शाळेमार्फत जेवण्याची व्यवस्था करावी.

## ६.४५ मधल्या सुट्टीत खाण्याची व्यवस्था - पध्दती कशी आहे?

मधल्या सुट्टीत दक्षिण सोलापूर तालुक्यातील १८१ शाळेपैकी ब-याच शाळांमध्ये जेवणाची पध्दती आहे. कांही ठिकाणी शासनामार्फत जेवण्याची सोय केलेली आहे तर कांही ठिकाणी मुले घरुन डबा आणतात. याविषयी अधिक माहिती गोळा केली ती खालीलप्रमाणे.

कोष्टक क्रमांक ४१

मधल्या सुट्टीतील खाण्याची पध्दती कशी आहे?

| अ.क्र. | मधल्या सुट्टीत खाण्याची व्यवस्था कशी केली जाते? | शाळांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | सर्वांना रांगेत बसवून आपआपले डबे खाण्यास सांगतात | ४३ | २३.७ |
| २) | कोणीही कोठेही बसून आपआपले डबे खातात | २७ | १४.९ |
| ३) | सर्वांचे डबे एकत्रित करुन सर्वांना वाटप करतात | २२ | १२.२ |
| ४) | सर्वांना वर्तुळाकार बसवून शाळेने तयार केलेले पदार्थ वाटप करतात | ८२ | ४५.४ |
| ५) | जेवणाची व्यवस्था नाही | ०७ | ३.८ |
| | एकूण | १८१ | १०० |

वरील कोष्टकावरुन असे लक्षात येते की अंगणवाडी शाळेत मधल्या सुट्टीत सर्वांना समान जेवण मिळाले पाहिजे तरच समानता व समान संधी या तत्वाचा बालपणीच मुलांवर संस्कार होईल. परंतु वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, सर्वांना रांगेत बसवून आपआपले डबे खाण्यास सांगणा-या शाळांचे प्रमाण २३.७ टक्के इतके आहे. कोणीही कोठेही बसून आपआपले डबे खातात अशा शाळांचे प्रमाण १४.९ टक्के इतके आहे.

सर्वांचे डबे एकत्रित करून सर्वांना समान वाटप करून खाण-या शाळेंचे प्रमाण १२.८ टक्के इतके आहे. तर कांही अशा शाळा आहेत की सर्वांना वर्तूळाकार बसवून शाळेत तयार केलेले पदार्थ खावयास लावणा-या शाळेंचे प्रमाण ४५.४ टक्के इतके आहे. हे प्रमाण त्यामानाने बरे आहे. कारण मुलांच्या अंगी शिस्त येते. जेवणाची व्यवस्था नाही अशा शाळेंचे प्रमाण ३.८ टक्के इतके आहे. परंतु हे प्रमाण अत्यल्प आहे म्हणून या शाळेंने घरुन आणलेले डबे एकत्रित करुन त्यातील पदार्थ सर्वांना वाटप करण्याची पध्दती या शाळेमध्ये अवश्य पडली पाहिजे. या बाबतीत करावा तितका खोलवर विचार शाळाप्रमुख व शिक्षिका करीत नाहीत असे म्हणता येईल.

## ६.४६ *पिण्याच्या पाण्याची व्यवस्था*

मानवी घटकासाठी स्वच्छ व शुध्द पाणी पिण्याची सोय करणे आवश्यक आहे. कारण अन्नाइतके पाणीसुध्दा महत्वाचे आहे. म्हणून मुलांन नेहमी ताजे व शुध्द पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणे आवश्यक आहे. अशुध्द पाण्यामुळे बरेचसे आजार होतात हे लक्षात घेवून पाण्याचा हौद किंवा टाकी वारंवार धुवून स्वच्छ करणे, जंतूनाशक औषधे टाकून पाणी शुध्द व स्वच्छ ठेवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. अशा शाळांमध्ये पिण्याच्या पाण्याची व्यवस्था कशी आहे याविषयी खालीलप्रमाण माहिती गोळा केलेली आहे.

## कोष्टक क्रमांक ४२

### पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आहे काय?

| अ.क्र. | पिण्याच्या पाण्याची व्यवस्था | शाळांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | पाण्याचा हौद | ४६ | २५.५ |
| २) | पाण्याची टाकी | ३५ | १९.३ |
| ३) | टीप | ५७ | ३१.४ |
| ४) | माठ व इतर | ४३ | २३.८ |
| | एकूण | १८१ | १०० |

लहान मुलांना पाणी ताजे, स्वच्छ व गाळून देणे आवश्यक असते. टाकीत पाणी स्वच्छच असेल असे नाही. परंतु वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, पाण्याचा हौद वापरणा-या शाळेचे प्रमाण २५.५ टक्के आहे. यावरुन अशा शाळेमध्ये मुलांना ताजे व गाळलेले पाणी मिळत नसेल असे दिसते. पाणी पिण्यासाठी टाकीचा वापर करणा-या शाळेचे प्रमाण १९.३ इतके आहे.

अंगणवाडीच्या काही शाळेमध्ये टीपाचा वापर केला जातो. अशा शाळेचे प्रमाण ३१.४ टक्के इतके आहे. हे प्रमाण सरासरी जास्त आहे. माठ व इतर साधनांचा वापर करणा-या शाळांचे प्रमाण २३.८ टक्के इतके आहे. पिण्यासाठी वापरण्यात येणारे पाणी ताजे व गाळून वापरण्यात यावे. टाकीतून वापरण्यात येणारे पाणी ताजे नसते. तसेच ते गाळण्याची व्यवस्था नसते. टाकी नेहमी स्वच्छ केली जात असेल हे ही निश्चित नसते. म्हणून मुलांना पिण्यासाठी वापरण्यात येणारे पाणी टिप व माठ यामार्फत देता येईल अशी व्यवस्था शाळांनी केली पाहिजे.

## ६.४७ *अंगणवाडी शिक्षणाचा प्रसार*

आपल्या देशात एकात्मिक बालविकास अंगणवाडी शिक्षणाची सुरुवात होवून बरीच वर्ष झाली. परंतु या काळात शिक्षणाची झालेली प्रगती अत्यंत असमाधानकारक आहे. कार अज्ञानामुळे या शिक्षण पध्दतीचे महत्व लोकांना पटलेले नाही. तसेच या शिक्षणणासाठी अंगणवाडी शाळेततील मुलांना रोज जेवणाचा डबा करुन देणे, शाळेत पहचविणे व आणे फारच त्रासाचे असते. या बाबीमुळे या शिक्षणाकडे पालक वर्ग लक्ष देत नाही. म्हणून या शिक्षणाचा प्रसार करावयाचा असेल तर काही सवलती या शिक्षणाचे महत्व पटेपर्यंत देणे आवश्यक आहे. म्हणून या शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी शिक्षिकांनी कोणकोणत्या केल्या आहेत. या विषयी माहिती गोळा केली आहे. ती खालीलप्रमाणे.

**कोष्टक क्रमांक : ४३**

**एकात्मिक बालविकास अंगणवाडया शिक्षणाचा प्रसार आपण करता काय?**

| अ.क्र. | शिक्षणाचा प्रसार | शाळांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | होय म्हणणा-या शाळा | १५९ | ८७.८ |
| २) | नाही म्हणणा-या शाळा | ०० | ०० |
| ३) | माहिती न भरणा-या शिक्षिका | २२ | १२.२ |
| | एकूण | १८१ | १०० |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, शिक्षणाचा प्रसार करण्या-या शिक्षिकांचे प्रमाण ८७.८ टक्के इतके आहे. अंगणवाडी शिक्षणाचा प्रसार न करणा-या शिक्षिकांचे प्रमाण जवळ जवळ नाहीच. यावरुन असे म्हणता येइल की

जवळपास निम्यापेक्षा म्हणजे १८१ शिक्षिकापैकी १५९ शिक्षिका ह्या शिक्षण प्रसार करणा-या आहेत.

अंगणवाडी शिक्षण मोफत असूनही काही शिक्षिका अशा आहेत की ज्या अंगणवाडी शिक्षणाच्या प्रसारात विशेष लक्ष देत नाहीत. माहिती न भरुन देणा-या शिक्षिकांचे प्रमाण १२.२ टक्के इतके आहे. यावरुन असे म्हणता येईल की अंगणवाडी शिक्षण मोफत असूनसुध्दा व मधल्या सुट्टीत जेवणाची व्यवस्था असूनसुध्दा पाहिजे तेवढी मुलांच्या संख्येत भर पडत नाही.

अंगणवाडी शाळेतील गळती व स्थगिती कमी करण्यासाठी तसेच या वयोगटातील मुलांच्या आरोग्याच्या दृष्टीने मधल्या सुट्टीत जेवण देणाच्या उपक्रम शासनाने राबविला आहे. तसेच शासनाने याकडे अधिक लक्ष पुरवून प्रत्येक अंगणवाडी शाळेत सकस आहार पुरविला पाहिजे. त्यामुळे मुलाचे शाळेत येण्याचे प्रमाण वाढेल अशी अशा वाटते.

## ६.४८ पाठयपुस्तकात नियुक्त अभ्यासक्रमात सर्व घटकांचा समावेश आहे काय?

अंगणवाडी शाळेतील मुलांचा सर्वांगिण विकास होणे या गोष्टीकडे लक्ष केंद्रीत करुन अभ्यासक्रम तयार करावा. अभ्यासक्रमाद्वारे मुलांची बौध्दीक - मानसिक, सामाजिक विकास घडवून मुलांचा विकस व्हावा अशी अपेक्षा असते. अंगणवाडी अभ्यासक्रमाच्या दर्ज्यात सुधारणा व्हायला पाहिजे. आजच्या अंगणवाडी शिक्षणातील अभ्यासक्रमात बौध्दीक विकासाकडे दुर्लक्ष झालेले दिसते तसेच आजच्या अभ्यासक्रमाचा दर्जा सुधारला तरच मुलांच्या सर्वांगिण विकासाला चालना मिळण्यास मदत होईल. अभ्यासक्रम गतीमान ठेवला नाही तर डबक्यातील पाण्याप्रमाणे त्याची स्थिती होईल. डबक्यातील पाणी हे पिण्यासाठी तर उपयोगी नसतेच परंतु आजूबाजूचे वातावरण बिघडण्याची शक्यता या

डबक्यामुळे निर्माण होते. आपला अभ्यासक्रम कालनुक्रमे जर बदलला नाही तर तो डबक्यातील पाण्याप्रमाणेच आपल्या विकासाला घातक ठरेल. अभ्यासक्रमांत सर्व प्रकारच्या घटकांचा समावेश केलेला आहे किंवा नाही याबाबत माहितगोळा करण्यात आली ती खालीलप्रमाणे.

## कोष्टक क्रमांक ४४

## अंगणवाडी पाठयपुस्तकामध्ये नियुक्त अभ्यासक्रमात सर्व घटकांचा समावेश केलेला आहे काय?

| अ.क्र. | अभ्यासक्रमात सर्व घटकांचा समावेश आहे काय? | शिक्षिकांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | होय म्हणणा-या शिक्षिका | १५९ | ८७.८ |
| २) | नाही म्हणणा-या शिक्षिका | २२ | १२.२ |
| | एकूण | १८१ | १०० |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येइल की, अंगणवाडी पाठयपुस्तकामध्ये नियुक्त अभ्यासक्रमात सर्व घटकांचा समावेश केलेला आहे असे म्हणणा-या शिक्षिकांचे प्रमाण ८७.८ टक्के इतके आहे. यावरुन असे म्हणता येइल की सध्याच्या अभ्यासक्रमांतून मुलांचा सर्वागिण विकास पूर्ण होत नाही. शालेय अभ्यासक्रमातून मुलांचा सर्वांगिंण विकास व्हायला पाहिजे.

मुलांच्या सर्वांगिंण विकास साधने हे शिक्षणाचे प्रमुख ध्येय सांगता येईल. परंतु हे ध्येय फार दूर असे झाले आहे. प्रत्येक वर्षी ह्या ध्येयाकडे जाण्याच्या दृष्टीने किती टप्पा गाठला पाह्जि सांगता येणे आवश्यक आहे. अंगणवाडी पाठयपुस्तकामध्ये नियुक्त अभ्यासक्रमात सर्व घटकांचा समावेश केलेला नाही असे म्हणणा-या शिक्षिकांचे प्रमाण १२.२ टक्के इतके आहे. अभ्यासक्रमामध्ये सर्व घटकांचा समावेश करुन मुलांचा सर्वागिण विकास घडवून आणला पाहिजे.

## ६.४९ *अंगणवाडी अध्यापनातून व अभ्यासक्रमातून अपेक्षित उद्दिष्टे साध्य होतात काय?*

अंगणवाडी शिक्षिका अध्यापनातून योग्य उद्दिष्टे साध्य होतील याकडे लक्ष दिले पाहिजे. मुलांचा भाषा विकास होणे, मुलांमध्ये निरिक्षणशक्ती वाढविणे, विचार शक्तीस चालना देणे इत्यादी गुणांचा विकास करणे आरोग्यविषयक चांगल्या सवई निर्माण करणे, हस्तव्यवससायामध्ये इष्ट ते कौशल्य प्राप्त करणे, जीवनातील विविध व्यवहार उदा. पोष्ट ऑफिस, बँक, दुकाने इ. व्यवहार करता येणे या सर्व घटकातून शिकवल्या जाणा-या अभ्यासक्रमातू अपेक्षित उद्दिष्टे साध्य होणे आवश्यक आहे. अंगणवाडी अभ्यासक्रमाबाबत खालीलप्रमाणे माहिती गोळा केली आहे.

**कोष्टक क्रमांक ४५**

**अंगणवाडी अध्यापनातून व अभ्यासक्रमातून अपेक्षित उद्दिष्टे साध्य होतात काय?**

| अ.क्र. | अंगणवाडी अध्यापनातून व अभ्यासक्रमातून अपेक्षित उद्दिष्टे साध्य होतात काय? | शिक्षिकांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | होय म्हणणा-या शिक्षिका | १३९ | ७६.७ |
| २) | नाही म्हणणा-या शिक्षिका | ४२ | २३.३ |
| | एकूण | १८१ | १०० |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, अंगणवाडी अभ्यासक्रमातून सर्व अपेक्षित उद्दिष्टे साध्य होतात असे म्हणणा-या शिक्षिकांचे प्रमाण ७६.७ टक्के इतके आहे. अंगणवाडी शिक्षणातील उदिष्टे पूर्ण होतात असे म्हणणा-या शिक्षिकांची संख्या समाधानकारक आहे. शिक्षणाद्वारे समाजिक व राष्ट्रीय

एकात्मिकता वाढीस लावणे. बालकांचा बोधात्मक, भावात्मक, क्रियात्मक विकास व्हायला पाहिजे.

अंगणवाडी अभ्यासक्रमांतून सर्व उद्दिष्टे साध्य होत नाही. असे म्हणणा-या शिक्षिकांचे प्रमाण २३.३ टक्के इतके आहे. अध्यापनातून ज्ञान, आकलन, उपयोजन, कौशल्य, अभिवृध्दी, अभिरुची, रसग्रहण, आणि समायोजन इत्यादीचा विकास होतो. अभ्यासक्रमातून बोधात्माक, भावात्मक व क्रियात्मक अशा सर्व त-हेचे अनुभव मुलांना मिळाले तर संतुलित व्यक्तिमत्व आकार घेईल आणि शिक्षणाचे मूळ उद्दिष्ट सफल होईल.

## ६.५० *अंगणवाडी अभ्यासक्रम पूर्ण होत नसल्यास कोणत्या मार्गाचा अवलंब करता?*

अंगणवाडी अभ्यासक्रमातून मुलांचा सर्वांगिंण विकास होणे आवश्यक आहे. हे उद्दिष्ट डोळयासमोर ठेवून अभ्यासक्रम तयार केलाला असतो. अभ्यासक्रम पूर्ण होत नसल्यास अधिक तास घेवून अभ्यासक्रम पूर्ण करावा. काही अभ्यासक्रमातले घटक मुलांना स्व-अध्ययनास द्यावेत. अशा प्रकारे अभ्यासक्रम पूर्ण केला जावा. याबाबत माहिती गोळा केली ती खालीलप्रमाणे.

### कोष्टक क्रमांक ४६
### अंगणवाडी अभ्यासक्रम पूर्ण होत नसल्यास कोणत्या मार्गाचा अवलंब करता?

| अ.क्र. | अंगणवाडी अभ्यासक्रम पूर्ण होत नसल्यास कोणत्या मार्गाचा अवलंब करता? | शिक्षिकांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | अधिक तास घेवून अभ्यासक्रम पूर्ण करणे | ९४ | ५१.९ |
| २) | स्व - अध्ययन करण्यास सांगणे | ५६ | ३०.९ |
| ३) | पालकांची मदत घेवून | ३१ | १७.२ |
| | एकूण | १८१ | १०० |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, अंगणवाडी शाळेत येणारी मुले वयाने लहान असतात. या मुलांना अनेक समस्या असतात. त्या सोडविण्यासाठी शिक्षिका अभ्यासक्रमाद्वारे मुलांचा सर्वांगिंण केला पाहिजे. अंगणवाडी अभ्यासक्रम अधिक तास घेवून पूर्ण करणा-या शिक्षिकांचे प्रमाण ५१.९ टक्के इतके आहे. अभ्यासक्रम पूर्ण होत नसल्यास स्व - अध्ययन करण्यास सांगणा-या शिक्षिकांचे प्रमाण ३०.९ टक्के इतके आहे. पालकांची मदत घेवून अभ्यासक्रम पूर्ण केला जातो असे म्हणणा-या शिक्षिकांचे प्रमाण १७.२ टक्के इतके आहे. अशा प्रकारे अभ्यासक्रम शाळेमध्ये पूर्ण करुन मुलांचा सर्वांगिंण घडविला पाहिजे. म्हणून शिक्षिकांनी जागृत दृष्टी ठेवून मुलांच्या सर्वांगिण विकासात योग्य तो प्रयत्न केला पाहिजे.

## ६.५१ *अंगणवाडी पाठयपुस्तकातून कोणती उद्दिष्टे सफल होतात?*

ध्येयप्रत वाटचाल करण्याकरीता वापरलेले साधन म्हणजे अभ्यासक्रम होय. पूर्वी एका गावाहून दुस-या गावी लोक पायी जात असत त्यानंतर बैलगाडी, सायकल, मोटार सायकल, आगगाडी, विमान या साधनांचा क्रमाक्रमाने आपण वापर करु लागलो. परिस्थिती बदल्याल्याबरोबर नवीन साधनांचा वापर करु लागलो. अभ्यासक्रमाच्या बाबतीत मात्र ही जागृकता दाखवित नाही. विशिष्ट अभ्यासक्रमामुळे विद्यार्थी इष्टस्थळी जाईल का? जाणार असेल तर किती वेळा जाईल? असे प्रश्न आभ्यासक्रमाच्याबाबतीत विचारले पाहिजेत. पाठयपुस्तकातून मुलांचा सर्वांगिण विकास घडवून आणायला पाहिजे ही प्रमुख उद्दिष्टे आहेत ती माहिती खालीलप्रमाणे गोळा केली आहे.

## कोष्टक क्रमांक ४७

### अंगणवाडी पाठयपुस्तकातून कोणती उद्दिष्टे सफल होतात ?

| अ.क्र. | अंगणवाडी पाठयपुस्तकातून खालीलपैकी कोणते उद्दिष्ट सफल होतात? | शिक्षिकांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | अभ्यासक्रम उद्दिष्टे साध्य होण्यास पुरेसा आहे | ७४ | ४०.८ |
| २) | अध्ययन, अध्यापनास निश्चित दिशा प्राप्त होते. | ६६ | ३६.५ |
| ३) | स्वयं अध्ययनास उपयुक्त आहे. | ४१ | २२.७ |
| | एकूण | १८१ | १०० |

बालकाच्या दृष्टीने अडीच ते सहा वर्षाचा कालखंड अत्यंत संवेदनक्षम काळ असतो. या काळात चांगले संस्कार करणे येवढेच खरे तर आपल्या हातात असते. मुलांना आपण शिकवित नसतो तर ती आपण होवून शिकत असतात. त्यांना असे शिक्षण मिळण्यासाठी पोषक वातावरण मिळणे गरजेचे असते. असे पोषक वातावरण मिळवून देणे हे शिक्षकाचे काम असते. बालकाच्या गरजा ओळखून त्यांच्या पुढील प्रश्न समजून घ्यावे लागतात. डोळे, कान, नाक, त्वचा इत्यादी सर्व ज्ञानेंद्रियांना सशक्त बनवून त्यांच्या हाताला काम दयायचे असते म्हणजे बालकांचा सर्वांगिण विकास साधण्यासाठी बालशिक्षिकेला अधिक अभिमुख, अधिक तत्पर, अधिक उत्सुक व्हावे लागते. म्हणून अभ्यासक्रमाची उद्दिष्टे साध्य होण्यास पुरेसे आहेत अशा म्हणणा-या शिक्षिकांचे प्रमाण ४०.८ टक्के इतके आहे. अंगणवाडी अध्ययनास निश्चित दिशा प्राप्त होण्यास मदत होते असे म्हणणा-या शिक्षिकांचे प्रमाण ३६.५ टक्के इतके आहे. अंगणवाडी

अभ्यासक्रम हा मुलांना स्वयं अध्ययनास उपयुक्त आहे असे म्हणणा-या शिक्षिकांचे प्रमाण २२.७ टक्के इतके आहे.

### ६.५२ *अंगणवाडी अभ्यासक्रमातून विद्यार्थ्यांच्या विकासाकडे लक्ष देता काय?*

अंगणवाडी अभ्यासक्रमातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासाकडे लक्ष केंद्रित करून अभ्यासक्रम तयार केलेला आहे. अंगणवाडी शिक्षणातून मुलांच्या मानसिक विकास, बौध्दीक विकास, शारिरीक विकास, अभिरुची व अभियोग्यता या गोष्टींवर भर देण्यात आला आहे. खरोखरच या गोष्टीकडे लक्ष दिले आहे किंवा नाही. ही माहीती खालील कोष्टकाद्वारे गोळा करण्यात आली.

**कोष्टक क्रमांक ४८**

**अंगणवाडी अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांच्या मानसिक विकासाची अवस्था बुध्दी, अभिरुची व अभियोग्यता इत्यादी बाबीकडे लक्ष देण्यात आलेले आहे काय?**

| अ.क्र. | अभ्यासक्रमातून विद्यार्थ्यांच्या विकासाकडे लक्ष देता काय? | शिक्षिकांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | होय म्हणणा-या शिक्षिका | १२७ | ७०.१ |
| २) | नाही म्हणणा-या शिक्षिका | ५४ | २९.९ |
| | एकूण | १८१ | १०० |

वरील कोष्टकावरून असे दिसून येते की, अंगणवाडी अभ्याक्रमात मुलांच्या मानसिक विकासाची अवस्था, बुध्दी, अभिरुची व अभियोग्यता याबाबीकडे लक्ष देण्यात येते असे म्हणणा-या शिक्षिकांचे प्रमाण ७०.१ टक्के इतके आहे. तरी

त्यामानाने हे प्रमाण फार नाही. जवळ - जवळ १०० टक्के विकासावर भर दयायला हवा. तरच मुलांच्या सर्वांगिण विकास होण्यास मदत होते.

**अंगणवाडी अभ्यासक्रमातून मुलांच्या मानसिक, बौध्दक, भावनिक,** शारिरीक विकास, अभिरुची व अभियोग्यता या बाबीकडे लक्ष न देणा-या शिक्षिकांचे प्रमाण २९.९ टक्के इतके आहे. अशा शिक्षिका हे प्रमाण अजून कमी करण्यासाठी प्रयत्नवादी बनली पाहिजे. जेणे करुन मुलांच्या सर्वांगिण विकास या गोष्टीवर भर दिला पाहिजे.

### ६.५३ *अंगणवाडी अभ्यासक्रम विद्यार्थ्यामध्ये विविध क्षमता व मुल्ये त्यांच्या विकासास मदत करणारा आहे काय?*

अंगणवाडी अभ्यासक्रम मुलांमध्ये विविध क्षमता व मुल्ये विकासास मदत करतात. मुलांच्या मनाची जडण - घडण अंगणवाडी अभ्यासक्रमाद्वारे प्रेम, वात्सल्य, संयम या गोष्टींचा विकास होतो. समता, स्वातंत्र्य, बंधुभाव आणि न्याय या मानवी मुल्याची कार्य अभ्यासक्रमावर सोपविण्यात आले आहे. अध्यापक हे कार्य त्यांच्या दैनंदिन अध्यापनाच्या वेळी करु शकतात. आपल्या आचरणातून ते मुलांमध्ये उतरवू शकतात. असा ठाम विश्वास आहे. म्हणून अंगणवाडी अभ्यासक्रम मुलांमध्ये विविध क्षमता व मुल्ये त्यांच्याविकासास मदत होते किंवा नाही याबाबत माहिती गोळा करण्यात आली ती खालीलप्रमाणे.

## कोष्टक क्रमांक ४९

## अंगणवाडी अभ्यासक्रम विद्यार्थ्यांमध्ये विविध क्षमता व मुल्ये त्यांच्या विकासास मदत करणारा आहे काय?

| अ.क्र. | अंगणवाडी अभ्यासक्रम विद्यार्थ्यांमध्ये विविध क्षमता व मुल्ये त्यांच्या विकासास मदत करणारा आहे काय? | शिक्षिकांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | होय म्हणणा-या शिक्षिका | १४८ | ८१.७ |
| २) | नाही म्हणणा-या शिक्षिका | ३३ | १८.३ |
| | एकूण | १८१ | १०० |

वरील कोष्टकाद्वारे असे दिसून येते की या वयोगटातील मुलांचे बालमानसशास्त्र लक्षात घेवून त्यांच्या वयोगटानुसार अभ्यासक्रम तयार केला आहे. या वयोगटातील मुलांना बडबडगीते, खेळगीते, नृत्यगीते, अभिनय गीते, लोकगीते, प्रार्थना गीते, सामान्य गीते, अद्भूत गोष्टी, नितीशिक्षणविषयक गोष्टी आदींवर भर दिला आहे. मुलांना उच्चारण क्षमता, विचार करण्याची क्षमता, वस्तु ओळखण्याची क्षमता आदीवर भर देण्यात आला आहे. अभ्यासक्रमातून मुलांमध्ये विविध क्षमता व मुल्ये यांच्या विकासास मदत होते. असे म्हणणा-या शिक्षिकांचे प्रमाण ८१.७ टक्के इतके आहे. परंतु अंगणवाडी अभ्यासक्रमातून मुलांमध्ये विविध क्षमता व मुल्ये यांचा विकास होत नाही असे म्हणणा-या शिक्षिकांचे प्रमाण १८.३ टक्के इतके आहे. यावरुन सध्याचा चालू अभ्यासक्रम हा मुलांचा सर्वांगिण विकास करणारा आहे परंतु त्यामध्ये आणखिनही सुधारणा करून विविध क्षमता व मूल्ये वाढविण्यास मदत केली पाहिजे.

## ६.५४ *अंगणवाडी अभ्यासक्रमाचे वार्षिक नियोजन करता काय?*

अंगणवाडी शिक्षिकांना अध्यापन करताना अभ्यासक्रमाचे वार्षिक नियोजन करावे लागते. पाठयपुस्तकात १० प्रकरणे असतील तर प्रत्येक महिन्यात एक प्रकरण पुरे करावयाचे या नियोजन म्हणता येईल. पाठयपुस्तकात संपूर्ण अभ्यासक्रमाची सोईसाठी काही प्रकरणामध्ये विभागणी केलेली असते. त्यपैकी कोणते धडे सलगरित्या एकत्रित करता येतील? कोणते प्रकरण एकत्रित केल्यामुळे पाठयांशामध्ये एकजिनसीपाणा निर्माणि होईल व उद्दिष्टप्राप्तीसाठी साह्य होईल. ते आपल्याला अभ्यासक्रमाच्या नियोजनामध्ये ठरवावे लागते. वार्षिक नियोजनामध्ये संपूर्ण अभ्यासक्रमाची सोईस्कर अशा घटकांमध्ये प्रथम विभागणी करावी लागते. पाठयांशाबरोबरच सहली, खेळांच्या स्पर्धा, वत्कृत्व स्पर्धा, पाठांतर स्पर्धा इ. उपक्रमाचा विचार वार्षिक नियोजनाच्या वेळी करावा लागेल. याविषयी माहिती गोळा केली आहे ती खालीलप्रमाणे.

**कोष्टक क्रमांक ५०**

**अंगणवाडी अभ्यासक्रमाचे वार्षिक नियोजन करता काय?**

| अ.क्र. | अंगणवाडी अभ्यासक्रमाचे वार्षिक नियोजन करता काय? | शिक्षिकांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | होय म्हणणा-या शिक्षिका | १२८ | ७०.७ |
| २) | नाही म्हणणा-या शिक्षिका | ५३ | २९.३ |
| | एकूण | १८१ | १०० |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, अंगणवाडी अभ्यासक्रमाचे वार्षिक नियोजन करतात म्हणणा-या शिक्षिकांचे प्रमाण ७०.७ टक्के इतके आहे.

पाठयपुस्तकात संपूर्ण अभ्यासक्रमाची सोइसाठी काही धडयामध्ये विभागणी केलेली असते. त्यापैकी काण धडे सलगरित्या एकत्रित करता येतात. कोणती एकत्रित करता [illegible] ये

अंगणवाडी अभ्यासक्रमाचे नियोजन न करणा-या शिक्षिकांचे प्रमाण २९.३ टक्के इतके आहे. अंगणवाडी शिक्षिका आपल्या विषयाचे वार्षिक नियोजन केले पाहिजे. मातृभाषेचे वार्षिक नियोजन करताना शब्दांचे अनुकरण, आदर्श उच्चाराचे नमुने आदि घटकांचा समावेश करावा.

## ६.५५ *वार्षिक नियोजनाप्रमाणे अध्यापन करता काय?*

आजचे युग नियोजनाचे युग आहे. आपल्या वैयक्तिक जीवनात आपण नियोजन करीत असतोच महिन्याच्या १ तारखेला पगार हातात आला की तो महिनाभर कसा पुरवायचा याचे नियोजन करीत असतो. मर्यादित उत्पन्न असलेली व्यक्तिही नियोजन करीत असतेच. त्याचप्रमाणे कोणत्या महिन्यात किती प्रकरण शिकवायचे हा हिशोब या अंदाजपत्राकाद्वारे देवू लागले हे नियोजन मुख्यता संख्यात्मक स्वरुपाचे असे अशा पध्दतीने वार्षिक नियोजनाप्रमाणे अध्यापन किती शिक्षिका [illegible] याविषयी माहिती गोळा केली आहे ती खालीलप्रमाणे

कोष्टक क्रमांक ५१

वार्षिक नियोजनाप्रमाणे अध्यापन करता काय?

| अ.क्र. | वार्षिक नियोजनाप्रमाणे अध्यापन करता काय? | शिक्षिकांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | होय म्हणणा-या शिक्षिका | ११८ | ६५.१ |
| २) | नाही म्हणणा-या शिक्षिका | ६३ | ३४.९ |
| | एकूण | १८१ | १०० |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, वार्षिक नियोजन करणे म्हणजे संपूर्ण अभ्यासक्रमाची सोईस्कर अशा घटकामध्ये प्रथम विभागणी करावी लागते. पाठयांशाबरोबरच सहली, खेळ, वक्तृत्व, पाठांतर आदी उपक्रमाचा विचार वार्षिक नियोजनाच्या वेळी करावा लागतो. त्या नियोजनानुसार अभ्यासक्रम पूर्ण केला जातो. नियोजनानुसार अभ्यासक्रम पूर्ण केले तर काहीही अडचण येत नाही.

वार्षिक नियोजनाप्रमाणे अध्यापन करताना अडचणी येत नाहीत असे म्हणणा-या शिक्षिकांचे प्रमाण ६५.१ टक्के इतके आहे. परंतु वार्षिक नियोजनाप्रमाणे अध्यापन करताना अडचणी येतात असे म्हणणा-या शिक्षिकांचे प्रमाण ३४.९ टक्के इतके आहे. अंगणवाडी शिक्षिकांने नियोजनाप्रमाणे मुलांच्या विकासाला योग्य दिशा दिली पाहिजे. अशा प्रकारे अंगणवाडी शिक्षिकांनी वार्षिक नियोजनाप्रमाणे अभ्यासक्रम पूर्ण केले पाहिजे तरच मुलांच्या विकासाला योग्य ते वळण लागते.

## ६.५६ घटक नियोजन करता काय?

"घटक नियोजन न करता वार्षिक नियोजन सफल करु" असे म्हणणे हास्यास्पद ठरेल. प्रत्येक घटकाची योग्य ती दखल घेतली तरच वार्षिक नियोजन आपोआप यशस्वी होईल. घटक नियोजन यथार्थ झाले तरच वार्षिक नियोजन यथार्थ होवू शकेल म्हणून मुल्यमापनाच्या दृष्टीकोनातून अध्ययन अध्यापन प्रक्रियेमध्ये घटक नियोजनाला अतिशय महत्व आहे. म्हणून प्रत्येक शिक्षिकांनी घटक नियोजन करणे अति आवश्यक आहे. याकरिता शिक्षकाकडून या संबधी माहिती गोळा केली आहे. ती खालीलप्रमाणे आहे

## कोष्टक क्रमांक ५२

### घटक नियोजन करता काय?

| अ.क्र. | घटक नियोजन करता काय? | शिक्षिकांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | होय म्हणणा-या शिक्षिका | ८१ | ४४.७ |
| २) | नाही म्हणणा-या शिक्षिका | ६३ | ३४.९ |
| ३) | माहिती न भरणा-या शिक्षिका | ३७ | २०.४ |
| | एकूण | १८१ | १०० |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, वार्षिक नियोजनानंतर साहजिकच पुढची पायरी म्हणजे घटक नियोजन ! घटक नियोजन हा वार्षिक नियोजनाचा अंगभूत असून त्या दोन्हीमधील दुवा घनिष्ठ स्वरुपाचा असला पाहिजे. एकेका घटकाच्या अध्यापनातूनच वार्षिक नियोजानची फलश्रुती साध्य होत असते. कळी ज्या प्रमाणे हळु - हळु विकसित होवून तिचे फुलांमध्ये शेवटी रुपांतर होते त्याचप्रमाणे वर्गामध्ये असलेल्या मुलांचा प्रत्येक घटकामुळे थोडा थोडा विकास होत जावून वर्षाच्या शेवटी त्याचा आवश्यक तो विकास साध्य व्हावा अशी अपेक्षा असते. एखदया पाठयक्रमातून अपेक्षित असलेली उद्दिष्टे प्रत्येक घटकातूनच अल्पसे साध्य होत जाणार व शेवटी सर्व गोष्टीच्या संकलीत परिणामातूनच वार्षिक अभ्यासक्रमात अपेक्षिलेली उद्दिष्टे साध्य होतात आणि मुलांमध्ये इष्ट ते परिवर्तन घडून येते.

घटक नियोजन तयार करतात असे म्हणणा-या शिक्षिकांचे प्रमाण ४४.७ टक्के इतके आहे. घटक नियोजन तयार न करणा-या शिक्षिकांचे प्रमाण ३४.९ टक्के इतके आहे. प्रश्नावलीतील माहिती न भरणा-या शिक्षिकांचे प्रमाण २०.४

टक्के इतके आहे. अशा प्रकारे अंगणवाडी शिक्षिका अध्यापन पूर्व घटक नियोजन तयार केले पाहिजे. तरच अध्ययन प्रक्रिया सफल होण्यास मदत होते.

## ६.५७ दैनिदिन अध्यापनासाठी पाठ टाचण काढता काय?

दैनंदिन अध्यापन करताना पाठटाचण काढणे आवश्यक आभ्यासक्रमाचे नियोजन करुन शिक्षिकेने अध्यापन केले पाहिजे पण दैनदिन घटक टाचण नियोजन न करता अध्यापन केले तर हेतू साध्य होणार नाही म्हणून शिक्षिकेने दैनदिन अध्यापन पाठटाचण करणे जरुरीचे आहे. त्याशिवाय अध्ययन अध्यापन प्रक्रिया सफल होणार नाही. अध्यापन करताना किती शिक्षिका दैनंदिन पाठटाचण काढतात किंवा नाही यासंबधी माहिती गोळा केली आहे ती खालील प्रमाणे.

कोष्टक क्रमांक ५३

दैनंदिन अध्यापनासाठी पाठटाचण काढता काय?

| अ.क्र. | दैनंदिन अध्यापनासाठी पाठ टाचण काढता काय? | शिक्षिकांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | होय म्हणणा-या शिक्षिका | ३५ | १९.३ |
| २) | नाही म्हणणा-या शिक्षिका | ९४ | ५१.९ |
| ३) | माहिती न भरणा-या शिक्षिका | ५२ | २८.८ |
| | एकूण | १८१ | १०० |

प्रत्येक घटकांचे नियोजन करण्यापूर्वी त्यांचा मागील घटकांशी असणारा संबध पुढील घटकांशी जुळणारा धागा यांचा विचार करावा लागतो. ज्ञाताकडून अज्ञाताकडे या अध्यापनाच्या सूत्राप्रमाणे मुलांना सहजासहजी नवीन घटकांचे आकलन होण्यासाठी पूर्वीचे कोणते संबोध, सूत्रे, संज्ञा, घटना इत्यादी उपयुक्त

ठरणार आहे. म्हणजे मुलांना नवीन घटकांशी सांगड घातली पाहिजे. यासाठी पाठ टाचण तयार करणे अत्यावश्यक असतो. शिक्षिकेला अध्ययन - अध्यापन प्रक्रिया सफल घडवून येण्यास मदत होते.

दैनंदिन अध्यापनासाठी पाठ टाचण काढताना म्हणणा-या शिक्षिकांचे प्रमाण १९.३ टक्के इतके आहे. दैनंदिन अध्यापनासाठी पाट टाचण न काढणा-या शिक्षिकांचे प्रमाण ५१.९ टक्के इतके आहे. प्रश्नावलीतील माहिती न भरणा-या शिक्षिकांचे प्रमाण २८.८ टक्के आहे. अशा प्रकारे अंगणवाडी शिक्षिकांनी अध्यापनास दैनंदिन पाठ टाचण काढणे आवश्यक आहे. तरच अध्ययन - अध्यापन प्रक्रिया सफल घडून येते.

## ६.५८ मुख्याध्यापक दैनंदिन पाठ टाचण पाहतात काय?

शालेय कारभार चालविण्यासाठी शिक्षण संस्थेकडून ज्या व्यक्तिची प्रमुख नेमणूक केली जाते त्या व्यक्तिस मुख्याध्यापक असे म्हणतात. मुख्याध्यापकाचे शाळेतील स्थान अतिशय महत्वाचे असते. शाळेचे व्यवस्थापन व संचालन करणारी ती एक प्रमुख व्यक्ती आहे. मुख्याध्यापकाचा विद्यार्थी, शिक्षक, पालक, सामज, संस्थापक व शासन अशा विविध घटकांशी संबध येतो. शिक्षिकांनी आपल्या दैनंदिन पाठ टाचण पाहतात किंवा नाही या विषयी माहिती गोळा केली आहे. ती खालील - प्रमाणे वर्णन केलेले आहे.

## कोष्टक क्रमांक ५४

### मुख्याध्यापक दैनंदिन पाठ टाचण पाहतात काय?

| अ.क्र. | मुख्याध्यापक दैनंदिन पाठ टाचण पाहतात काय? | शिक्षिकांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | होय म्हणणा-या शिक्षिका | ३५ | १९.३ |
| २) | नाही म्हणणा-या शिक्षिका | ५४ | २९.८ |
| ३) | माहिती न भरणा-या शिक्षिका | ९२ | ५०.८ |
| | एकूण | १८१ | १०० |

अध्यायन नियोजनानुसार शिक्षक अध्यापन कार्य करतात की नाही. यावर सतत देखरेख व नियत्रंण ठेवण्याची मुख्याध्यापकाची जबाबदारी असते. अधूनमधून वर्ग तपासणी करुन संबंधित शिक्षिकांना अध्यापनात काही उणीवा आढळून आल्याने सुधारण्याच्या दृष्टीने त्यांना मार्गदर्शन करणे अध्यापन प्रभावी व्हावी म्हणून शिक्षिकांनी आपल्या दैनंदिन पाठ टाचण मुख्याध्यापकांना दाखवावी करावीत. विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास व्हावा म्हणून अभ्यासक्रम पूर्वी करण्यात शिक्षिकांनी योग्य ते परिश्रम घ्यावे.

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, मुख्याध्यापकाना दैनंदिन पाठ टाचण पाहतात असे म्हणणा-या शिक्षिकांचे प्रमाण १९.४ टक्के इतके आहे. मुख्याध्यापक दैनंदिन पाठ टाचण पाहत नाही असे म्हणणा-या शिक्षिकांचे प्रमाण २९.८ टक्के इतके आहे. अंगणवाडी शिक्षिकांनी मुलाच्या विकासाकडे पुरेपूर लक्ष दयावे. मुख्याध्यापकांना आपली दैनंदिन पाठ टाचण काढून त्यांना दाखवून दाखवावीत्यातील चुकांची दुरुस्ती केली पाहिजे. योग्य त्या विकासाला चालना मिळेल.

## ६.५९ *अंगणवाडी अध्यापनाची पूर्व तयारी करता काय?*

अध्ययन प्रक्रियेत शिक्षिकांचे स्थान महत्वाचे असते हे स्वयं सिध्द आहे. संज्ञात्मक दृष्टीकोनातून पाहिले तर शिक्षिकांची स्वतःच्या विषयावर पकड किती व्यापक व भरभक्कम आहे. ह्यावरुन त्यांच्या स्थान महात्म्यात फरक पडणार आहे. शिक्षिकांच्या व्यक्तिमत्वाच्या मुख्य पैलूचा वर्गामधील अध्ययनाच्या फलनिष्पतीशी संबध असतो. शिक्षिकांच्या अध्यपनाची पूर्व तयारी करणे आवश्यक असते. परंतु अध्यापक अध्ययन पूर्व अध्यापनाची पूर्व तयारी करता किंवा नाही या विषयी माहिती गोळा केली आहे ती माहिती खालीलप्रमाणे आहे.

### कोष्टक क्रमांक ५५

### अंगणवाडी अध्यापनाची पूर्व तयारी करता काय?

| अ.क्र. | अंगणवाडी अध्यपनाची पूर्व तयारी करता काय? | शिक्षिकांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | होय म्हणणा-या शिक्षिका | १५२ | ८३.९ |
| २) | नाही म्हणणा-या शिक्षिका | २९ | १६.१ |
| | एकूण | १८१ | १०० |

अध्यापन - अध्ययन प्रक्रियेत शिक्षक व विद्यार्थी या दोघांचा सहभाग महत्वाचा असतो. तो सहभाग संतुलीत असेल तर अध्यापन - अध्ययन प्रक्रिया यशस्वी व परिणामकारक होते. जर त्यांच्यातील समतोल ढळला तर अध्यापन - अध्ययन प्रक्रिया उद्दिष्टानुसार होणार नाही. त्यासाठीच शिक्षिकांनी अध्यापन पूर्व तयारी करावी. अध्यापन पूर्व तयारी करताना शिक्षिकांनी योग्य चूकाची दुरुस्ती करता येते. म्हणूनच अध्यापन पूर्व तयारी करणे आवश्यक आहे.

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, अध्यापन पूर्व तयारी करतात असे म्हणणा-या शिक्षिकांचे प्रमाण ८३.९ टक्के इतके आहे. अध्यापन पूर्व तयारी करत नाही असे म्हणणा-या शिक्षिकांचे प्रमाण १६.१ टक्के इतके आहे. यावरुन असे चित्र दिसून येते की, ब-याच शिक्षिका अध्यापन पूर्व तयारी करतात पण काही शिक्षिका अध्यापन पूर्व तयारी करीत नाहीत. अशा शिक्षिकांनी अध्यापन पूर्व तयारी करावी व योग्य त्या दिशांनी चुकांची दुरुस्ती करावी त्यामुळे मुलांच्या बोध्दीक, भावनिक, मानसिक, शारिरीक विकासास मदत होते.

### ६.६० *विविध विषयाची घटक चाचणी घेतली जाते काय?*

नव्या मूल्यमापन तंत्रानुसार अध्ययन - अध्यापन प्रक्रिया सुलभ, परिणामकारक होण्यासाठी अध्यापनाची उद्दिष्टे ठरविल्यानंतर संपूर्ण अभ्यासक्रमाचे किंवा पाठयक्रमाचे सुयोग्य विभाग पाडून त्यांचे वार्षिक नियोजन आणि घटक नियोजन करुन सुसंघटित एकजिनसी असा जो पाठयांश असतो. तोच घटक म्हणून मानला जातो. या सर्व घटकाची एकत्रित गुंफण करुन संपूर्ण अभ्यासक्रम तयार होतो. प्रत्येक घटकाचे अध्ययन - अध्यापन किती आणि कसे झालेले आहे. हे पाहण्यासाठी घटक चाचणी उपयुक्त ठरते. विविध विषयाची घटक चाचणी घेतली जाते किंवा नाही. या विषयी माहिती गोळा केली आहे ती खालीलप्रमाणे आहे.

**कोष्टक क्रमांक ५६**

**विविध विषयाची घटक चाचणी घेतली जाते काय?**

| अ.क्र. | विविध विषयाची घटक चाचणी घेतली जाते काय? | शिक्षिकांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | होय म्हणणा-या शिक्षिका | १३४ | ७४.१ |
| २) | नाही म्हणणा-या शिक्षिका | ४७ | २५.९ |
| | एकूण | १८१ | १०० |

शिक्षिकांकडून एखादया विषयाचा घटक शिकवून झाल्यानंतर त्या घटकामधील असणा-या पाठय - मुद्याचे आकलन सर्व मुलांना किती प्रमाणात झालेले आहे. प्रश्नाची विभागणी सर्व पाठयमुद्यावर करुन घटक शिकविण्याचा हेतू किती प्रमाणात सफल झालेला ाहे. विद्यार्थ्यांना त्या घटकांचे किती ज्ञान झालेले आहे. त्या ज्ञानाचा वापर विद्यार्थ्यांना किती प्रमाणात करता येतो. काही निष्कर्ष काढता येतात का? नवीन उदाहरणे, घटना किंवा प्रसंग सांगता येतात का? किंवा काही कौशल्ये विकसित झालेली आहेत का? इत्यादी गोष्टी अजमावण्यासाठी त्याच घटधकावर दिलेली चाचणी विविध विषयात घेता येते. प्रत्येक विषयाची विभागणी करुन घटक चाचणी घेता येते.

विविध विषयात घटक चाचणी घेतात असे म्हणणा-या शिक्षिकांचे प्रमाण ७४.१ टक्के आहे. परंतु विविध विषयात घटक चाचणी घेत नाहीत असे म्हणणा-या शिक्षिकांचे प्रमाण २५.९ टक्के इतके आहे. अशा शिक्षिकांनी विविध विषयात घटक चाचणी घेतली जावी. त्यातून योग्य त्या रीतीने बोध्दीक विकास होण्यास मदत होते.

## ६.६१ <u>*अध्यापन अनुभव*</u>

जॉन डयुईने शिक्षणात अनुभवाला अतिशय महत्व दिले आहे. "अनुभवापासून शिक्षण हे शिक्षण नव्हे प्रत्येक नवा अनुभव जुन्या अनुभवामध्ये मिसळून अधिकाधिक समृध्द होत गेला पाहिजे. अनुभव म्हणजे केवळ शब्दशा ज्ञानही नव्हे तर त्यांचा व्यक्तिच्या मनावर व वर्तनावर प्रभाव पडून त्यातून व्यक्तिची कार्यक्षमता वाढली पाहिजे. जे अनेक अनुभव पूर्वानुभवांशी संयोग साधतात. पूर्वानुभवांना अधिक समृध्द करता त्या अनुभवाना शैक्षणिक अनुभव म्हणतात. "८

अंगणवाडी शाळेत शिक्षिकेला जे अनुभव मिळत असतात तया अनुभवाचा नवीन मुलांसाठी उपयोग करुन घेता येत असतो. तसेच बालकांच्या समस्या सोडविण्यास मिळालेल्या अनुभवांचा उपयोग घेत असतो. म्हणून अंगणवाडी शाळेतील शिक्षिकेच्या अध्यापन अनुभव विषयी माहिती जमा केली आहे. ती खालीलप्रमाणे आहे.

## कोष्टक क्रमांक ५७

### आपणांस अध्यापन अनुभव किती वर्षे आहे?

| अ.क्र. | अध्यापन अनुभव | शिक्षिकांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | ३ वर्षापेक्षा कमी | १२४ | ६८.५ |
| २) | ३ ते १० वर्षे | ३५ | १९.४ |
| ३) | ११ ते २० वर्षे | २२ | १२.१ |
| ४) | २० पेक्षा जास्त | ०० | ०० |
| | एकूण | १८१ | १०० |

शिक्षणात अनुभवाला अतिशय महत्वाचे स्थान आहे. अनुभवी शिक्षकाच प्रमाण जास्त असायला पाहिजे. परंतु वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, ३ वर्षाच्या आत अनुभव असलेल्या शिक्षिकांचे प्रमाण ६८.५ टक्के इतके आहे. ३ ते १० वर्षे अनुभव असणा-या शिक्षिकांचे प्रमाण १९.४ टक्के इतके आहे. ११ ते २० वर्षे अनुभव असणा-या शिक्षिकांचे प्रमाण १२.१ टक्के इतके आहे. २० वर्षापर्यंत अनुभव असणा-या शिक्षिकेचे प्रमाण एकही नाही.

८) कुंडले म.बा. "शैक्षणिक तत्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र"
पुणे : श्रीविद्या प्रकाशन पुणे, ६ वी आवृत्ती १९८६. पा.क्र. ५६२

संशोधकाने तालुक्यातील मुख्याध्यापिका, अधिकारी, शिक्षणाधिकारी यांच्या मुलाखती घेतल्या असता शाळेतील शिक्षिकांना इतर ठिकाणी नोकरी मिळाल्याने व विवाहामुळे त्या नोकरी सोडून जातात. तसेच काही शिक्षिका इतर ठिकाणी अधिक पगाराची नोकरी मिळाली असता शाळा सोडून जातात. त्यामुळे दरवर्षी नवीन शिक्षिकांची नेमणूक करावी लागते. त्यामुळे अधिक अनुभव असण-या शिक्षिकांचे प्रमाण या स्तरावर कमी आहे असे म्हणता येईल.

## ६.६२ *अंगणवाडी विषयासंबधी वर्तमानपत्रातील व मासिकातील माहिती ठेवता काय?*

वृत्तपत्रे ही समाजातील फार मोठी शक्ती आहे. लोकशिक्षण व लोकजागृतीचे ते एक फार प्रभावी साधन आहे. वर्तमानपत्रे प्रचलित घडामोडीचा परिचय करून देवून व निरनिराळया लोकशिक्षिणाचे कार्य करीत असतात. म्हणून आजच्या युगात वर्तमानपत्रे व मासिकाचे महत्वाचे स्थान आहे. शिक्षिकांनी वेळोवेळी वर्तमानपत्रातील व मासिकातील अंगणवाडी शिक्षणाविषयी माहिती मिळवली पाहिजे. त्यातून मुलांना योग्य त्या रितीने मार्गदर्शन केले पाहिजे. यातील किती शिक्षिका वर्तमानपत्राचा व मासिकाचा उपयोग करून मुलांच्या विकासात भर घालतात या विषयी माहिती खालीलप्रमाणे गोळा केली आहे.

## कोष्टक क्रमांक ५८

## अंगणवाडी विषयासंबधी वर्तमानपत्रातील व मासिकातील माहितीचे व चित्राचे कात्रण ठेवता काय?

| अ.क्र. | वर्तमानपत्रातील माहिती ठेवता काय? | शिक्षिकांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | होय म्हणणा-या शिक्षिका | १४८ | ८१.७ |
| २) | नाही म्हणणा-या शिक्षिका | ३३ | १८.३ |
| | एकूण | १८१ | १०० |

शाळांनी अभ्यासक्रमात्मक कार्याइतकेच वर्तमानपत्राकडे लक्ष पुरवून ती अधिक समृध्द व उपयुक्त करण्याचा प्रयत्न करुन विद्यार्थ्यांना त्याचा पुरेपुर लाभ होईल असा प्रयत्न शिक्षिकांनी केला पाहिजे. वर्तमानपत्रातून किंवा मासिकातून बालविषयक अथवा अंगणवाडी विषयक माहिती गोळा केली पाहिजे. त्यामाहितीद्वारे मुलाच्या ज्ञानामध्ये भर घातली पाहिजे त्यासंबधीची माहिती गोळा करुन त्याचा संग्रह केला पाहिजे. वर्तमानपत्रातील माहिती गोळा करणा-या शिक्षिकांचे प्रमाण ८१.७ टक्के इतके आहे. याउलट अंगणवाडी विषयी वर्तमानपत्रातील व मासिकातील माहिती गोळा न करणा-या शिक्षिकांचे प्रमाण १८.३ टक्के इतके आहे. म्हणून अशा शिक्षिकेंनी वर्तमानपत्रातील व मासिकातील माहिती गोळा केली पाहिजे. त्या माहिती व ज्ञानाचा उपयोग मुलांच्या ज्ञानात भर घालणारा असावा. त्या ज्ञानाकडून मुलाच्या विकासाला चालना मिळावी. तरच ही मुले हुशार व बुध्दीमान होतील.

## ६.६३ आपण त्या माहितीचे व चित्रांच्या कात्रणाचे अल्बम तयार करता काय?

आज वर्तमानपत्र ही जनतेची दैनंदिन गरज आहे. सकाळी उठल्याबरोबर चहाच्या कपासोबतच व्यक्तिला वर्तमानपत्र लागते. वर्तमानपत्राचा प्रसार केवळ बुध्दीवादी व सुशिक्षित वर्गापुरताच मर्यादित राहिलेला नाही. वर्तमानपत्राद्वारे शिक्षणाचा प्रचार व प्रसार फार मोठयाप्रमाणात होतो. म्हणून वर्तमानपत्रातील व मासिकातील उपयुक्त माहिती तसेच शिक्षणविषयक माहिती या सर्व माहितीचे शिक्षकानी कात्रण करुन अल्बम तयार केला पाहिजे. त्याचा उपयोग मुलांच्या सर्वांगिण विकासावर होतो. अशा प्रकारच्या वर्तमानपत्राची व मासिकाची अंगणवाडी विषयक माहिती किती शिक्षिकांनी गोळा केलेली आहे. याबद्दलची माहिती खालीलप्रमाणे आहे.

### कोष्टक क्रमांक ५९

### आपण त्या माहितीचे व चित्रांच्या कात्रणाचे अल्बम तयार केला आहे काय?

| अ.क्र. | अल्बम तयार केला आहे काय? | शिक्षिकांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | होय म्हणणा-या शिक्षिका | १३७ | ७५.७ |
| २) | नाही म्हणणा-या शिक्षिका | ४४ | २४.३ |
| | एकूण | १८१ | १०० |

पालकांनी अथवा शिक्षिकांनी केवळ वर्तमानपत्र वाचणे हे केवळ आपल्या ज्ञानात भर म्हणून उपयोगाचे नाही त्या ज्ञानाचा उपयोग मुलांना करुन देणे आवश्यक आहे. शिक्षणविषयक माहिती गोळा करुन त्या माहितीचे कात्रण करुन

अल्बम तयार केला पाहिजे त्या अल्बमचा उपयोग कधीही व केंव्हाही करता येतो. म्हणून अशा प्रकारे अंगणवाडी शिक्षणासंबधी माहितीचे कात्रण किंवा अल्बम तयार करणा-या शिक्षिकांचे प्रमाण ७५.७ टक्के आहे. अशाप्रकारे अंगणवाडी शिक्षणांसंबधी वर्तमानपत्रातील व मासिकातील चित्रांचे कात्रण करून ठेवणा-या शिक्षिकांची संख्या निम्म्यापेक्षा अधिक आहे.

अंगणवाडी शिक्षणासंबधी वर्तमानपत्रातील व मासिकातील माहितीचे व चित्रांचे कात्रण न करणा-या शिक्षिकांचे प्रमाण २४.३ टक्के इतके आहे. अशा शाळेतील शिक्षिकांनी अंगणवाडी विषयाशी संबधीत माहितीचे कात्रण अथवा चित्र गोळा करावीत. त्या माहितीचा व चित्राचा उपयोग मुलांचा सर्वांगिण विकास होण्यास मदत करु शकतो. त्यामुळे मुलाच्या ज्ञानात भर पडून मुले बुध्दीमान, हुशार होण्यास मदत होते.

## ६.६४ *अंगणवाडी कृती सत्रे व चर्चासत्रे यासाठी आपणास पाठविले जाते काय?*

अभ्यासक्रमामध्ये पाठयवस्तुच्या दृष्टीने किंवा अध्यापनाच्या दृष्टीने एखादा नवीन दृष्टीकोन किंवा नवीन संकल्पना अंतर्भूत केली अथवा शैक्षणिक धोरणामध्ये बदल किंवा अभ्यासक्रमांमध्ये बदल झाला की त्यासंदर्भात चर्चासत्रे तसेच कृतीसत्रे आयोजित केली जातात. यामध्ये विविध शिक्षिकांच्या व तज्ञाच्या विचारांचे अदानप्रदान व्हावे हा एकमेव हेतु असतो. त्यात नवीन कल्पना संबधी विविध अंगाने चर्चा व्हावी व त्यायोगे त्याबाबीचा सर्वकंष ज्ञान शिक्षिकेला व्हावे हा हेतू असतो म्हणून शक्यतो कृतीसत्रे व चर्चासत्रे यासाठी शिक्षिकांनी हजर रहावे. यासंबधी किती शिक्षिकांनी कृतीसत्रे व चर्चासत्रास उपस्थित राहतात याविषयी माहिती गोळा केली आहे ती खालीलप्रमाणे.

## कोष्टक क्रमांक ६०

## आपणांस शाळेमार्फत अंगणवाडी कृतीसत्रे व चर्चासत्रे यासाठी पाठविले जाते काय?

| अ.क्र. | कृतीसत्रे व चर्चासत्रे यांना हजर राहता काय? | शिक्षिकांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | होय म्हणणा-या शिक्षिका | १५७ | ८६.८ |
| २) | नाही म्हणणा-या शिक्षिका | २४ | १३.२ |
| | एकूण | १८१ | १०० |

चर्चासत्राने शिक्षिकांमध्ये चर्चा घडवून आणता येते व अपेक्षित हेतू साध्य करता येतो. ही चर्चासत्रे १ ते ३ दिवसांच्या मुदतीची असतात. काही वेळेस एकाच विषयावरील विविध अंगाची चर्चा करणयासाठी छोटे - छोटे गट पाडून चर्चा घडवली जाते व शेवटी त्या चर्चेचे फलित मोठया गटात सर्वांसमोर विशद केला जातो. तेथे शिक्षिकांनी नविन माहिती देणे हा हेतू नसतो. काही वेळा शिक्षिकांना त्यांच्या अध्यापन विषय शिकवित असताना येणा-या अडचणी समजून घेण्यासाठी व त्यावर उपाय शोधण्याच्या दृष्टीने देखील चर्चासत्रे आयोजित केली जातात. चर्चासत्रे व कृतीसत्रांमध्ये शिक्षिकेना शाळेमार्फत पाठविले जाते किंवा नाही यासंबधी माहिती वरील कोष्टकातून वर्णन केलेली आहे.

शाळेमार्फत अंगणवाडी चर्चासत्रे व कृतीसत्रे यांना जाणा-या शिक्षिकांचे प्रमाण ८६.८ टक्के इतके आहे. परंतु शाळेमार्फत अंगणवाडी चर्चासत्राना किंवा कृतीसत्रांना न जाणा-या शिक्षिकांचे प्रमाण १३.२ टक्के इतके आहे. अशा शाळांनी आपल्या शाळेतील शिक्षिका जास्तीत जास्त प्रमाणात पाठविण्याचा प्रयत्न केला पाहिजे तरच शिक्षिकांच्या विकासाबरोबर मुलांचा विकास होतो.

## ६.६५ आपण आतापर्यंत किती कृतीसत्रात भाग घेतला आहे?

कृतीसत्र यासारख्या प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये कृतीवर भर असतो. एखदया बाबीचे केवळ तात्वीक विवेचन न करता प्रात्यक्षिक कार्य करून घेण्यावर भर दिला जातो. एखादया मोठया गटाचे लहान गटामध्ये रूपांतर करून त्या गटाकडून विशिष्ट कार्य करून घेतले जाते. अशा कृतीसत्रांत शिक्षिकांनी भाग घेतला पाहिजे. अंगणवाडी शिक्षिकांनी आतापर्यंत किती कृतीसत्रात भाग घेतला आहे यासंबधी खालीलप्रमाणे माहिती गोळा केली आहे.

### कोष्टक क्रमांक ६१

### आपण आतापर्यंत खालीलपैकी किती अंगणवाडी विषयाच्या कृतीसत्रात भाग घेतला आहे?

| अ.क्र. | किती कृतीसत्रात भाग घेतला आहे? | शिक्षिकांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | १ ते ५ पर्यंत | ६९ | ३८.२ |
| २) | ६ ते १० पर्यंत | ३२ | १७.६ |
| ३) | ११ ते १५ पर्यंत | २४ | १३३ |
| ४) | १५ ते २० पर्यंत | ५६ | ३०.९ |
| | एकूण | १८१ | १०० |

कृतीसत्राचे तात्वीक विवेचन तज्ञांकडून केले जाते. या माहितीच्या आधारे प्रत्येक गटाने एक कृती घटक चाचणी करणे अपेक्षित असते. कृतीसत्र संपताना हे सर्व कार्य पूर्ण झालेले असणे अपेक्षित असते. प्रत्येक गटात ज्यावेळी शिक्षिका कार्य करीत असतात त्यावेळी त्या शिक्षिकांचा त्या गटातील प्रत्येक घटकाशी जवळून परिचय होतो. तसेच त्याच्यामध्ये संबधीत प्रात्यक्षिक कार्यबद्दल विचार

विनिमय होत असतो त्यामुळे प्रत्येक शिक्षिकेला त्या कार्यातील प्रत्येक कृतीची विविधांगी ओळख होण्यास मदत होते.

अंगणवाडी विषयाच्या कृतीसत्रात भाग घेणा-या शिक्षिकांचे प्रमाण त्या मानाने अत्यल्प आहे. अंगणवाडी कृतीसत्रात १ ते ५ पर्यंत भाग घेणा-या शिक्षिकांचे प्रमाण ३८.२ टक्के इतके आहे. तर ६ ते १० पर्यंत कृतीसत्रात भाग घेणा-या शिक्षिकांचे प्रमाण १७.६ टक्के इतके आहे.

११ ते १५ पर्यंत कृतिसत्रात भाग घेणा-या शिक्षिकांचे प्रमाण १३.३ टक्के इतके आहे व १५ ते २० पर्यंत कृतीसत्रात भाग घेणा-या शिक्षिकांचे प्रमाण ३०.९ टक्के इतके आहे. अशा प्रकारे अंगणवाडी शिक्षिका जास्तीत जास्त कृतीसत्रात भाग घेवून मुलांच्या सर्वांगिण विकासाकडे लक्ष दिले पाहिजे. जेणे करुन मुलांचा सर्वांगिण विकास घडला पाहिजे.

## ६.६६ *मुलांचे ज्ञान वाढवण्यासाठी कोणते उपाय केले जातात.*

कोणत्याही प्रकारची पाठयवस्तू शिकविण्यासाठी प्रस्तापित केलेल्या अध्यापन पध्दतीचाच वापर केला जातो परंतु पाठयपुस्तकाच्या विविधतेमुळे कोणतीही एक किंवा प्रस्तापित अध्यापन पध्दती पुरेशी ठरत नाही. हे लक्षात घेतले पाहिजे. पाठयवस्तू हे एक साधन आहे त्यामधून मुलांमध्ये विविध गुणांचा व क्षमतेचा विकास करावयाचा असतो. पाठयवस्तू शिकवणे हे अध्यापनाचे अंतिम उद्दिष्ट नसून त्यामधून विविध गुणांचा विकास करणे हे उद्दिष्ट असते. मुलांमध्ये ज्ञानाचा विकास करण्यासाठी शिक्षिकेची महत्वाची भूमिका आहे. त्यासाठी किती शिक्षिकांनी मुलांमध्ये ज्ञान वाढविण्यास उपाय केले आहेत याबाबत माहिती गोळा केली आहे ती पुढीलप्रमाणे.

## कोष्टक क्रमांक ६२

## आपल्या शाळेत मुलांचे ज्ञान वाढविण्यासाठी खालीलपैकी कोणते उपाय केले जातात.

| अ.क्र. | आपल्या शाळेत मुलांचे ज्ञान वाढविण्यासाठी कोणते उपाय केले जातात? | शिक्षिकांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | बोलकथा | ७२ | ३९.७ |
| २) | बडबडगीते | ५४ | २९.८ |
| ३) | शैक्षणिक साहित्याचे प्रदर्शन | ३५ | १९.३ |
| ४) | इतर | २० | ११.२ |
| | एकूण | १८१ | १०० |

शिक्षिकेंचे मुलांशी वर्तन हे अत्यंत प्रेमाचे व जिव्हाळयाचे असले पाहिजे. मुलांची कोवळी मने फुलविण्याचे काम शिक्षिकेला करावे लागते. यासाठी शिक्षिकांची प्रेमळ वागणूकीची नितांत आवश्यकता असते. बोलकथा, बडबडगीते, खेळगीते, नृत्यगीते, अभियनय गीते, लोकगीते, प्रार्थनागीते, सामान्यगीते अशा अनेक गीतांचा उपयोग करून मुलांशी आपुलकी वाढवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. या गीताचा अथवा गोष्टीचा मुख्य उद्देश मुलांच्या मनावर चांगले संस्कार घडवणे हा असतो.

वरील कोष्टकावरून असे दिसून येते की प्रश्नावलीतील बोधकथांद्वारे मुलांच्या ज्ञान वाढविण्यासाठी बोलकथा या साधनांचा उपयोगकरणा-या शिक्षिकांचे प्रमाण ३९.७ टक्के इतके आहे. बडबडगीते या द्वारे मुलांचे ज्ञान वाढण्यास मदत होते असे म्हणणा-या शिक्षिकांचे प्रमाण २९.८ टक्के इतकी आहे. शैक्षणिक साहित्याचा उपयोग करुन त्याद्वारे मुलांचे ज्ञान वाढविण्यास मदत होते असे म्हणणा-या शिक्षिकांचे प्रमाण १९.३ टक्के इतके आहे. तर इतर

साधनांचा वापर करणा-या शिक्षिकांचा प्रमाण ११.२ टक्के इतके आहे. अशाप्रकारे मुलांच्या ज्ञानात भर टाकाणारी अनेक साधने आहेत, या साधनांमुळे मुलांमध्ये लहानपणी चांगले संस्कार घडतात व ते संस्कार आयुष्यभर टिकणारे असतात.

## ६.६७ *अध्यापन विद्यार्थ्याकिडून सहकार्य*

पाठयक्रम हा तपशील पुर्ण असा असतो तो विशेष करुन ज्ञानाशी संबधित असतो ज्याप्रमाणे पाठयक्रम हा उद्दिष्टाशी निगडीत असतो त्याचप्रमाणे अध्यापनाचे विविध मार्ग व पध्दती हे देखिल उद्दिष्टाशी निगडीत असतात. जसे की व्याख्यान, दिग्दर्शन, परिसंवाद, क्षेत्रीय कार्य, अभिरुपता किंवा प्रतिभास तसेच प्रायोगिक कार्य यापैकी कोणत्या मार्गाचा वापर करणार आहे हे सुरुवातीलाच निश्चित करुन घ्यावे लागते. अध्यापन करताना विद्यार्थ्याकिडून सहकार्य हवे त्यांच्या सहकार्याने अध्यापन व अध्ययन प्रक्रिया सुरळीत पूर्ण होण्यास मदत होते. विद्यार्थ्यांमध्ये कारक बदल अपेक्षित असतो. अध्यापन करताना अध्यापकाला मुलांचे सहकार्य मिळणे आवश्यक असते. त्यासाठी अध्यापन करताना मुलांचे सहकार्य मिळते किंवा नाही याबाबत माहिती खालीलप्रमाणे गोळा केली आहे.

**कोष्टक क्रमांक ६३**

**अध्यापनास विद्यार्थ्याकिडून खालीलपैकी कसे सहकार्य मिळते?**

| अ.क्र. | अध्यापनास सहकार्य कसे मिळते? | शिक्षिकांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | पुरेशा प्रमाणात | ४३ | २३.७ |
| २) | मध्यम प्रमाणात | ८१ | ४४.८ |
| ३) | अल्प प्रमाणात | ३४ | १८.७ |
| ४) | सहकार्य मिळत नाही | २३ | १२.८ |
| | एकूण | १८१ | १०० |

अध्ययन - अध्यापन ही शिक्षणक्षेत्रातील एक मुलभूत प्रक्रिया आहे. या प्रक्रियेत अध्ययन - अध्यापन या संज्ञा एकमेकांशी निगडीत आहेत. अध्यापन व अध्यापन यांचा परस्पर संबध आहे. अध्यापन करताना अध्यापकाला मुलांचे सहकार्य असणे अत्यंत महत्वाचे आहे. वरील कोष्टकावरुन असे म्हणता येईल की अध्यापनास विद्यार्थ्यांकडून पुरेशा प्रमाणात सहकार्य मिळते असे म्हणणा-या शिक्षिकांचे प्रमाण २३.७ टक्के इतके आहे. अध्यापनास मुलांकडून मध्यम प्रमाणात सहकार्य मिळते असे म्हणणा-या शिक्षिकांचे प्रमाण ४४.८ टक्के इतके आहे.

अध्यापन करताना मुलांचे सहकार्य अल्प प्रमाणात मिळते असे म्हणणा-या शिक्षिकांचे प्रमाण १८.७ टक्के इतके आहे. अध्यापनात मुलांकडून सहकार्य मिळत नाही असे म्हणणा-या शिक्षिकांचे प्रमाण १२.८ टक्के इतके आहे. अशा प्रकारे अध्यापनास मुलांकडून सहकार्य मिळवणे हे अध्यापकाचे महत्वाचे काम आहे. ज्या शिक्षिकांना आपल्या अध्यापनास मुलांकडून सहाकार्य मिळत नाही त्या शिक्षिकांनी आपल्या अध्यापनास मुलांचे सहकार्य मिळावे यासाठी विविधे मार्गाचा अवलंब करुन विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास करावा.

### ६.६८ *अध्यापनास मातृभाषेचा अडथळा येतो काय?*

भारत हा विविधतेने नटलेला देश आहे. या देशांत विविध धर्माचे व जातीचे लोक राहत असून या विविधतेत एकता आहे. भारतामध्ये अनेक भाषा बोलल्या जातात. मूल जन्मापासून आपली भाषा शिकत असतो. हे त्याचे शिक्षण अखेरपर्यंत चालूच असते. संशोधकाने संशोधन करीत असलेले क्षेत्र हे कर्नाटक व महाराष्ट्र लगतचे क्षेत्र आहे. दक्षिण सोलापूर तालुक्यात जास्तीत जास्त कन्नड ही भाषा उपयोग आणली जाते. त्यामुळे अध्यापन करताना त्यांच्या मातृभाषेचा अडथळा येतो. कारण दक्षिण सोलापूर तालुक्यात मराठी शाळा

आहेत. परंतु तेथे कन्नड बोलण्याचे प्रमाण जास्त आहे. अशा प्रकारे मातृभाषेचा अडथळा येतो की नाही याची माहिती खालीलप्रमाणे.

## कोष्टक क्रमांक ६४

## अध्यापनात मातृभाषेचा अडथळा येतो काय?

| अ.क्र. | मातृभाषेचा अडथळा येतो काय? | शिक्षिकांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | होय म्हणणा-या शिक्षिका | १४९ | ८२.३ |
| २) | नाही म्हणणा-या शिक्षिका | ३२ | १७.७ |
| | एकूण | १८१ | १०० |

संशोधकाचे विषय हा दक्षिण सोलापूर तालुक्यातील अंगणवाडी या समस्येचा अभ्यास करणे हा आहे. दक्षिण सोलापूर हा सोलापूर जिल्ह्यात येणारा एक तालुका आहे. सोलापुर जिल्हा हा महाराष्ट्र व कर्नाटक लगतचा जिल्हा आहे. म्हणून या विभागातील लोक कन्नड व मराठी ह्या दोन्ही भाषा बोलतात. विशेष म्हणजे दक्षिण सोलापूर तालुक्यात जास्त प्रमाणात कन्नड बोलतात साहजिकच मुलांची मातृभाषा ही कन्नड असणार त्यामुळे अध्यापनात मातृभाषेचा अडथळा येतो. अध्यापन करताना अडथळा येतो किंवा नाही याबाबत माहिती मिळवली आहे.

अध्यापनात मातृभाषेचा अडथळा येतो असे म्हणणा-या शिक्षिकांचे प्रमाण ८२.३ टक्के इतके आहे. अध्यापनात मातृभाषेचा अडथळा येत नाही असे म्हणणा-या शिक्षिकांचे प्रमाण १७.७ टक्के इतके आहे. शिक्षिकांना अध्यापनास मातृभाषेचा अडथळा येतो. तो अडथळा येवू नये म्हणून योग्य ती उपाययोजना आखली पाहिजे व हा मातृभाषेचा अध्यापनात होणारा अडथळा दूर केला पाहिजे.

## ६.६९ आपण मुलांचे उच्चांर सुधारण्यासाठी कोणते उपक्रम राबविता?

शिक्षण कायमिध्ये शिक्षिकां व मुलांच परस्पर संबध आहे. उच्चार सुधारण्यासाठी विविध उपक्रमाचा वापर करावा त्यामध्ये श्रवण संट, आदर्श उच्चरांचे नमूने समोर ठेवणे, अनुकरण करुणे इत्यादी पध्दतीचा वापर करावा. त्यातूनच मुलांना बोलण्याचा आनंद मिळतो उच्चांरण करायला आनंद प्राप्त होतो. त्यासाठी शिक्षिकांने मुलांचे उच्चार सुधारण्यासाठी कोणते उपाय केले आहे किंवा नाही याबाबत माहिती खालीलप्रमाणे गोलळा करण्यात आली ती माहिती खालीलप्रमाणे.

### कोष्टक क्रमांक ६५

### आपण मुलांचे उच्चार सुधारण्यासाठी खालीलपैकी कोणते उपक्रम राबविता?

| अ.क्र. | उच्चार सुधारण्यासाठी उपक्रम | शिक्षिकांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | श्रवण संथ | ४१ | २२.७ |
| २) | आदर्श उच्चराचे नमुने समोर ठेवणे | ७८ | ४३.० |
| ३) | अनुकरण करुन | ६२ | ३४.३ |
| | एकूण | १८१ | १०० |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की अंगणवाडी शिक्षिका मुलांचे उच्चार सुधारण्यासाठी श्रवण संथ पध्दतीचा उपयोग करतात असे म्हणणा-या शिक्षिकांचे प्रमाण २२.७ टक्के आहे. अंगणवाडी शक्षिका मुलांचे उच्चार सुधारण्यासाठी आदर्श उच्चारांचे नमुने मुलांसमोर ठेवून मुलांना त्या आदर्श

उच्चारांचे अनुकरण करण्यास सांगणा-या शिक्षिकांचे प्रमाण ४३.० टक्के इतके आहे.

अंगणवाडी शिक्षिका मुलांचे उच्चार सुधारण्यासाठी अनुकरण पध्दतीचा वापर करणा-या शिक्षिकांचे प्रमाण ३४.३ टक्के आहे. अशा प्रकारे मुलांचे उच्चार सुधारण्यासाठी शिक्षिकांने कठिण परिश्रम केली पाहिजे. त्यातूनच मुलांचे विकासाला गती प्राप्त होते. उच्चांर सुधारण्यासाठी शिक्षिकांचे महत्वपूर्ण कार्य आहे.

## ७.७० *मुलाखत व निरीक्षणाद्वारे प्राप्त केलेल्या माहितीचे संकलन व विश्लेषण*

संशोधकास आपल्या संशोधनाच्या उद्दिष्टांविषयी माहिती अनेक साधनांनी मिळवावी लागते. अशा साधनात मुलाखत व निरीक्षण ही उपयुक्त साधने आहेत. प्रश्नावली या साधनातून जी माहिती उपलब्ध होवू शकत नाही. अशी माहिती मुलाखतीतून मिळविता येते. तसेच प्रश्नावलीतून मिळलेल्या माहितीची सत्यता पडताळून पाहण्यासाठी निरीक्षण या तंत्राचा उपयोग होत असतो.

या अभ्यासासाठी दक्षिण सोलापूर तालुक्यातील सर्व मराठी माध्यमाच्या अंगणवाडी शाळा घेतल्या आहेत. या शाळा स्थापन करण्याचे उद्देश शाळांची मान्यता, शालेय तपासणी, शिक्षिकांची नेमणूक, वित्त व्यवस्था, शिक्षिका व पालक सहकार्य, प्रशासकीय समस्या या बाबींवर चर्चा करणे आवश्यक असल्यामुळे संशोधकाने मुलाखत या तंत्राचा वापर करण्याचे निश्चित केले.

या शाळांचा परिसर, इमारत, क्रिडांगण व क्रिडांगणावरील खेळ साहित्य, मधल्या सुट्टीतील जेवणाची व्यवस्था व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था याची पाहणी करण्यासाठी व प्रश्नावलीतून मिळविलेल्या माहितीची सत्यता पडताळून पाहण्यासाठी निरिक्षण तंत्राचा वापर करण्याचे ठरविण्यात आले.

मुलाखतीसाठी शाळांची निवड प्रकरण ५ परिच्छेद ५.६.१ या प्रमाणे १८ मुख्याध्यापिका व ९ शासकीय अधिकारी या प्रतिसाधकांची निवड करण्यात आली आहे. निरिक्षणासाठी प्रकरण ५ मधिल परिच्छेद ५.७.१ या प्रमाणे २९ शाळांची निवड करण्यात आली आहे. मुलाखत व निरिक्षण या तंत्राद्वारे मिळविलेल्या माहितीचे संकलन आणि विश्लेषण करण्यात आले.

## ६.७१ *अंगणवाडी शाळा स्थापन करणयाचे उद्देश*

अंगणवाडी शिक्षणाचे महत्व आता सर्वत्र मान्य होत चालले आहे. व्यक्तिविकास व जीवनाची सफलता हा शिक्षणाचा मुख्य उद्देश आहे. अंगणवाडी शिक्षण हा त्याचा पाया आहे. परंतु आता अंगणवाडी शिक्षण हे शासनाने आपली जाबाबदारी मान्य केली आहे. त्यामुळे या क्षेत्रात थोडीफार प्रगती दिसू लागली आहे. दक्षिण सोलापूर तालुक्यातील या शाळा स्थापन करणयाचे अनेक उद्दिष्ट आहेत. शाळा स्थापन करण्यामागे कोणते उद्देश होते या विषयी मुलाखती घेवून माहिती गोळा करण्यात आली आहे. अंगणवाडी शाळा स्थापन करण्याचे उद्देश खालीलप्रमाण असल्याचे संबधित शिक्षिका, मुख्याध्यापिका, प्रशासकीय अधिका-यांनी सांगितले आहे.

> **शिक्षिका :-**

१) आजूबाजूच्या परिसरातील मुलांना अंगणवाडी शिक्षण घरापासून लांब असल्यामुळे घेता येत नाही. हा दृष्टीकोन समोर ठेवून प्रत्येक गावातच मुलांची व्यवस्था व्हावी हा उद्देश होता.

२) प्राथमिक शाळेसाठी चांगली उपस्थिती, संस्कारक्षम मुले पहिल्यापासून तयार व्हावी.

३) अंगणवाडी शिक्षण हे समाजकार्य आहे अशी शाळा प्रत्यक गावात, प्रत्येक वस्तीत सुरु व्हावी.

> **मुख्याध्यापिका :-**

१) या वयोगटातील मुलांचा सर्वांगिण विकास व्हावा.

२) खेडयातील प्रत्येक ठिकाणी अंगणवाडी शिक्षणाची संधी प्राप्त व्हावी.

३) प्राथमिक शिक्षणाची गुंणवत्ता सुधारावी.

४) प्राथमिक शाळेतील अनुपस्थिती कमी करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावे.

> **प्रशाकीय अधिकारी :-**

१) ० ते ६ वर्षे वयोगटातील मुलांना सकस आहार पुरवून त्यांची प्राकृतिक उन्नाती साधने.

२) बालसंगोपन आहार व आरोग्य यांच्या दृष्टीकोनातून मातांना शिक्षण देणे.

३) मुलांना मानसिक व शारिरीक उन्नतीच्या दृष्टीने आधारभूत जोपासना करणे.

४) बालकांची सर्वंकष उन्नती साधण्याच्या दृष्टीने संबधित अधिका-यी अथवा खात्याची मदत अथवा सहकार्य देणे.

५) ग्रामीण विभागातील मुलां - मुलींमध्ये शाळेची गोडी निर्माण करणे व आरोग्याची चांगली सवय लावणे.

६) प्राथमिक शिक्षण अर्धविरच सोडून देण्याची वृत्ती कमी होवून पैशाचा अपव्यय टाळता यावा.

## ६.७२ *अंगणवाडी शाळांना शासकीय मान्यता*

अंगणवाडी शाळांचा फारसा प्रचार झालेला नव्हता. मोठया शहरांमध्ये खाजगी संस्थानी बालवाडी पूर्वप्राथमिक, शिशुगृहे, चालवीत असत. त्यामुळे शाळांना मान्यता देण्याचा व अनुदान देण्याचा प्रश्नच नव्हता. परंतु १९३७ मध्ये लोकनियुक्त मंत्रीमंडळ सत्तारुढ झाल्यावर या शाळांना मान्यता व अनुदान देण्याची प्रथा पाडली. त्याकरिता खास निराळे नियम मात्र बनविण्यात आले



...LIBRARY SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

नाहीत. खाजगी माध्यमिक शाळांना अनुदान देणसाठी तयार करण्यात आलेल्या अनुदान नियमावलीतील तरतुदीनुसारच त्यांना 'खास' संस्था म्हणून मान्यता मिळू लागली. परंतु १९५२ - १९५३ पासून शासनाने या शाळांचे अनुदान बंद केले. त्यामुळे तेंव्हापासून या शाळा सुरु करताना शासकीय मान्यता घेतली पाहिजेच असे बंधन राहिले नाही.

आज ज्या अंगणवाडी शाळा सुरु करण्यात येत आहेत त्या सर्व शाळा शासकीय मान्यता घेवूनच चालविल्या जातात. अंगणवाडी शाळा ही केंद्रशासनामार्फत राज्यशासनाच्या नियंत्रणाखाली चालविली जात आहेत. अंगणवाडी शाळा शासनाकडून पूर्ण मान्यता आधारेच चालविली जातात. त्यासाठी अंगणवाडी शाळेतील अंगणवाडी शिक्षिकांसाठी वेतनश्रेणी दिलेली आहे.

## ६.७३ *शालेय तपासणी*

शालेय जीवनात व शालेय कारभारात शालेय तपासणीला अतिशय महत्वाचे स्थान आहे. शिक्षण हे एक राष्ट्रनिर्मितीचे प्रमुख अंग असल्याने शिक्षणविषयक ध्येय, धोरणे यांचे तपासणी अधि-यांच्या द्वाराच शाळांपर्यंत येवून पोचवायचे असते. शाळांची तपासणीदोन दृष्टीने करावयाची असते. एक शाळेची कचेरी व दप्तर म्हणजे शालेय कारभाराची तपासणी व दुसरे अध्यापनाच्या दर्जाबाबत अभिप्राय देण्यासाठी त्यावर देखरेख ठेवण्यासाठी.

तपासणीच्या पहिल्या प्रकारात शालेय इमारत, फर्निचर, साहित्य आणि दप्तर यांची बारकाईने व कासोशीने चौकशी केली जाते. हिशोब व्यवस्थित लिहिले गेले आहेत की नाहीत तसेच अनुदानासाठी कोणता खर्च ग्राह्या व कोणता खर्च आग्रह्य आहे. इत्यादिची तपासणी होते. दुस-या प्रकारात वर्गातील अध्ययन - अध्यापन विषयीच्या घडामोडीची तपासणी होत असते. अशा

तपासणीमुळे कार्यालयीन कर्मचारी, मुख्याध्यापिका यांनाही मार्गदर्शन मिळत असते.

शालेय तपासणीचे महत्व लक्षात घेवून संशोधकाने या शाळेच्या मुख्याध्यापिका यांच्या मुलाखती घेवून आपल्या शाळेची तपासणी होते किंवा नाही याविषयी माहिती गोळा केली आहे. शाळांमध्ये अंगणवाडी मदतनिस यांचे वेतन व मुलांच्या मधल्या सुट्टीतील अल्पोपाहारावर इ. बाबींवर तपासणी होते.

## ६.७४ शालेय इमारत व शालेय परिसर

शालेय जीवनातील अनेक घटकापैकी शालेय इमारत हा निर्जीव घटक अतिशय महत्वाचा आहे. शिक्षणाचे सातत्य टिकविण्यासाठी इमारत सहाय्य करते. शालेय जीवनात स्थैर्य आणणे शिक्षणाद्वारे मुलांवर होणा-या संस्कारामध्ये शालेय इमारत व शालेय परिसराचा महत्वाचा वाटा असतो. ~~शाळा हे एक मंदिर~~ भक्ताच्या दृष्टीने जे देवू मंदिराचे महत्व असते. तेच संस्काराच्या व ज्ञानोपासकांच्या दृष्टीने शाळा - मंदिराचे आहे.

आपल्या देशातील पावसाळा, हिवाळा व उन्हाळा या ऋतुमधील हवामान व वातावरणाच्या परिणाम मानवी मनावर फार होतो. म्हणून शालेय इमारत सर्वतोपरी मुलांना योग्य अशीच असली पाहिजे. भरपूर उजेड, खेळती हवा या गोष्टी तर हव्यातच परंतु भितींना ओल येणार नाही, जमीन वेळेवर झाडली पुसली व सारवली जाईल इकडे लक्ष दिले. पाहिजे मुलांच्या संख्येचा विचार करुन इमारत मुलांची सोय हवी. उत्कृष्ट इमारतीमुळे मानवी घटकांच्या मनात उत्साह व आनंदमय वातावरण निर्माण होवून त्यांची कार्यक्षमता वाढते. म्हणून शालेय जीवनात शालेय इमारतीला विशेष महत्व आहे.

मुलांच्या सर्वांगिण विकासामध्ये अनुवंश व परिस्थिती याबरोबरच शालेय परिसराचा विचार अत्यंत महत्वाचा आहे. शाळेतील मानवी घटकांच्या

दरम्यानच्या व्यवहारास योग्य ते भौतिक आरोग्यदायी वातावरण लाभल्याशिवाय शालेय व्यवहार शैक्षणिकदृष्टया परिणामकारक होवू शकणार नाही. शालेय आरोग्य राखण्यासाठी शालेय वास्तू इमारतीची बांधणी, वर्गखोल्याचे स्वरुप, सफाई, स्वच्छतेच्या सोयी व क्रिडांगणाचे महत्व आहे. शालेय आरोग्यासाठी आवश्यक असणा-या घटकांचा विचार करुनच शालेय परिसर कसा असावा. हे ठरविले जाते. शालेय वास्तु आदर्श असेल तरच शालेय परिसर उत्तम राहू शकतो. शालेय वास्तु विशिष्ट वातावरणाने भरलेली असते. आपले थोर शिक्षक, मोठे झालेले विद्यार्थी, उदात्त परंपरा या सर्व गोष्टींनी शाळेचे अंतरंग व बहिरंग भारलेले असते. या वृत्तीची घडण होण्यास प्रत्यक्ष शालेय वास्तुचा (आदर्श असेल तरच शालेय) व परिसराचा महत्वाचा वाटा असतो. म्हणून शालेय वास्तु आदर्श असेल तरच शालेय परिसरात योग्य वातावरण निर्मिती होवू शकेल. म्हणून स्थानिक गरजा अनुकूल परिस्थिती यांना अनुसरुन व शालेय आरोग्याच्या दृष्टीने इमारत स्थानिक परिसराशी सुयोग्य अशी असावी.

अंगणवाडी स्तंरावरील शिक्षणाच्या दृष्टीने शालेय इमारत व शालेय परिसराचे महत्व लक्षात घेवून या शाळ भरणा-या इमारती या विषयी मुलाखतीद्वारा माहिती गोळा केली आहे. शालेय परिसराचे महत्व शाळेतील उपलब्ध साहित्य, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था यासंबधीची माहिती निरीक्षणाद्वारा गोळा करण्यात आली आहे.

## ६.७५ समारोप

या प्ररणामध्ये संशोधकाने अंगणवाडी शिक्षिकांच्या शैक्षणिक, व्यावसायिक, अध्ययन, अध्यापन या संबधीत सर्व घटकाचा अभ्यास केला आहे. विविध गटाचा तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी संख्याशास्त्राचा वापर केला आहे. शालेय क्रिडांगण, विविध साहित्याचा तसेच मुलाखती व निरीक्षणाद्वारे अभ्यास करून संख्याशास्त्रीय माहितीवरून योग्य ते निष्कर्ष काढलेले आहेत.